सोलापूर
# तरुण भारत
SOLAPUR TARUN BHARAT
न मे कर्मफले स्पृहा
मकर संक्रांति
तिळगुळ घ्या... गोड गोड बोला...
सोलापूर, धाराशिव, लातूर, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना, बीड, अहिल्यानगर व सातारा येथून वितरित
सदाफुलीसह
धाराशिव
बुधवार, १४ जानेवारी २०२६ । वर्ष ३ रे अंक ३१५ । पाने १२+८ । किंमत रु. ६/-
■ RNI No. MAHMAR/2023/86468 ■ Postal Regd No. SLP/32/2024-2026.
dainiktarunbharat.com
epaper.dainiktarunbharat.com

## राज्यातील १२ झेडपी, १२५ पंचायत समिती
# निवडणुकांचा वाजला बिगुल!

### ५ फेब्रुवारीला मतदान, ७ तारखेला निकाल



### शुक्रवारपासून अर्ज आता ग्रामीण रणधुमाळी

**तभा वृत्तसेवा । जमीर काझी**
**मुंबई, दि. १३ जानेवारी-**

राज्यातील २९ महापालिका निवडणुकीच्या प्रचाराची राळ मंगळवारी थंडावली असतानाच आता राज्यातील विविध १२ जिल्हा परिषदा आणि त्यांतर्गतच्या १२५ पंचायत समित्यांच्या सार्वत्रिक निवडणुकीचे बिगुल वाजले आहे.

याठिकाणी ५ फेब्रुवारीला मतदान तर ७ फेब्रुवारीला मतमोजणी होणार आहे. येत्या शुक्रवार (दि. १६) उमेदवारी अर्ज दाखल करता येणार आहे. सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानुसार ५० टक्केहून कमी आरक्षण असलेल्या १२जिल्हा परिषदांच्या एकूण ७३१; तर पंचायत समित्यांच्या १ हजार ४६२ जागांसाठी ही निवडणूक होणार असून याक्षेत्रांत आजपासून आचारसंहिता लागू झाली आहे, अशी घोषणा राज्य निवडणूक आयुक्त दिनेश वाघमारे यांनी आज केली.

रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग, पुणे, सातारा, सांगली, सोलापूर, कोल्हापूर, छत्रपती संभाजीनगर, परभणी, धाराशिव आणि लातूर या १२ जिल्हा परिषदा आणि त्यांतर्गतच्या १२५ पंचायत समित्यांसाठी निवडणूक होईल.

**परिषद आणि पंचायत समितीसाठी प्रत्येकी एक मत द्यावयाचे**

नगरपरिषदा आणि नगरपंचायतींच्या निवडणुकांच्या वेळी ऑनलाईन पद्धतीने नामर्निर्देशनपत्रे व शपथपत्रे भरण्याची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली होती; परंतु विविध राजकीय पक्ष आणि उमेदवारांची मागणी लक्षात घेऊन या निवडणुकांच्या शेवटच्या टप्प्यात पारंपरिक पद्धतीने म्हणजे ऑफलाईन पद्धतीने नामर्निर्देशनपत्रे व शपथपत्रे स्वीकारण्यात आली. त्यानंतर महानगरपालिका निवडणुकीतसुद्धा ऑफलाईन पद्धतीनेच नामनिर्देशनपत्रे स्वीकारण्यात आले होते. जिल्हा परिषदा आणि पंचायत समित्यांच्या निवडणुकीतही आता ऑफलाईन पद्धतीनेच नामनिर्देशनपत्रे स्वीकारण्यात येतील.

**'जातवैधता पडताळणी'बाबत**

राखीव जागांवर निवडणूक लढवू इच्छिणाऱ्या उमेदवारांना नामनिर्देशनपत्रासोबत जात प्रमाणपत्र व जातवैधता प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक असते; परंतु जातवैधता प्रमाणपत्र जोडले नसल्यास जात पडताळणी समितीकडे जातवैधता प्रमाणपत्रासाठी सादर केलेल्या अर्जाची सत्यप्रत किंवा असा अर्ज केला असल्याचा अन्य कोणताही पुरावा देणे आवश्यक राहील. सहा महिन्यांच्या आत जातवैधता प्रमाणपत्र सादर न करू शकलेल्या संबंधित उमेदवाराची निवड भूतलक्षी प्रभावाने रद्द होईल.



### मतदान केंद्र आणि ईव्हीएम

जिल्हा परिषदा व पंचायत समित्यांच्या निवडणुकांसाठी सुमारे २५ हजार ४८२ मतदान केंद्रांची व्यवस्था करण्यात आली आहे. या निवडणुकांसाठी पुरेशा इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्रांची (ईव्हीएम) उपलब्धता करण्यात आली आहे. त्यात ५१ हजार ५३७ कंट्रोल युनिट, १ लाख १० हजार ३२९ बॅलेट युनिटची उपलब्धता केली आहे.

| निवडणूकीचा तपशील असा | |
|---|---|
| एकूण जिल्हा परिषदा | १२ |
| एकूण जागा | ७३१ |
| महिलांसाठी जागा | ३६९ |
| अनुसूचित जातींसाठी जागा | ८३ |
| अनुसूचित जमातींसाठी जागा | २५ |
| नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्गासाठी जागा | १९१ |
| **पंचायत समित्यांच्या जागांचा तपशील** | |
| एकूण पंचायत समित्या | १२५ |
| एकूण जागा | १,४६२ |
| महिलांसाठी जागा | ७३१ |
| अनुसूचित जातींसाठी जागा | १६६ |
| अनुसूचित जमातींसाठी जागा | ३८ |
| नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्गासाठी जागा | ३४२ |
| **महत्वाच्या तारखा** | |
| नामनिर्देशनपत्र स्वीकारणे | १६ ते २१ जानेवारी |
| छाननी | २२ जानेवारी |
| माघारीची अंतिम मुदत | २७ जानेवारी |
| चिन्ह वाटप व अंतिम उमेदवारांची यादी | २७ जानेवारी |
| मतदान | ५ फेब्रुवारी |
| मतमोजणीचा | ७ फेब्रुवारी |



**एकदा भक्तलिंग हर्र बोला हर्र...** सोलापूर : ग्रामदैवत शिवयोगी श्री सिद्धरामेश्वरांच्या यात्रे निमित्त मंगळवारी मंदिर परिसरातील संमती कट्टयावर अक्षता सोहळा पार पडला.



## महत्वाचे...



### लोकमंगल महाविद्यालयात राजमाता जिजाऊ व स्वामी विवेकानंद जयंती साजरी

**सोलापूर, दि. १२ जानेवारी-**

श्रीराम ग्रामीण संशोधन व विकास प्रतिष्ठान संचलित लोकमंगल कृषीजैवतंत्रज्ञान व लोकमंगल कृषी व्यवसाय व्यवस्थापन महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजनेंतर्गत राजमाता जिजाऊ व स्वामी विवेकानंद यांची जयंती साजरी करण्यात आली. कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून जिल्हा रुग्णालयाचे संवेदना प्रकल्प जिल्हा समन्वयक सारिका सोनवले व अध्यक्ष म्हणून लोकमंगल कृषीजैवतंत्रज्ञान महाविद्यालयाचे प्राचार्य सागर महाजन हे लाभले होते. प्रारंभी राजमाता जिजाऊ व स्वामी विवेकानंद महाराज यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. महाविद्यालयाचे विद्यार्थी निखिल धुमाळ, ओम पवार, अभिजीत तनपुरे, भक्ती काटकर, प्रियांका वळसे, सानिका यादव, मंजुनाथ कुंभार आदींनी आपल्या मनोगतातून स्वामी विवेकानंद व राजमाता जिजाऊ यांच्या कार्याचे महत्त्व पटवून सांगितले. प्रमुख पाहुणे सारिका सोनवले यांनी उपस्थित विद्यार्थ्यांना मानसिक आरोग्य व आजचा युवक याविषयी मार्गदर्शन केले. कार्यक्रमास प्रा . निशा काटे, प्रा. आशिष सरकाळे, प्रा. सायली बडेकर, प्रा. वर्षा माने देशमुख, प्रा. स्मिता धायगुडे, प्रा. सुप्रिया डोके, प्रा. रोहिणी सोमवंशी, प्रा. मयुरी क्षीरसागर, प्रा. अपूर्वा पिस्के उपस्थित होते. सूत्रसंचालन व आभारप्रदर्शन वैष्णवी मागाडे यांनी केले.



### वेळापूर पोलिस स्टेशनच्या वतीने पत्रकारांचा सत्कार

**वेळापूर, दि. १३ जानेवारी-**

मराठी वृत्तपत्रसृष्टीचे जनक, आद्य पत्रकार बाळशास्त्री जांभेकर यांच्या जयंतीनिमित्त साजऱ्या होणाऱ्या पत्रकार दिनाचे औचित्य साधून वेळापूर पोलिस स्टेशनच्या वतीने हद्दीतील पत्रकार बांधवांचा सन्मान सोहळा पार पडला. यावेळी उपस्थित पत्रकारांना प्रशस्तीपत्र देऊन पारंपरिक पद्धतीने फेटा बांधून वेळापूर पोलीस स्टेशनचे प्रभारी अधिकारी भाऊसाहेब गोसावी यांच्या हस्ते गौरविण्यात आले. कार्यक्रमास पोलीस उपनिरीक्षक कांबळे, पत्रकार बांधव तसेच वेळापूर पोलीस स्टेशनचे अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. यावेळी पत्रकार सूर्यकांत भिसे, रामचंद्र मगर, यांनीही विचार व्यक्त केले.



### राजमाता जिजाऊ जयंतीनिमित्त पानगाव आरोग्य केंद्राला व्हीलचेअर अर्पण

**वैराग, दि. १३ जानेवारी-**

राजमाता जिजाऊ माँसाहेब यांच्या जयंतीनिमित्त सोलापूर जिल्ह्यातील पानगाव येथील प्राथमिक आरोग्य केंद्राला व्हीलचेअर अर्पण करण्याचा सामाजिक उपक्रम महाराष्ट्र बागवान वर्किंग कमिटी आणि बागवान सोशल फाउंडेशन, बार्शी यांच्या संयुक्त विद्यमाने राबविण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी निवृत्त पोलिस निरीक्षक भाऊसाहेब आंधळकर हे होते. प्रमुख पाहुणे म्हणून महाराष्ट्र बागबाव वर्किंग कमिटीचे संस्थापक अध्यक्ष डॉ. शरीफ बागवान, पानगावचे सरपंच जयसिंग देशमुख, प्राथमिक आरोग्य केंद्राचे वैद्यकीय अधिकारी डॉ. महेश पाटील यांच्यासह पिंटू नाईकवाडी, प्रकाश कानगुडे, इब्राहिम काजी, जुबेरभाई येळशिकर, हाजी मुस्ताकभाई मोहोळकर आदी मान्यवर उपस्थित होते. तसेच गावातील इम्रान बागवान, शारिक बागवान, सुलतान मुजावर, सलमान मुजावर, रईस बागवान वैराग आणि वैराग बागवान जमातीचे अध्यक्ष इस्माईलभाई बागवान यांचीही उपस्थिती लाभली. पानगावचे सरपंच जयसिंग देशमुख यांनी मनोगतात दोन्ही संस्थांचे कौतुक करीत प्राथमिक आरोग्य केंद्राला व्हीलचेअर देऊन रुग्णांसाठी मदतीचा हात दिल्याबद्दल अभिनंदन व शुभेच्छा दिल्या. पानगाव आरोग्य केंद्राचे सहाय्यक बापू यादव यांनी आभार मानले.



### मानेगावमध्ये जिजाऊ व स्वामी विवेकानंद जयंती साजरी

**वैराग, दि. १३ जानेवारी-**

तालुक्यातील मानेगाव येथे एकता महिला मंचच्या वतीने राजमाता जिजाऊ आणि स्वामी विवेकानंद यांची जयंती साजरी करण्यात आली. कार्यक्रमाची सुरुवात राजमाता जिजाऊ आणि स्वामी विवेकानंद यांच्या प्रतिमेचे पूजन व दीपप्रज्वलनाने करण्यात आली. यावेळी उपस्थित महिलांनी जिजाऊंच्या कर्तृत्वाचा आणि स्वामी विवेकानंदांच्या विचारांचा जागर केला. यावेळी सुरेखा वाघमारे, कोमल डाके, रजनी घोंगडे, अविदा डाके, संगीता डाके, सुरेखा डाके, रसिका डाके, अश्विनी डाके, इंदुमती डाके, लोचना डाके, लक्ष्मी मोरे उपस्थित होते.

## वैरागकरांच्या आरोग्याशी खेळ

# कोट्यवधींचे जलशुद्धीकरण केंद्र धूळ खात पडून

**तभा वृत्तसेवा,**
**वैराग, दि. १४ जानेवारी-**

वैराग शहरात भीषण परिस्थिती समोर आली आहे. गेल्या ४०-५० वर्षांपासून वैराग शहराला दूषित पाणीपुरवठा होत असून, तक्रारी करूनही नगरपंचायत प्रशासन याकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष करत असल्याचा आरोप नागरिक करत आहेत. यंत्रणा असूनही पाण्याचे शुद्धीकरण' नाही

मिळालेल्या माहितीनुसार, हिंगणी तलाव येथे कोट्यवधी रुपये खर्च करून पाणी शुद्धीकरण यंत्रणा बसवण्यात आली आहे. मात्र, ही यंत्रणा केवळ शोभेची वस्तू बनली आहे. प्रत्यक्षात या यंत्राचा वापरच केला जात नाही. इतकेच नव्हे तर, ज्या टाक्यांमधून गावाला पाणीपुरवठा होतो, त्या टाक्यांची अनेक दिवसांपासून स्वच्छता केलेली नाही. या टाक्यांमध्ये मोठ्या प्रमाणात आळ्या आणि शेवाळ साचले असून, तेच पाणी नागरिकांच्या घरात पोहोचत आहे.

वैराग शहराची लोकसंख्या आज ५० ते ६० हजारांच्या घरात आहे. एवढ्या मोठ्या लोकसंख्येला दूषित पाणी देऊन प्रशासन कोणाच्या मृत्यूची वाट पाहत आहे का? असा संतप्त सवाल नागरिक विचारत आहेत. जर दूषित पाण्यामुळे वैरागमध्ये एखादी जीवितहानी झाली, तर त्याची जबाबदारी मुख्याधिकारी की जिल्हा प्रशासन घेणार? असा प्रश्न अर्जदाराने उपस्थित केला आहे.

या प्रकरणी आतापर्यंत कोणती कारवाई केली, याची लेखी माहिती अर्जदारास देण्यात यावी आणि तातडीने स्वच्छ पाणीपुरवठा सुरू करण्यात यावा, अन्यथा जनआंदोलनाचा पवित्रा घेतला जाईल, असा इशारा देण्यात आला आहे.

**केवळ कागदोपत्री कारभार**

या गंभीर विषयावर वैराग नगरपंचायतीच्या मुख्याधिकारी श्रीमती विद्या पाटील यांच्याकडे वारंवार लेखी व तोंडी तक्रारी करण्यात आल्या आहेत. मात्र, प्रशासनाकडून केवळ कागदोपत्री घोडे नाचवले जात असून प्रत्यक्ष जमिनीवर कोणतीही सुधारणा झालेली नाही. जिल्हाधिकारी कार्यालयातील नगरविकास शाखेकडेही दाद मागून अद्याप ठोस कारवाई झालेली नाही.



# प्रथमेश म्हेत्रेनी घेतला नगराध्यक्ष पदाचा पदभार

**उपनगराध्यक्षपदी जिलानी नाकेदार; स्विकृत सदस्यपदी उदयकुमार म्हेत्रे, बसवराज हौदे**

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि. १३ जानेवारी-**

दुधनी नपा चा पदभार नुतन नगराध्यक्ष प्रथमेश म्हेत्रे यांनी मुख्याधिकारी तथा प्रशसक लक्ष्मीकांत कहर यांच्या हस्ते स्विकारला पदभार घेताच पहिल्या सभेत उपनगराध्यक्ष निवडीचा कार्यक्रम झाला . उपनगराध्यक्ष पदी जिलानी चॉदसाब नाकेदार यांचा एकमेव अर्ज आल्याने अविरोध निवड झाली स्विकृत सदस्या करिता उदयकुमार म्हेत्रे ' बसवराज हौदे यांचे अर्ज प्राप्त झाल्याने दोघांची निवड झाली .

याप्रसंगी प्रमुख उपस्थिति मध्ये शिवसेनेचे जिल्हयातील जेष्ठ नेते माजी गृहराज्यमंत्री सिद्धाराम म्हेत्रे ' जेष्ठ नेते शंकर म्हेत्रे, वैशाली म्हेत्रे यांची प्रमुख उपस्थिती होती.

याप्रसंगी दुधनी नगर परिषद नुतन नगरसेवक शिंदे शिवसेनेचे नगरसेवक व नगरसेविका अश्विनी हरळेकर, श्रीदेवी कोळी, पवार हरिचंद्र, सरूबाई मळेकर, मधुमती म्हेत्रे, सिद्धाराम येगदी, सुष्मा धल्लू, राऊफ निंबाळकर, सुनंदा चिंचोळी, बसवराज बसवनकेरी, संगीता पाटील, स्वाती सोळशे, अंजनाबाई पोलिस पाटील, ललिता गद्दी, सातलिंगप्पा परमशेट्टी, जगदेवी कोतली, महांतेश पाटील, संगमेश्वर सिन्नूर, बसवराज परमशेट्टी, आदिचा सत्कार करण्यात आला. याप्रसंगी गुरु हबसी गुलाब खैराट शंकरराव म्हेत्रे, मंदिर पंचकमिटी चेअरमन चंद्रकांत येगदी, मलकाजप्पा अंधेनी, गिरमलप्पा सावळगी, सातलिंगप्पा परमशट्टी, सिद्धाराम मल्लाड, लक्ष्मीपुत्र भाईकट्टी, मल्लिनाथ म्हेत्रे, निंगण्णा सोळसे, शरणबसप्पा हावशेट्टी , सचिन माशाळ आदी दुधनी शहरवासीय प्रतिष्ठित व्यापारी उपस्थित होते.



## सांगोला नगरपरिषद उपनगराध्यक्षपदी नितीन इंगोले

**स्वीकृत सदस्यपदी विजय इंगोले, तनुजा एरंडे**

**तभा वृत्तसेवा,**
**सांगोला, दि. १३ जानेवारी-**

मंगळवार दि.१३ जानेवारी रोजी सांगोला नगरपरिषदेच्या उपनगराध्यक्ष व स्वीकृत सदस्य निवडीसाठी नवनिर्वाचित सदस्यांची पहिली सर्वसाधारण सभा नगराध्यक्ष तथा पिठासीन अधिकारी आनंदा माने यांच्या अध्यक्षतेखाली राजमाता पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सभागृह येथे संपन्न झाली.

उपनगराध्यक्ष पदासाठी शिवसेना पक्षा तर्फे नितीन विठ्ठल इंगोले यांचा एकमेव अर्ज दाखल झाल्याने त्यांची बिनविरोध निवड तसेच स्वीकृत सदस्य पदासाठी शिवसेना पक्षा तर्फे विजय वसंत इंगोले व सांगोला शहर विकास आघाडी तर्फे तनुजा बाळासाहेब एरंडे यांचे जिल्हाधिकारी कार्यालय येथे सादर करण्यात आलेले नामनिर्देशनपत्र वैध असल्याचे जिल्हाधिकारी कार्यालयामार्फत कळविण्यात आले असल्याने त्यांना नामनिर्देशित सदस्यपदी नियुक्ती झाली असल्याचे पिठासीन अधिकारी तथा नगराध्यक्ष आनंदा माने यांनी घोषित केले. यावेळी मुख्याधिकारी डॉ. सुधीर गवळी उपस्थित होते.

# पापरकर, वाळुजकर, थिटे यांची स्विकृत नगरसेवकपदी वर्णी

**भालके गटाचे नाव अद्यापही गुलदस्त्यात**

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि. १३ जानेवारी-**

पंढरपूर नगरपरिषदेच्या स्वीकृत नगरसेवकपदी माजी आमदार प्रशांत परिचारक यांच्या नेतृत्वाखालील भाजपा आणि पंढरपूर मंगळवेढा शहर विकास आघाडीकडून तीन स्विकृत नगरसेवकांची नावे मंगळवारी जाहीर करण्यात आली आहेत. यामध्ये माजी नगराध्यक्ष लक्ष्मण पापरकर, सुनील वाळुजकर तसेच सौरभ थिटे यांची वर्णी लागली आहे.दुसरीकडे भालके गटाच्या वाट्याला एक स्विकृत नगरसेवकपद आलेले आहे. मात्र त्यांच्याकडून अद्याप कुणाचेही नाव जाहीर करण्यात आलेले नाहीत.

पंढरपूर नगरपरिषदेच्या निवडणूकीत ३६ नगरसेवकां पैकी २४ जागांवर परिचारकांच्या नेतृत्वाखालील भाजपा आणि पंढरपूर मंगळवेढा शहर विकास आघाडीचे २४ नगरसेवक निवडून आलेले होते. तर भालकें यांच्या नेतृत्वाखालील तिर्थक्षेत्र विकास आघाडीचे ११ नगरसेवक निवडून





आलेले होते. एक जागेवर अपक्ष नगरसेवक निवडून आला.

दरम्यान निवडून आलेल्या सदस्यांच्या संख्याबळानुसार परिचारक गटाला तीन आणि भालके गटाच्या वाट्याला एक स्विकृत सदस्यपद आलेले होते. गेल्या दोन,चार दिवसांपासून परिचारक गटातील अनेक जण स्विकृत सदस्यपदी आपली वर्णी लागावी म्हणून आपआपल्या समर्थक कार्यकर्त्यांसह परिचारकांच्या भेटीगाठी घेत होते. माजी आमदार प्रशांत परिचारक, विद्यमान आमदार समाधान आवताडे तसेच युटोपियन शुगर्सचे सर्वे सर्वा उमेश परिचारक यांच्या विचारविनीमयातून अखेर मंगळवारी तीन नावे निश्चित करुन ती जाहीर करण्यात आली. त्यामध्ये माजी नगराध्यक्ष लक्ष्मण शिरसाट, ड. सुनील वाळुजकर आणि सौरभ काशिनाथ थिटे यांची निवड करण्यात आली. दरम्यान सोलापूर येथील जिल्हाधिकारी कार्यालयात जावून जिल्हा प्रशासनाधिकारी योगेश डोके यांच्याकडे मंगळवारी दुपारी या तिघांकडून आपआपली नामनिर्देशन पत्रे सादर करण्यात आली. यावेळी त्यांच्या समवेत पंढरपूर अर्बन बँकेचे अध्यक्ष तथा माजी नगराध्यक्ष सतीश मुळे, अर्बन बँकेचे संचालक हरीश ताठे, पालिकेतील भाजपाचे गटनेते भागवत बडवे तसेच ज्येष्ठ नगरसेवक सुजित कुमार सर्वगोड, अमोल डोके, विश्वनाथ आळगे आणि ओंकार वाळूजकर हे उपस्थित होते.

# शेळ्या चोरटे जेरबंद; ६ लाखांचा मुद्देमाल जप्त

**पंढरपूर, दि. १३ जानेवारी-**

शेळ्या चोरी प्रकरणी पंढरपूर तालुका पोलिसांनी तीन आरोपींना शिताफीने जेरबंद करुन त्यांच्याकडून सहा शेळ्या, एक विवो कंपनीचा मोबाईल, रोख रक्कम आणि एक टेम्पो असा एकूण ६ लाख १५ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. विशेष म्हणजे या आरोपींकडे चौकशी करीत असताना इतर पाच गुन्हांचा छडा देखील लावण्यात पंढरपूर तालुका पोलिसांना यश आल्याची माहिती तालुका पोलिस ठाण्याचे वरिष्ठ पोलिस निरीक्षक टी.वाय. मुजावर यांनी दिली.



लक्ष्मी टाकळी येथे २ जानेवारी रोजी पहाटेच्या सुमारास अज्ञात-चोरांनी लक्ष्मी टाकळी गावातून शेळ्या चोरून नेल्या होत्या, तसेच १२ जानेवारी २०२६ रोजी गुरसाळे गावातून समाधान बाबर यांच्या शेळ्या चोरून नेल्याची घटना घडली होती. दरम्यान समाधान बाबर यांनी पंढरपूर तालुका पोलीस स्टेशन येथे त्या बाबत तक्रार दिल्यावरून अज्ञात चोराविरुद्ध चोरीचा गुन्हा दाखल करण्यात आला होता. या गुन्ह्यातील फिर्यादी यांना सोबत घेऊन उमदी (ता.जत,जि.सांगली) येथे जाऊन सखोल तपास केला असता शेळ्या चोरी प्रकरणी माधुरी भानुदास चव्हाण (वय ३८,रा. माळीनगर), अंबिका सोमनाथ काळे (वय ३८ रा.सवतगाव, ता.माळशिरस) यांच्याकडे तपास करून तिसरा आरोपी उदय विजय काळे (वय २१,रा.सवतगाव) यांना ताब्यामध्ये घेऊन यांच्याकडून पंढरपूर तालुका पोलीस स्टेशनच्या चोरीच्या गुन्ह्यातील एकूण ६ लाख १५ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. या संशयीत आरोपीकडून एकूण पाच गुन्हे उघडकीस आणण्यात आले आहेत. आरोपी उदय विजय काळे याचे ताब्यातून एकूण चार शेळ्या जप्त केल्या असून त्या फिर्यादी समाधान बाबर यांनी आपल्याच असल्याच्या ओळखलेले आहेत. उदय काळे हा संशयीत आरोपी सध्या कोठडीत आहे.

पोलीस अधीक्षक अतुल कुलकर्णी, पोलीस उपअधीक्षक प्रीतम यावलकर, उपविभागीय पोलीस अधिकारी प्रशांत डगळे यांच्या मार्गदर्शनाखाली पंढरपूर तालुका पोलीस स्टेशनचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक टी.वाय.मुजावर, एपीआय शहाजी गोसावी, पोलीस उपनिरीक्षक भारत भोसले, पोलीस उपनिरीक्षक विक्रम वाढणे, पोलीस उपनिरीक्षक दत्तात्रय तोंडले, एएसआय रमेश बनसोडे, आबासाहेब शेंडगे, सुधाकर हेंबाडे, संजय गुटाळ, सागर गवळी, महिला पोलीस चोपडे आणि चालक पोलीस हसन नदाफ, विलास घाडगे यांनी पार पाडली.




## मतदान हे लोकशाही जपण्याचे प्रभावी साधन : डॉ. काळवणे

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१३ जानेवारी-**

भारत हा लोकशाही समृद्ध देश आहे. ही लोकशाही अधिक बळकट व सक्षम करण्यासाठी मतदान करणे आवश्यक आहे. मतदान हे केवळ हक्क नसून लोकशाही जपण्याचे प्रभावी साधन आहे, असे प्रतिपादन विद्यार्थी विकास विभागाचे संचालक डॉ. केदारनाथ काळवणे यांनी केले.

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभाग व पी.एम.-उषा विभागाच्या संयुक्त विद्यमाने आयोजित एकदिवसीय 'मतदार जनजागृती व्याख्यान' कार्यक्रमात ते बोलत होते. अध्यक्षस्थानी डॉ. राजीवकुमार मेंते (संचालक, संगणकशास्त्र संकुल) होते. प्रास्ताविक राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे संचालक डॉ. राजेंद्र वडजे यांनी केले. मतदान प्रक्रियेबाबतचे गैरसमज, मतदार नोंदणीचे महत्त्व, लोकशाहीतील युवकांची भूमिका यावर चर्चा झाली.

# शंकरनगर येथे त्रिमूर्ती केसरी चषक कुस्ती स्पर्धेला रंगत

**● मल्लांचा उत्साह,खुल्या व वजनी गटातील स्पर्धा**

**तभा वृत्तसेवा,**
**अकलूज, दि. १३ जानेवारी-**

सहकार महर्षी शंकरराव मोहिते-पाटील जयंती समारंभ समिती व प्रताप क्रीडा मंडळ शंकरनगर अकलूज यांच्यावतीने शिवतीर्थ आखाडा शंकरनगर अकलूज येथे सुरु असलेल्या ४७ व्या अखिल भारतीय त्रिमूर्ती केसरी चषक कुस्ती स्पर्धा व वजन गट कुस्ती स्पर्धेत रंगत आली असून मल्लांमध्ये उत्साह निर्माण झाला आहे.

सहकार महर्षी शंकरराव मोहिते-पाटील यांच्या जयंतीनिमित्त दि.१२ ते १४ जानेवारी या कालावधीत स्पर्धेचे आयोजन



केले आहे.

यावेळी माजी उपमुख्यमंत्री विजयसिंह मोहिते-पाटील, समितीचे संस्थापक जयसिंह मोहिते-पाटील, अध्यक्ष मदनसिंह मोहिते-पाटील, स्पर्धा प्रमुख सयाजीराजे मोहिते-पाटील, मल्ल सम्राट रावसाहेब मगर, बाळासाहेब तरसे, चंद्रकांत मगर,दत्ता मगर,वसंतराव जाधव,पोपट भोसले पाटील, बिभीषण जाधव यांच्यासह विविध संस्थांचे आजी-माजी पदाधिकारी,कुस्ती शौकीन मोठ्या संख्येने उपस्थित होते. राष्ट्रकुल सुवर्णपदक विजेते व आंतरराष्ट्रीय कुस्ती मार्गदर्शक राम सारंग व त्यांचे पंच स्पर्धे साठी कार्यरत आहेत.

स्पर्धेच्या दुसऱ्या दिवशी तिसऱ्या फेरी अखेर खुल्या गटात अनिल जाधव करमाळा यांच्यावर मात करत रविराज चव्हाण पंढरपूर हे विजेते झाले. श्रीधर वावरे सांगली यांनी सचिन जरांगे अकलूज यांच्यावर मात केली. संकेत शिंदे कंदर यांनी अभिजीत सोनवणे कंदर यांच्यावर मात केली. आर्यन पाटील माळशिरस यांनी सचिन काळे आटपाडी यांच्यावर मात केली. मोहसीन गावडे पुळुज यांनी महादेव झंजे माळशिरस यांच्यावर मात केली. अविनाश गावडे सराटी यांनी हनुमंत काळे कंदर यांच्यावर मात केली. सुरज राऊत निमगाव यांनी अर्जुन सावंत काटी यांच्यावर मात केली. अर्जुन सुळ मोरोची यांनी आदित्य कोकाटे अकलूज यांच्यावर मात केली. सोमनाथ कोकाटे पुणे यांनी निलेश यादव खुडूस यांच्यावर मात केली. सागर देवकाते निमगाव यांनी विक्रम भोसले खवसपूर यांच्यावर मात केली. सायंकाळी उशिरापर्यंत वजनी गट व खुल्या गटाच्या कुस्त्या सुरू होत्या.

अखिल भारतीय त्रिमूर्ती कुस्ती स्पर्धे साठी ८०, तर वजनी २५ ते ८५ पर्यंतच्या गटा करीता ६०३ मल्लांनी सहभाग घेतला आहे.स्वागत वसंतराव जाधव यांनी केले. सूत्रसंचालन युवराज केचे यांनी केले.

मकर संक्रांति

सोलापूर तरुण भारत

SOLAPUR TARUN BHARAT

न मे कर्मफले स्पृहा

तिळगुळ घ्या... गोड गोड बोला...

सोलापूर, धाराशिव, लातूर, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना, बीड, अहिल्यानगर व सातारा येथून वितरित | सदाफुलीसह

सोलापूर | बुधवार, १४ जानेवारी २०२६

dainiktarunbharat.com
epaper.dainiktarunbharat.com


# काहींची प्रतिष्ठा तर अनेकांचे अस्तित्व पणाला

## प्रचार संपला आता वेध उद्या होणाऱ्या मतदानाचे; काही प्रभागात हाय व्होल्टेज लढती

**तभा वृत्तसेवा । प्रशांत माने**
**सोलापूर, दि १३ जानेवारी-**

महापालिका निवडणुकीचा प्रचार मंगळवारी सायंकाळी पाच वाजता थंडावला आता उमेदवारांसह नेत्यांना वेध लागले आहेत ते गुरुवार, १५ जानेवारी रोजी होणाऱ्या मतदानाचे. या महापालिका निवडणुकीत महायुतीमधील मित्रपक्षच आपसात लढत असल्यामुळे विरोधकांना काहीसा जोर चढला आहे. तर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची झंझावाती सभा सोलापुरात झाली मात्र उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचा सोलापुरातील रोड शो रद्द झाला. उपमुख्यमंत्री अजित पवार हे तर सोलापूरकडे फिरकलेच नाहीत. शिगेला पोहचलेल्या प्रचारामुळे काहींची प्रतिष्ठा तर अनेकांचे अस्तित्व पणाला लागले आहे. प्रमुख लढतही भाजपा आणि सेना-राष्ट्रवादी यांच्यातच असल्याची चर्चा रंगली आहे. काही प्रभागात हाय व्होल्टेज लढती रंगल्या आहेत.

यंदा सोलापूर महापालिकेच्या निवडणुकीत मोठी चुरस निर्माण झाली आहे. भाजपासाठी



एकतर्फी वाटणारी ही निवडणूक मित्रपक्ष शिवसेना व राष्ट्रवादी युती आणि महाविकास आघाडीने काहीसे आव्हान निर्माण करून निवडणुकीत रंग भरला आहे. प्रभाग सातमध्ये भाजपा आणि शिंदेसेना यांच्यात मोठी हाय व्होल्टेज फाईट बघावयाच मिळत आहे

तर शिंदेसेनेच उमेदवार यांनी तर थेट भाजपा आमदार देवेंद्र कोठे यांनाच ओपन चॅलेंज करत आपली गाठ आता विधानसभा निवडणुकीत असल्याचे जाहीरपणे घोषित केले आहे.

प्रभाग तीन मध्ये माजी सभागृहनेते भाजपाचे संजय कोळी आणि पूर्वाश्रमीचे भाजपाचे सभागृहनेते सध्या शिवसेनेकडून लढणारे सुरेश पाटील यांच्यात लढत चुरशीचे आहे. काँग्रेसचे माजी नगरसेवक सिध्दाराम चाकोते किती मते घेणार यावर विजयाची गणिते अवलंबून असणार आहेत.

प्रभाग सहामध्ये पूर्वाश्रमीचे उबाठा ठाकरे सेनेचे जिल्हाप्रमुख आणि सध्याचे भाजपाचे उमेदवार गणेश वानकर आणि शिवसेनेचे माजी नगरसेवक मनोज शेजवाल यांच्यात चुरशीची लढाई आहे.

प्रभाग १४ मध्ये एमआयएमचे तौफिक हत्तुरे यांच्या विरोधात माजी नगरसेवक समाजवादी पक्षाचे उमेदवार रियाज खरादी यांच्यात लढत आहे.

प्रभाग १५ मध्ये पूर्वाश्रमीचे काँग्रेसचे माजी नगरसेवक सध्याच भाजपाचे उमेदवार विनोद भोसले आणि काँग्रेसचे माजी महापौर अरिफ शेख यांच्यात चुरशीची लढत आहे. तर याच प्रभागात ओबीसीमधून काँग्रेसचे माजी पक्षनेते चेतन नरोटे यांच्या विरोधात पूर्वाश्रमीचे काँग्रेसचे पण सध्या भाजपाचे उमेदवार आंबादास करगुळे यांच्यात सामना रंगला आहे.

प्रभाग १६ मध्ये पूर्वाश्रमीचे राष्ट्रवादी काँग्रेसेचे माजी उपमहापौर सध्याचे भाजपाचे उमेदवार दिलीप कोल्हे आणि काँग्रेसचे नरसिंग कोळी यांच्यात लढत आहे. तर पूर्वाश्रमीचे काँग्रेसचे माजी महापौर सध्याचे समाजवादी पक्षाचे उमेदवार यु.एन. बेरिया आणि एमआयएमचे उमेदवार गाझी जहागीरदार हेदेखील मैदानात आहेत.

प्रभाग २२ मध्ये पूर्वाश्रमीचे राष्ट्रवादीचे महापालिकेतील गटनेते किसज जाधव यांच्या विरोधात शिवसेनेचे कुणाल गायकवाड आणि राष्ट्रवादीचे जुबेर शेख हे मैदानात आहेत.

प्रभाग २४ मध्ये भाजपाचे माजी शहराध्यक्ष तथा महापालिकेतील विरोधी पक्षनेते नरेंद्र काळे यांच्या विरोधात शिवसेनेने नव्या दमाचे विकास कदम यांना मैदानात उतरवले आहे. भाजपाचे माजी उपमहापौर

### पालकमंत्री सोलापुरात ठाण मांडून

गतवेळी महापालिकेत एकहाती सत्ता आणि महायुतीतील मित्रपक्षाचे शहरातील अस्तित्व पाहून भाजपाने यंदा महापालिका स्वबळावर लढण्याचा निर्णय घेतला आहे. मुख्यमंत्र्यांची सभा झाली असून महापौर भाजपाचाच होणार, भाजपा यंदा ७५ पार अशा घोषणा करणारे पालकमंत्री जयकुमार गोरे सोलापुरात ठाण मांडून सूत्रे हलवत आहेत.

### पत्रा आणि मंगळवेढा तालमीत चुरशीची लढत

सोलापुरातील बहुचर्चित पत्रा तालीम आणि मंगळवेढा तालमीचा समावेश असलेल्या प्रभाग सातमध्ये यंदा हाय व्होल्टेज लढत आहे. शिवसेनेचे जिल्हा प्रमुख माजी नगरसेवक अमोलबापू शिंदे यांच्या विरोधात भाजपाने पूर्वाश्रमीचे राष्ट्रवादीचे माजी उपमहापौर नाना काळे यांना मैदानात उतरवले आहे. या लढतीकडे संपूर्ण जिल्ह्याचेच लक्ष लागले आहे.

राजेश काळे यांच्या पत्नी उषा काळे यांना एसटी प्रवर्गातून शिवसेनेने मैदानात उतरवले असून त्यांच्या विरोधात वनिता पाटील लढत आहेत. एकूणच काय तर या निवडणुकीत यंदा भाजपाने स्वबळावर मैदानात उतरून रंगत आणली आहे. सर्वांचे आता मतदानाकडे लक्ष लागले आहे.

# प्रचारतोफा थंडावल्या; आता घरोघरी 'तोंडी प्रचार'

**मुंबई, १३ जानेवारी**

मुंबई महापालिकेसह राज्यातील २९ महानगरपालिका निवडणुकांसाठी सुरू असलेल्या प्रचाराच्या तोफा मंगळवारी थंडावल्या. मात्र, घरोघरी जाऊन 'तोंडी प्रचार' करण्याची मुभा निवडणूक आयोगाने दिली असल्याने, प्रत्यक्ष भेटी-गाठींना वेग आला आहे.

राज्यातील २९ महापालिकांमधल्या ८९३ प्रभागांमधल्या २,८६९ नगरसेवकांसाठी शुक्रवारी मतदान होणार आहे. यासाठी एकूण १५,९३१ उमेदवार रिंगणात आहेत. सकाळी साडे ७ ते साडेपाच वाजेदरम्यान हे मतदान होणार आहे.

प्रचाराचा अखेरचा दिवस असल्याने



सर्व राजकीय पक्षांनी जोरदार प्रचार केला. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी नागपुरात बुलेटने रोड शो केला. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी मुंबईत, तर अजित पवार यांनी पुणे आणि पिंपरी-चिंचवडमध्ये रोड शो केला. राज ठाकरे यांनीही पुण्यात प्रचार केला. मुंबई, ठाणे, कल्याण डोंबिवली, नवी मुंबई, उल्हासनगर, मिरा भाईंदर, आणि भिवंडी निजामपूर महानगरपालिका निवडणुकीसाठी विविध पक्षाच्या उमेदवारांनी, नेत्यांनी प्रचारफेऱ्या काढल्या. ठिकठिकाणी पोलिसांनी पथसंचलन करीत नागरिकांना निर्भयपणे मतदान करण्याचे आवाहन केले. (वृत्तसंस्था)

### हिंसाचाराचे गालबोट

**निवडणूक प्रचारकाळात काही शहरांमध्ये हिंसाचाराच्या घटनांमुळे गालबोट लागले. मुंबई, ठाणे, कल्याण-डोंबिवली, छत्रपती संभाजीनगर, सोलापूर, सांगली, मिरज आणि कुपवाडसारख्या ठिकाणी दगडफेकीच्या, उमेदवाराच्या घरावर हल्ल्यासारख्या घटना घडल्या. मुंबई उमेदवारावर चाकू हल्ला, आकोट आणि सोलापुरात तर थेट हत्या झाल्यात.**



नागपूर महापालिकेच्या निवडणुकीच्या प्रचारासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वात मंगळवारी रोड शो आयोजित करण्यात आला. दुचाकीवर प्रचार करताना देवेंद्र फडणवीस

# दहा मिनिटांत 'डिलिव्हरी' बंद

### झेप्टो, ब्लिंकिट, स्विगीबाबत केंद्राचा मोठा निर्णय

**नवी दिल्ली, १३ जानेवारी**

मागील काही वर्षांपासून भारतात क्विक कॉमर्सची झपाट्याने वाढ होत आहे. मात्र, आता या क्षेत्रासंबंधी केंद्र सरकारने मंगळवारी एक मोठा निर्णय घेतला आहे. देशभरातील डिलिव्हरी बॉय आणि गिग वर्कर्सच्या सुरक्षेच्या पृष्ठभूमीवर केंद्राने दहा मिनिटांत डिलिव्हरी देण्यावर बंदी घातली आहे. केंद्रीय कामगार मंत्रालयाने यासंदर्भात देशातील प्रमुख ऑनलाईन डिलिव्हरी/क्विक कॉमर्स कंपन्यांशी चर्चा केल्यानंतर हा निर्णय घेण्यात आला.



केंद्रीय कामगार मंत्री मनसुख मांडविया यांनी या संदर्भात ब्लिंकिट, झेप्टो, स्विगी आणि झोमॅटोसारख्या कंपन्यांच्या अधिकाऱ्यांशी चर्चा केली आणि डिलिव्हरी वेळेची मर्यादा काढून टाकण्याचा निर्देश दिला. यानंतर सर्व कंपन्यांनी सरकारला आश्वासन दिले की, ते आपापल्या ब्रॅण्ड जाहिराती आणि सोशल मीडियावरून डिलिव्हरी वेळेची मर्यादा काढून टाकतील. म्हणजेच, आता यापुढे कोणतेही सामान दहा मिनिटांत मिळणार नाही. ब्लिंकिटकडून तत्काळ अंमलबजावणी सरकारी निर्देशांचा तात्काळ परिणाम ब्लिंकिटवर दिसून आला. कंपनीने आपल्या सर्व जाहिरात आणि मंचावरून दहा मिनिटांत डिलिव्हरीचा उल्लेख हटवण्याची घोषणा केली आहे.

कंपनीने आपली टॅगलाईन बदलत '१० मिनिटांत १०,०००+ उत्पादने' ऐवजी, 'तुमच्या दारात ३०,०००+ उत्पादने' अशी केली आहे. येत्या काही दिवसांत इतर क्विक कॉमर्स कंपन्यांकडूनही अशाच प्रकारचे निर्णय घेतले जातील

# भाजपाने विकासाच्या मुद्द्यांवर दिला भर

### दुहेरी पाईपलाईन, विमानसेवा, आयटीपार्क ठरणार निर्णायक

### महापालिकेत सत्ता आणण्याचा पालकमंत्र्यांचा निर्धार



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १३ जानेवारी-**

सोलापूर महापालिका निवडणुकीत सध्याचा कल पाहता भारतीय जनता पार्टीचे पारडे जड असल्याचे दिसत आहे. याला एकमेव कारण म्हणजे विकासाचा मुद्दा. भाजपा केवळ शहर विकासाचा मुद्दे घेऊन या निवडणुकीत उतरली आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची टर्निंग पॉईंट ठरलेली सभा आणि पालकमंत्री जयकुमार गोरे यांच्यासह चारही आमदारांचे विकासाचे व्हिजन याचा फायदा भाजपाच्या उमेदवारांना निश्चितच होण्याची शक्यता आहे.

पहिल्यापासून पालकमंत्री जयकुमार गोरे आणि चारही आमदारांची निवडणुकीची दिशा ही केवळ विकासाची होती. केंद्रात भाजपाचे सरकार, राज्यात भाजपाचे सरकार आता महापालिकेतही पुन्हा भाजपा सरकार आले तर सोलापूरच्या विकासाला एक नवी उर्जा प्राप्त होणार आहे. दुहेरी पाईपलाईनसाठी ८९२ कोटी रुपये दिले आणि त्याचे काम सुरु झाले. सोलापूरची विमानसेवा सुरु झाली आणि आता नाईट लँडींगसाठी प्रयत्न सुरु आहेत. आय टी पार्कची घोषणा झाल्यानंतर अवघ्या चार महिन्यात जागा निश्चित होऊन काम सुरु झाले. वर्षभरात आयटीपार्कची उभारणी सुरु होऊन येथील तरुणांच्या हाताला काम मिळणार आहे. ही तीनही महत्वाची कामे केवळ भाजपाने करुन दाखवली. विरोधक मात्र केवळ टिका करण्यात आणि इतर गोष्टीत व्यस्त राहिले.

महापालिका निवडणुका जाहीर झाल्यापासून पालकमंत्री जयकुमार गोरे हे सोलापुरात तळ ठोकून आहेत. चारही आमदारांना सोबत घेऊन प्रत्येक प्रभागात सभा, पदयात्रा यामध्ये स्वतः सहभागी होत आहेत. सोलापुरातील प्रत्येक भागातील प्रश्न जाणून घेऊन ते सोडविण्यासाठी काय करता येईल याचा विचार करताना दिसत आहेत. याचा सकारात्मक परिणाम शहरातील नागरिकांकडून मिळत आहे.

### मुख्यमंत्र्यांची सभा ठरली टर्निंग पॉईंट



मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची हरिभाई देवकरण प्रशालेच्या मैदानावर विजयी संकल्प सभा पार पडली. एकतर बाराबंदी वेशात येऊन मुख्यमंत्री फडणवीस यांनी सोलापूरकरांची मने जिंकली. त्याच बरोबर किरकोळ अपवाद वगळता त्यांनी विरोधकांवर टिकाच केली नाही. देवाभाऊंनी ही निवडणूक केवळ विकासाच्या मुद्दयांभोवती असल्याचे स्पष्ट केले. त्यांनी संपूर्ण भाषणात शहर आणि जिल्ह्याच्या विकासाच्या मुद्दयांना हात घातला. सोलापूरकरांना दररोज पिण्याचे पाणी देणार, विमानसेवा सुरु झाली आता दुसऱ्या शहरात विमानसेवा व नाईट लँडिंगची सुविधा देणार, आयटी पार्कची सुरुवात झाली ते पूर्ण करुन येथील युवकांच्या हाताला सोलापूरातच काम देणार या प्रमुख विषयांसह नाशिक-सोलापूर- अक्कलकोट महामार्ग होत असल्याचे सांगत वाढवण बंदराशी सोलापूर जोडण्यात येणार असल्याचे सांगितले. सोलापूरच्या विकासाच्या वाटा रुंद करण्याचे काम मुख्यमंत्री फडणवीस यांनी केले. त्यांची अभूतपूर्व अशी सभा या निवडणुकीतील टर्निंग पॉईंट ठरणार यात शंका नाही.

पालकमंत्री विरोधकांवर टिका करण्यापेक्षा विकासाचे व्हिजन सांगत निवडणुकीला सामोरे जात आहेत. यामुळे अनेकांचे धाबे दणाणले आहेत. विरोधकांकडे बोलण्यासाठी मुद्देच राहिले नाहीत. भाजपाने ही निवडणूक केवळ विकासाच्या मुद्दयावर आणून ठेवली आहे.

आम्ही विकासकामे करणार तुम्ही काय करता? ते सांगा हाच भाजपाचा निवडणुकीतील नारा ठरला आहे. शहराला गती देणाऱ्या तीनही कामांचा शुभारंभ झाला; आता सोलापुरातील गुंठेवारीचा प्रश्न, प्राणीसंग्रहालयाची पुर्नउभारणी, बोरामणी विमानतळ, धूळमुक्त शहर, पर्यटनाचा आराखडा, एमआयडीसीत सुविधा, हद्दवाढ भागातील सोईसुविधा, आयुर्वेदिक दवाखान्याची उभारणी, शहरात मराठी बरोबरच इंग्रजी माध्यमांच्या शाळा उभारणा, कर प्रणालित सुसुत्रता आणून नागरीकांवरील करांचा बोजा कमी करणार, बांधकाम परवाने सुलभ करणार यासह अनेक आश्वासने भाजपाने आपल्या जाहिरनाम्यात दिली आहे. नागरीकांना भाजपाचा विकासाचा हा जाहिरनामा आश्वासक वाटत आहे.

प्रत्येक ठिकाणी चर्चा आहे ती केवळ विकासाची. भाजपाने संपूर्ण निवडणूक विकासाच्या मुद्दयावर आणून ठेवली आहे. याचा फायदा भाजपाला या निवडणुकीत होणार आहे.

### मुख्यमंत्री ममता बॅनर्जी १७ गुन्ह्यांत आरोपी

**नवी दिल्ली :** दरोडा, लूट, घोटाळे, आरोपींना संरक्षण आणि चोरी यांसारख्या १७ गुन्ह्यांमध्ये पश्चिम बंगालच्या मुख्यमंत्री ममता बॅनर्जी, शासकीय अधिकारी, काही मंत्र्यांचा सहभाग असल्याने याचा निष्पक्ष तपास करण्यासाठी सीबीआय चौकशीची परवानगी द्यावी, अशी मागणी ईडीने सर्वोच्च न्यायालयात केली.

# आम्ही सोलापूरचे डॉन; अक्कलकोटमध्ये जावून दादागिरी

**तभा वृत्तसेवा**
**अक्कलकोट दि.१३ जानेवारी**

आम्ही सोलापूरचे डॉन आहोत, सुपारी घेवुन लोकांना मारणे हाच आमचा धंदा आहे असे म्हणत अक्कलकोट येथील फत्तेसिंह ग्राउंड जवळ वॉकिंग करणारा दोघांना चार आरोपीने धारधार हत्याराने एकाला डोक्यात मारुन गंभीर जखमी करून त्याचे खिशातून जबरदस्तीने २ हजार ७०० रु.रोख रक्कम काढून घेतले आहे. या बाबत उत्तर पोलिस स्टेशन येथे गुन्हा दाखल झाला असून कोर्टाकडून चारही आरोपींना तीन दिवसांची पोलिस कष्टडी मिळाला आहे.

सोमवार दि.१२ रोजी रात्री साडे आठ ते नऊ दरम्यान अक्कलकोट येथील फत्तेसिंह ग्राउंडजवळ वॉकिंग करणारा दोघांना आरोपी समर्थ सोमनाथ जाधव वय २० वर्षे राहणार जुनी मिल चाळ सोलापूर, अथर्व बलभीम अंधारे वय २१ वर्षे राहणार जुनी मिल चाळ सोलापूर, जुनैद मोहसिन शेख वय २२ वर्षे राहणार जुनी मिल चाळ सोलापूर, श्रेयश सिद्राम गायकवाड वय २२ वर्षे रा. सेंटलमेंट फ्री कॉलनी नंबर २ सोलापूर असे चार आरोपीने संगनमत करून फिर्यादी शरणप्पा यांना लाथाबुक्याने मारहाण करुन फिर्यादीचे खिशातील २७०० रुपये जबरदस्ती हिसकावून काढून घेतले, चारही आरोपींना कोर्टा समोर हजर केले असता त्यांना तीन दिवसांची पोलिस कोठडी मिळाली आहे. अक्कलकोट उत्तर पोलीस स्टेशन येथे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलीस निरीक्षक दिपक भिताडे यांच्या मार्गदर्शनाखाली पोहेकॉ ५६७ कोळी हे अधिक तपास करीत आहे.

### बिनविरोध निवड प्रकरणी आज उच्च न्यायालयात सुनावणी

**मुंबई, १३ जानेवारी**

महापालिका निवडणुकीतील बिनविरोध निवडून आलेल्या उमेदवारांविरोधात मुंबई उच्च न्यायालयात दाखल विविध याचिकांवर बुधवारी सुनावणी होणार आहे. आता न्यायालयाच्या निर्णयावर बिनविरोध उमेदवारांचे भवितव्य निर्भर आहे.

राज्यात २९ महापालिका निवडणुका सुरू आहेत. त्यात सत्ताधारी आणि विरोधक आमने-सामने आले आहेत. मात्र, या निवडणुकांच्या मतदानापूर्वी राज्यात ६८ ठिकाणी बिनविरोध उमेदवार निवडून आले आहेत. विशेष म्हणजे, हे उमेदवार सत्ताधारी महायुतीचे आहेत. त्यात सर्वाधिक बिनविरोध भाजपाचे आणि त्याखालोखाल एकनाथ शिंदेंच्या नेतृत्वातील शिवसेना पक्षाचे तर, राष्ट्रवादी काँग्रेसचे आहेत.

या बिनविरोध निवडीविरोधात मनसे नेते अविनाश जाधव आणि अन्य काही जणांनी मुंबई उच्च न्यायालयात धाव घेतली होती. आता सदर याचिकांवर बुधवारी सुनावणी होणार आहे.

उमेदवारांना पैशाची आमिषे, दबाव आणि दहशतीचा वापर करून सत्ताधाऱ्यांनी निवडणूक बिनविरोध करण्याचा प्रयत्न केला, असा मनसेचा आरोप आहे. (वृत्तसंस्था)

# श्वानाने हल्ला केल्यास राज्य सरकार भरपाई देणार

### सर्वोच्च न्यायालयाची स्पष्टोक्ती

### काळजी वाटते त्यांनी श्वान घरी न्यावे

**नवी दिल्ली, १३ जानेवारी**

श्वान चावल्याने मुले किंवा वृद्ध जखमी झाल्यास अथवा त्यांचा मृत्यू झाल्यास आणि राज्यांनी वेळीच पावले न उचलल्यास आम्ही मोठी नुकसान भरपाई आकारू, अशी कठोर भूमिका सर्वोच्च न्यायालयाने मंगळवारी घेतली. नियमांची अंमलबजावणी करण्यासाठी राज्यांनी मागील पाच वर्षांत काहीही केले नाही, अशा शब्दांत न्यायालयाने राज्यांची जबाबदारी निश्चित केली.



भटक्या श्वानांना खायला घालणाऱ्यांचीही जबाबदारी निश्चित केली जाईल. तुम्हाला या प्राण्यांवर इतके प्रेम असेल, तर त्यांना तुमच्या घरी का घेऊन जात नाही? हे श्वान रस्त्यांवर का फिरत राहावेत, लोकांना चावावेत आणि घाबरवावेत? त्यांना आम्ही असेच सोडू शकत नाही, असे न्यायालयाने म्हटले.

> आम्हाला अर्धा दिवस अधिकाऱ्यांना उत्तरे मागण्यात घालवावा लागतो. त्यांच्या निष्क्रियतेमुळे समस्या हजारपटीने वाढली आहे. न्यायालयीन कामकाज हे सार्वजनिक व्यासपीठ बनले आहे. २०११ मध्ये माझी बढती झाल्यापासून, मी कधीही इतके लांबलचक युक्तिवाद ऐकले नाहीत आणि कोणीही मानवांसाठी इतका लांब युक्तिवाद केला नाही.
> **न्या. संदीप मेहता**

श्वानांमध्ये एक विशिष्ट प्रकारचा विषाणू असतो. त्यावर कोणताही उपचार नाही. आतापर्यंत चार दिवसांच्या सुनावणीत भावना केवळ श्वानांसाठीच दिसत आहे. रस्त्यांवरील श्वान नऊ वर्षांच्या बालकावर हल्ला करतात, त्यासाठी जबाबदार कोण असेल आणि आम्ही डोळे झाकून घ्यायचे का, असा सवाल न्या. विक्रम नाथ, न्या. संदीप मेहता आणि न्या. एन. व्ही. अंजारिया यांचा समावेश असलेल्या न्यायासनाने उपस्थित केला. या प्रकरणी आता पुढील सुनावणी २० जानेवारी रोजी होईल. (वृत्तसंस्था)

## अग्रलेख...

# चीनने नखे काढलीच

व्याप्त काश्मीरच्या मुद्यावर चीनने पुन्हा एकदा भारताची चिंता वाढविणारी भूमिका घेतली आहे. गलवान खोऱ्यातील संघर्षानंतर भविष्यात दोन्ही देशांमध्ये शक्सगम खोऱ्यावरून लष्करी तणाव निर्माण होण्याची चिन्हे आहेत. शक्सगम खोरे व्याप्त काश्मिरातील गिलगिट-हुंझाचा भाग आहे. नैसर्गिकदृष्ट्या अत्यंत मनोहारी असलेला हा भाग लष्करी आणि रणनीतिकदृष्ट्याही महत्त्वाचा आहे. स्वातंत्र्यानंतर गिलगिट एजन्सीचा भाग ब्रिटिशांच्या ताब्यात होता. येथे कार्यरत इंग्रज लष्करी अधिकारी विलियम ब्राऊन हा फितूर झाला आणि त्याने जम्मू-काश्मीर संस्थानचा अत्यंत मोक्यावरील हा प्रदेश पाकिस्तानात विलीन केल्याचे घोषित केले. पहिल्या भारत-पाकिस्तान युद्धात तत्कालीन पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू यांच्या चुकीच्या धोरणांमुळे गिलगिट-बाल्टिस्तान हा प्रदेश शत्रूच्या ताब्यात गेला. स्कार्दू या ठिकाणी काश्मीर संस्थानचे सैनिक तैनात होते; पण हिवाळा असल्याने भारतीय सैनिक त्यांना मदत पोहोचवू शकले नाहीत. परिणामी कारगिलपासून जवळ असलेले हे शहर पाकिस्तानच्या ताब्यात गेले. येथे हवाईतळ उभारण्यात आला. येथे चीनची लढाऊ विमाने तैनात आहेत. पाकिस्तान आणि चीन यांच्यात सीमारेषा नव्हती. २ मार्च १९६३ रोजी दोन्ही देशांमध्ये एक सीमा करार झाला, जो पूर्णपणे अवैध आणि बेकायदेशीर आहे. चीनमधील पेकिंग शहरात पाकिस्तानचे तत्कालीन परराष्ट्र मंत्री झुल्फीकार अली भुट्टो आणि चीनचे परराष्ट्र मंत्री मार्शल चेन यी यांनी २ करारांवर स्वाक्षऱ्या केल्या. या करारांनुसार काश्मीरच्या उत्तेरकडील ५२०० वर्ग किलोमीटर एवढा भूभाग चीनला परस्पर देऊन टाकला. याच भागातून चायना-पाकिस्तान इकॉनॉमिक कॉरिडॉर (सीपेक) हा प्रकल्प गेला आहे. या भागात मोठ्या प्रमाणात चीनकडून महामार्ग, रेल्वे मार्ग उभारण्यात आले आहेत. एक महामार्ग तर थेट बलुचिस्तानच्या ग्वादार बंदरापर्यंत पोहोचला आहे. ९ जानेवारीला साप्ताहिक पत्रकार परिषदेत सीपेक मुद्यावर बोलताना परराष्ट्र मंत्रालयाचे प्रवक्ते रणधीर जयस्वाल यांनी १९६३ चा चीन-पाकिस्तान सीमा करार अवैध असून, भारत या कराराला मानत नसल्याचे स्पष्ट केले. एवढेच नव्हे तर सीपेक बेकायदेशीर असून, भारतीय भूभागात प्रकल्प उभारणे कोणत्याही स्थितीत मान्य नाही. शक्सगम खोरे आमच्या जम्मू-काश्मीर आणि लडाख या केंद्रशासित प्रदेशाचा अविभाज्य भाग आहे. आपल्या हिताचे रक्षण करण्यासाठी योग्य ती कारवाई करण्याचे अधिकार भारताला आहे, असे त्यांनी कडक शब्दांत सांगितले. या शक्मगम खोऱ्यावर चीनच्या परराष्ट्र विभागाच्या प्रवक्त्या माओ निंग यांनी हा भाग आमचाच असून, पाकिस्तान आणि चीन या दोन सार्वभौम देशांमध्ये झालेल्या सीमा करारानुसार आमच्या भूभागात पायाभूत सुविधा निर्माण करण्याचा अधिकार असल्याचे सांगितले.

भूतकाळात केलेल्या चुकांचे भावी पिढ्यांना परिणाम भोगावे लागतात, याचे तंतोतंत उदाहरण म्हणजे जम्मू-काश्मीर होय. काश्मीरचे संस्थानिक राजा हरि सिंग यांनी संपूर्ण जम्मू-काश्मीर भारतात विलीन करण्याचा निर्णय घेतला. अशावेळी पंडित जवाहरलाल नेहरू यांच्या नेतृत्वातील काँग्रेस सरकारने देशहित लक्षात घेऊन त्वरित संपूर्ण जम्मू-काश्मीर लष्कर पाठवून ताब्यात घेण्याची आवश्यकता होती. पण, दुर्दैवाने कालापव्यय करीत त्यांनी पाकिस्तानला घुसखोर काश्मिरात पाठविण्याची संधी दिली. भारताकडून ठोस प्रतिसाद मिळत नसल्याचे पाहून ऐन हिवाळ्यात पाकिस्तानने गिलगिट-बाल्टिस्तान आणि काश्मीर खोऱ्यात हजारो घुसखोर आणि सोबत सैनिक घुसविले. महाराजा हरि सिंग यांनी विलीनीकरण दस्तावेजावर स्वाक्षरी केल्यानंतर नेहरू यांनी लष्करी हालचाली सुरू केल्या. पण, तोपर्यंत खूप उशीर झाला होता. कारण, तोपर्यंत लष्करीदृष्ट्या अत्यंत महत्त्वाच्या असलेल्या गिलगिट-बाल्टिस्तान या भूभागावर पाकिस्तानने अवैधरीत्या ताबा मिळविला होता. या प्रदेशाला चीन, अफगाणिस्तान, पाकिस्तानच्या सीमा भिडतात. या भूभागातून भारताला थेट युरोपियन देशांसोबत व्यापार करता आला असता. पण, भविष्याचा थोडाही विचार न करता तत्कालीन पंतप्रधान जवाहरलाल नेहरू यांनी काश्मीर मुद्यावर बोटचेपे धोरण स्वीकारले. याचे गंभीर परिणाम आज आपण भोगत आहोत. उलट चीनने भविष्याचा विचार करताना तिबेट तर बळकावलाच पण १९६२ मध्ये लडाखमधील अक्साई चीन हा मोठा भूभागही गिळंकृत केला. 'हिंदी-चिनी भाई भाई'च्या घोषणांमध्ये नेहरू आणि त्यांचे पाठीराखे मशगूल असताना तिकडे चीन काराकोरम महामार्ग उभारण्यासाठी तळमळत होता. १९६१ मध्ये संसदेत अक्साई चीनवर चर्चा सुरू होती. चीनच्या आक्रमक हालचालींमुळे संसद सदस्य चिंता व्यक्त करीत होते. मात्र, पंतप्रधान जवाहरलाल नेहरू यांना काश्मीरशी काहीच घेणेदेणे नव्हते, हे त्यांच्या भूमिकेवरून दिसून आले : ''अक्साई चीन, जिथे गवताचे एक पातेही उगवत नाही आणि १७ हजार फूट उंचीवरील हे बर्फाळ ठिकाण मानवासाठी राहण्यास योग्य नाही. तसेच हा भाग कुठे आहे हेही आपल्याला माहीत नाही.'' नेहरूंच्या या विधानावर खासदारांनी आश्चर्य व्यक्त केले. देशाचा पंतप्रधान असे विधान कसे काय करू शकतो, असे भाव खासदारांच्या चेहऱ्यावर होते. मात्र, माजी सैनिक असलेले खासदार महावीर त्यागी हे उभे राहिले आणि व्यंग करीत म्हणाले, ''माझ्या डोक्यावर एकही केस उगवत नाही. याचा अर्थ माझे डोके बेकार आहे काय?'' त्यागी यांच्या या वाक्यावर सर्व खासदार एका क्षणासाठी अवाक् झाले; पण दुसऱ्याच क्षणी सभागृहात हास्याचे फवारे उडाले. पण, दुसऱ्याच वर्षी चीनने १९६२ मध्ये चीनने आक्रमण करीत अक्साई चीनसह लडाखचा बराच भूभाग ताब्यात घेतला. चीनबाबत पंडित नेहरू यांची भूमिका किती तकलादू आणि आत्मघातकी ठरणारी होती हे सिद्ध झाले. चीनने अक्साई चीन घेऊन आज ६४ वर्षे उलटली आहेत. भारत आजही अक्साई चीन आपला भूभाग मानत असला तरी या भागावरील चीनची मगरमिठी अधिकच घट्ट झाली आहे. यावर कडी म्हणजे चीनने आता शक्सगम खोऱ्यावरही दावा सांगितला. या खोऱ्यातून सीपेक-२ अंतर्गत चीनने पाकिस्तानला जोडणारा एक महामार्ग उभारला आहे. चीनचे हे कृत्य चिथावणी देणारे तर आहेच; पण आंतरराष्ट्रीय कायदे आणि नियमांचे उल्लंघनही आहे. महामार्ग उभारणीला भारताने विरोध करीत शक्सगम खोरे आमचा अविभाज्य घटक असून चीनचे कृत्य बेकायदेशीर असल्याची भूमिका मांडली. यावर तिळपापड झालेल्या चीनने ''चोर ते चोर अन् वरून शिरजोर'' या उक्तीप्रमाणे हे खोरे आमचेच असल्याचे विधान केले.

तत्कालीन पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू यांचे चीनबाबतचे धोरण किती चुकीचे आणि आत्मघातकी होते हे आता सिद्ध होत आहे. नेहरूंना दोष देण्यात काय अर्थ आणि आणखी किती काळ नेहरूंना जबाबदार धरणार, असे आजचे काँग्रेसचे नेते म्हणत असले तरी, पश्चिम आणि पूर्वोत्तर सीमेवर नेहरूंच्याच चुकांमुळे भारताला एकाचवेळी दोन शत्रूंचा सामना करावा लागत आहे, हे विसरता येणार नाही. चीन आणि पाकिस्तान सातत्याने भारताला अडचणीत आणण्याचे प्रयत्न करीत आहेत. एकीकडे सीमेपलीकडून दहशतवादी पाठवून भारताला जखमी करण्याचे काम पाकिस्तान सातत्याने करीत असतो तर दुसरीकडे चीन डोकलाम, गलवानसारख्या कुरापती करीत दबाव आणण्याचा प्रयत्न करीत असतो. व्यापार कराराच्या मुद्यावर आधीच अमेरिकेसोबत तणाव असताना चीनने शक्सगम खोऱ्याचा मुद्दा उपस्थित करीत भारताच्या चिंता वाढविल्या आहेत. पूर्वेकडे बांगलादेशही भारताच्या मुळावर उठला आहे. ज्या देशाला आपण जन्माला घातले, तोच आता आपल्याला वाकुल्या दाखवीत आहे. त्यामुळे भारताला एकाचवेळी पाकिस्तान, चीन आणि बांगलादेश या त्रिकुटाशी सामना करावा लागत आहे. बांगलादेशला ढेकणासारखे चिरडण्यास भारताला थोडाही वेळ लागणार नसला तरी पाकिस्तान-चीन यांचे एकत्रित आव्हान चिंतेत टाकणारे आहे. कारण, शक्सगम खोऱ्याचा संबंध या दोन्ही देशांशी आहे. पण, आज ना उद्या भारताला या आव्हानाचा सामना करावाच लागणार हे मात्र नक्की.

## विशेष

# मोहिनी घालणारे रेल्वेचे पूल

**प्रा. सुखदेव बखळे**

भारतीय रेल्वे २१ व्या शतकातील काही सर्वांत महत्त्वाकांक्षी पायाभूत सुविधा प्रकल्प राबवत आहे. हे प्रकल्प राष्ट्रीय एकता मजबूत करणे, रसद सुधारणे आणि आधुनिक रेल्वे नेटवर्कचा विस्तार करणे या स्वरूपाचे आहेत. कठीण भूभागात बांधलेल्या कौशल्यपूर्ण पुलांपासून मालवाहतूक कॉरिडॉर आणि 'हाय-स्पीड' रेल्वेपर्यंत हे प्रकल्प भारताच्या वाढत्या अभियांत्रिकी क्षमता आणि दीर्घकालीन दृष्टिकोनाचे प्रदर्शन जगासमोर करत आहेत. सर्वांत महत्त्वाच्या प्रकल्पांपैकी एक म्हणजे उधमपूर-श्रीनगर-बारामुल्ला रेल्वे लिंक (यूएसबीआरएल). हा अंदाजे ४४ हजार कोटी रुपये खर्चून बांधलेला अत्यंत धोरणात्मक आणि राष्ट्रीय महत्त्वाचा प्रकल्प आहे. २७२ किलोमीटर लांबीचा रेल्वे ट्रॅक हिमालयीन प्रदेशातून जातो. या प्रकल्पात जगातील सर्वांत उंच रेल्वे आर्च ब्रीज, चिनाब रेल ब्रीजदेखील समाविष्ट आहे. नदीपासून ३५९ मीटर उंचीवर असलेला हा पूल आयफेल टॉवरपेक्षा उंच आहे. हा १,३१५ मीटर लांबीचा स्टील आर्च ब्रीज भूकंप आणि वाऱ्याच्या परिस्थितीला तोंड देण्यासाठी डिझाईन केला आहे. या प्रकल्पात अंजी नदीवरील भारतातील पहिला केबल-स्टेड रेल्वे पूल असून, त्याला 'अंजी रेल ब्रीज' म्हणून ओळखले जाते. त्याचाही समावेश आहे. या प्रकल्पात ३६ बोगदे (११९ किलोमीटर लांबी) आणि ९४३ पूल समाविष्ट आहेत. 'यूएसबीआरएल' काश्मीर खोऱ्याला सर्व हवामान रेल्वे कनेक्टिव्हिटी प्रदान करते. यामुळे या प्रदेशात वाहतूक, पर्यटन आणि आर्थिक क्रियाकलाप वाढत आहेत.

तामिळनाडूमधील नवीन पंबन रेल्वे पूल हा भारतातील पहिला व्हर्टिकल समुद्री पूल आहे. अंदाजे ५५० कोटी रुपये खर्चून बांधलेला, २.०८ किलोमीटर लांबीचा हा पूल १०० स्पॅनचा आहे. त्यात १८.३ मीटरचे ९९ स्पॅन आणि ७२.५ मीटरचा मुख्य स्पॅन समाविष्ट आहे. या पुलात ३३३ पाईल्स आणि १०१ पाईल्स कॅप्स असलेली एक मजबूत 'सबस्ट्रक्चर सिस्टिम' आहे, जी स्ट्रक्चरल स्थिरता प्रदान करते. त्यात कार्यक्षम भार वितरणासाठी डिझाईन केलेले ९९ 'ॲप्रोच गर्डर्स'देखील समाविष्ट आहेत. हा पूल आव्हानात्मक समुद्री परिस्थिती आणि तीव्र किनारी वाऱ्यांना तोंड देण्यासाठी सक्षम आहे. त्याचे आयुष्य वाढवण्यासाठी, एक गंज संरक्षण प्रणाली प्रदान करण्यात आली आहे. ती पुलाचे सेवा आयुष्य देखभालीशिवाय ३८ वर्षांपर्यंत आणि कमीत कमी देखभालीसह ५८ वर्षांपर्यंत वाढवू शकते. हा नवीन पूल एक महत्त्वाचे तीर्थक्षेत्र आणि पर्यटनस्थळ असलेल्या रामेश्वरमला रेल्वे कनेक्टिव्हिटी सुनिश्चित करतो. त्याच्या प्रगत डिझाईन आणि अभियांत्रिकीची दखल घेऊन नवीन पंबन रेल्वे पुलाला पूल डिझाईन श्रेणीमध्ये प्रतिष्ठित स्टील स्ट्रक्चर्स आणि मेटल बिल्डिंग्ज पुरस्कार २०२४ प्रदान करण्यात आला आहे.

भारतीय रेल्वेने ईशान्येकडील राज्यांमध्येदेखील लक्षणीय प्रगती केली आहे. अनेक वर्षांपासून या प्रदेशाला गंभीर कनेक्टिव्हिटी आव्हानांचा सामना करावा लागला. २०१४ पासून ईशान्येकडे १,६७९ किलोमीटरहून अधिक रेल्वे ट्रॅक टाकण्यात आला आहे. २,५०० किलोमीटरहून अधिक मार्गांचे विद्युतीकरण करण्यात आले आहे. ४७० हून अधिक रोड ओव्हरब्रिज आणि अंडरब्रिज बांधण्यात आले आहेत. बैराबी-सैरंग नवीन लाईन पूर्णपणे कार्यान्वित झाली आहे. ती पहिल्यांदाच आयझॉलला रेल्वे नेटवर्कशी जोडते. आयझॉल आता ईशान्येकडील चौथी राजधानी आहे. ती राष्ट्रीय रेल्वे नेटवर्कशी जोडलेली आहे. 'अमृत भारत स्टेशन योजने'अंतर्गत ईशान्येकडील ६० स्थानकांचा पुनर्विकास केला जात आहे. शिवोक-रंगपो, दिमापूर-कोहिमा आणि जिरीबाम-इम्फाळसारखे मोठे प्रकल्पदेखील वेगाने प्रगती करत आहेत. हे प्रकल्प ईशान्येकडील देशाच्या उर्वरित भागाशी आर्थिक आणि सामाजिक एकात्मतेत योगदान देत आहेत. लुधियाना ते सोननगरपर्यंत पसरलेला 'इस्टर्न डेडिकेटेड फ्रेट कॉरिडॉर' (ईडीएफसी) १,३३७ किलोमीटर लांब आणि पूर्णपणे कार्यरत आहे. जवाहरलाल नेहरू पोर्ट टर्मिनल ते दादरी यांना जोडणारा 'वेस्टर्न डेडिकेटेड फ्रेट कॉरिडॉर' १,५०६ किलोमीटर लांबीचा आहे. त्यापैकी १,४०४ किलोमीटर किंवा ९३.२ टक्के पूर्ण झाले आहे. दोन्ही कॉरिडॉर एकत्रितपणे २,८४३ किलोमीटर लांबीचे आहेत. आजपर्यंत २,७४१ किलोमीटरचे काम सुरू झाले आहे. ते एकूण लांबीच्या अंदाजे ९६.४ टक्क्यांपर्यंत आहे. हे समर्पित कॉरिडॉर प्रवासी मार्गांवरील गर्दी लक्षणीयरीत्या कमी करत आहेत, प्रवासाचा वेळ, लॉजिस्टिक्स खर्च कमी करत आहेत आणि उद्योग आणि बंदरांसाठी विश्वासार्हता सुधारत आहेत. हे समर्पित कॉरिडॉर भारतातील मालवाहतूक बळकट करत आहेत आणि जलद आर्थिक वाढीला चालना देत आहेत. समर्पित मालवाहतूक कॉरिडॉर भारतीय रेल्वे 'हाय-स्पीड रेल्वे'च्या क्षेत्रातही प्रगती करत आहे. मुंबई-अहमदाबाद हाय-स्पीड रेल्वे प्रकल्प 'एनएचएसआरसीएल'द्वारे राबवला जात आहे. २१ डिसेंबर २०२५ पर्यंत एकूण ५०८ किलोमीटर ट्रॅकपैकी ३३१ किलोमीटर व्हायडक्टचे काम पूर्ण झाले आहे. ४१० किलोमीटरसाठी पिअरचे काम पूर्ण झाले आहे. १७ नदी पूल, पाच पीएससी पूल आणि ११ स्टील पूल आधीच पूर्ण झाले आहेत. सुमारे २७२ किलोमीटर आरसी ट्रॅक बेड बांधण्यात आला आहे. ४,१०० हून अधिक 'ओएचई' मास्ट बसवण्यात आले आहेत.

महाराष्ट्रात मोठ्या बोगद्याचे बांधकाम सुरू आहे. सुरत आणि अहमदाबादमध्ये रोलिंग स्टॉक डेपोदेखील विकसित केले जात आहेत. या प्रकल्पामुळे भारतात जागतिक दर्जाचे 'हाय-स्पीड' रेल्वे तंत्रज्ञान येईल. यामुळे दोन प्रमुख आर्थिक केंद्रांमधील प्रवासाचा वेळ लक्षणीयरीत्या कमी होईल. मुंबई-अहमदाबाद बुलेट ट्रेन प्रकल्पांतर्गत सुरत जिल्ह्यात बांधलेला एक व्हायडक्ट असाच दखलपात्र आहे. पहिल्या वंदे भारत स्लीपर ट्रेनचे आगमन, २०२७ पर्यंत प्रस्तावित बुलेट ट्रेन प्रकल्प आणि काश्मीर आणि मिझोरामच्या दुर्गम भागात रेल्वे मार्गांचा विस्तार हे सर्व सूचित करतात की भारतीय रेल्वे केवळ वाहतुकीचे नाही तर बदलाचे वाहनदेखील बनले आहे. ते नवीन सीमांवर स्वतःची पुनर्परिभाषा करत आहे. गेल्या वर्षीच ते काश्मीर खोरे आणि मिझोरमची राजधानी आयझॉलला जोडले, जे देशाच्या उत्तर आणि पूर्व सीमांना उर्वरित भारताशी जोडते. देशातील पहिला उभ्या-लिफ्ट रेल्वे समुद्री पूल, पंबन पुलापर्यंतदेखील पोहोचले, जे पाल्क सामुद्रधुनीपर्यंत पसरते आणि दक्षिणेकडील रामेश्वरमला मुख्य भारतीय भूमीशी जोडते.

पश्चिमेकडे पहिली ट्रेन पश्चिम समर्पित फ्रेट कॉरिडॉरवर वैतरणा ते जवाहरलाल नेहरू बंदरापर्यंत टाकलेल्या १०२ किलोमीटरच्या नवीन ट्रॅकवर धावली. तथापि, या यशांच्या समांतर, वाहतूक व्यवस्थापन आणि मालवाहतुकीची सर्वांत मोठी परीक्षा आहे. क्षमता वाढवण्यासाठी अमृत भारत स्थानक योजनेअंतर्गत स्थानकांचा पुनर्विकास सुरू आहे; परंतु तो लक्ष्यांपेक्षा मागे आहे. 'कवच'सारख्या सुरक्षा व्यवस्था अजूनही पूर्ण व्याप्तीपासून दूर आहेत. शिवाय, मालवाहतूक हा भारतीय रेल्वेचा कणा आहे, जो त्याच्या एकूण महसुलाच्या ६५ टक्के आहे. तथापि, वस्तुस्थिती अशी आहे की, मालवाहतुकीमध्ये रेल्वेचा वाटा सध्या रस्ते वाहतुकीच्या तुलनेत फक्त २७ टक्के आहे. तो वाढवणे आवश्यक आहे. तथापि, रेल्वे एक हरित वाहतूक व्यवस्था म्हणून आशेचा किरण देते. कारण ती वाहतूक उत्सर्जनात फक्त एक टक्का योगदान देते. भारतीय रेल्वे अशा टप्प्यावर उभी आहे, जिथे यश आणि आव्हाने एकत्र येतात. बुलेट ट्रेनच्या स्वप्नाच्या जवळ जाणे आणि दुर्गम भागात रेल्वेचा विस्तार करणे नवीन सीमा उघडतात; परंतु वाढत्या वाहतुकीचा भार आणि मालवाहतुकीच्या गुंतागुंतीमुळे धोरणकर्त्यांकडून दृष्टी आणि शाश्वत गुंतवणुकीचीदेखील आवश्यकता असते. वेग संतुलित असेल, तंत्रज्ञानाचा समावेश असेल आणि सुरक्षिततेसह विस्तार सुनिश्चित केला गेला, तर भारतीय रेल्वे निःसंशयपणे जागतिक स्तरावर एक विश्वासार्ह मॉडेल म्हणून उदयास येईल.

(लेखक अर्थशास्त्राचे अभ्यासक आहेत.)

## वेध

**गिरीश शेरेकर**

# अमरावती मनपाचा किंगमेकर कोण?

अमरावती महापालिकेच्या २२ प्रभागांच्या ८७ जागांसाठी गुरुवार १५ जानेवारीला मतदान होणार आहे. त्यासाठीचा जाहीर प्रचार मंगळवारी थांबला. या निवडणुकीत सुरुवातीला युती व आघाडीच्या चर्चा झाल्या. शेवटपर्यंत चर्चांच्या फेऱ्या सुरू होत्या. अखेर सर्वच प्रमुख राजकीय पक्षांनी स्वबळावर निवडणूक लढविण्याचा निर्णय घेऊन प्रचार सुरू केला. पक्ष व अपक्ष असे एकूण ६६१ उमेदवार रिंगणात आहेत. दहा दिवस जोरदार प्रचार झाला. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, अजित पवार यांच्यापासून भाजपाचे अनेक मंत्री, नेते तसेच इतर पक्षांचे नेतेही प्रचारात सहभागी झाले होते. आरोप-प्रत्यारोप झाले. आता नेमकी वेळ जवळ आली आहे. अमरावती महापालिका हद्दीतल्या मतदारांच्या मनात काय आहे, हे निकालानंतरच स्पष्ट होणार असले तरी अनेक अंदाज वर्तविले जात आहेत. या निवडणुकीचे वैशिष्ट्य म्हणजे प्रभागनिहाय वेगवेगळी समीकरणे पाहायला मिळत आहेत. ज्याला जे समजते ते भाकीत सांगितले जात असून नेमका अंदाज काढणे अवघड झाले आहे.

अमरावतीत त्रिशंकू स्थितीची शक्यता वर्तविली जात आहे. अशा स्थितीत महापालिकेचा किंगमेकर कोण होईल? या प्रश्नाचे उत्तर शोधायचे असेल तर गेल्या १५ दिवसांत तयार झालेल्या समीकरणात ते दडले आहे. भाजपाने २०१७ मध्ये स्वबळावर सत्ता स्थापन केली होती. यंदाही भाजपाची सत्ता स्थापन व्हावी म्हणून संपूर्ण ताकद पणाला लावण्यात आली आहे. पण, पहिले शिवसेना आणि नंतर युवा स्वाभिमान पार्टीसोबत भाजपाचा युतीचा घोळ शेवटपर्यंत कायम राहिल्याने उमेदवार निश्चितीवर काही प्रभागांत परिणाम झाला. शेवटी भाजपाने युवा स्वाभिमानसाठी ज्या प्रभागांत जागा सोडल्या होत्या, तेथे अपक्षांना पाठिंबा देऊन युती संपुष्टात आणली. प्रचारा दरम्यानही भाजपा व युवा स्वाभिमान पार्टीच्या नेत्यांचे शीतयुद्ध चांगलेच रंगले. या दोन्ही पक्षांचा दुवा असलेल्या भाजपा नेत्या नवनीत राणा यांच्या विलासनगर - मोरबाग प्रभागातल्या कृतीची दखल भाजपाच्या वरिष्ठ नेत्यांनी सुद्धा घेतली. स्थानिक भाजपा नेत्यांच्या तर ती खूपच जिव्हारी लागली. तेथून वातावरण तापले आणि संभ्रम निर्माण झाला. याचा फटका किती प्रमाणात कोणाला बसेल हे वेळच सांगणार आहे. कोणी कोणाला अंधारात ठेवले माहिती नाही पण, दगाफटका झाला आहे. चार ते पाच प्रभागांत भाजपा व युवा स्वाभिमान पार्टीच्या उमेदवारांतच लढत होत असल्याचे चित्र आहे. भाजपाकडून ते बदलविण्याचे आणि स्वाभिमानकडून ते तसेच कायम ठेवण्याचे प्रयत्न जोरात सुरू आहे. कोणाला यश मिळते, हे निकालातून कळेलच! या स्थितीत जर युवा स्वाभिमानला ८ ते १० जागा मिळाल्या तर ते किंगमेकर होण्याची शक्यता दिसत असून भाजपाची घोडदौड ३० ते ३५ जागांवर थांबू शकते. आमदार रवी राणा यांनाही असे वाटत असेल की भाजपा आपल्यावर अवलंबून राहावी. पण, भाजपाला ते नको आहे. राजकीय स्वार्थ म्हणून दोघेही आपल्या जागेवर बरोबर आहे. तसे पाहिले तर राणा 'कलाकार' आहेत. निकाल जर त्यांच्या मनासारखा आला तर ते सर्वांच्या कल्पनेच्या पलीकडे जाऊन अनेकांना धक्का देणारा निर्णय घेऊ शकतात. यासाठी त्यांना नवनीत राणा यांचे बळ मिळेल. वेळ आल्यावर सर्व काही स्पष्ट होईलच.

एक दुसरी स्थिती राष्ट्रवादी अजित पवार पक्षाची आहे. या पक्षाच्या १० ते १२ जागा येण्याची शक्यता आहे. राज्यात भाजपासोबत हा पक्ष आहे. भाजपातला स्थानिक नेत्यांचा निर्णय प्रक्रियेतला जो गट आहे, त्यांना निकालानंतर जर काही वेगळी स्थिती निर्माण झालीच तर युवा स्वाभिमानपेक्षा राष्ट्रवादीसोबत जाणे आवडणारे आहे. (एका अर्थाने त्यांना राणापेक्षा खोडके किंगमेकर झाले तर चालते) वर म्हटल्याप्रमाणे रवी राणा यांनी धक्कातंत्राचा वापर केला तर? फार विचार करण्याची गरजच उरत नाही. एक तिसरी स्थिती म्हणजे पाच ते सहा जागा मिळाल्या तर शिवसेना एक पर्याय भाजपाकडे आहेच. हा पर्यायही तसा सोईचाच आहे. राजकारणात काहीपण होऊ शकते. कोणाला किती जागा मिळतात, यावरच गणित आहे. राष्ट्रवादी, शिवसेना आणि युवा स्वाभिमानची डोकेदुखी नकोच, आपले स्वतंत्रच बरे असे भाजपाला मनोमन वाटते. त्यासाठीच भाजपाने इतक्या गोट्या फिरवल्या पण तसे होईल का? दुसऱ्या बाजूने काँग्रेस स्वतंत्रपणे किल्ला लढवत आहे. गत निवडणुकी इतक्या जागा कायम ठेवण्याचा त्यांचा प्रयत्न आहे. त्यांच्या मुस्लिमबहुल भागातल्या उमेदवारांपुढे अन्य पक्षांचे तगडे आव्हान आहे. उबाठा व अन्य छोट्या पक्षाने उमेदवार दिले आहेत. त्यांचेही प्रयत्न सुरू आहेत. मविआपेक्षा युतीचीच सत्ता बसण्याचा अंदाज अनेकांकडून वर्तविला जात आहे. फक्त समीकरण कसे तयार होते, हेच पाहायचे आहे.

९४२०७२१२२५

## धर्म-संस्कृती

# ब्रह्म पुराण

**प्रा. दिलीप जोशी**

अठरा पुराणांतील अत्यंत गोड असलेले पुराण म्हणजे ब्रह्म पुराण. भगवान विष्णूंच्या परब्रह्म स्वरूपाचे ज्यात वर्णन आहे म्हणून ते ब्रह्म पुराण. भगवंताच्या दशावताराचेही संक्षेपात वर्णन या पुराणात आहे. याशिवाय भारत देशाचे माहात्म्य, सूर्यादी ग्रहमंडलाची स्थिती इत्यादी वर्णन यात आहे. भगवान श्रीकृष्णाचे विस्तृत चरित्र या पुराणात आहे.

पुराण आणि दशावतार यांची आपण सांगड घालत असल्याने याच पुराणात दशावतार संक्षेपात असले तरीही पुढील भगवान परशुराम अवताराबद्दल आपण चर्चा करणार आहोत.

भगवान परशुराम अवतार म्हणजे ब्रह्मतेज आणि क्षात्रतेज यांचा अनोखा संगम आहे. साधूंचे रक्षण आणि दुष्टांचा विनाश हा भगवंताचा अवतार उद्देश या परशुराम अवतारात ठळक दिसतो. जमदग्नी महामुनी आणि रेणुकामाता यांच्या पोटी आलेला हा बालक म्हणजे


**अग्रतः चतुरो वेदाः पृष्ठतः सशरं धनुः ।**
**इदं ब्राह्मं इदं क्षात्रं शापादपि शरादपि ॥**

चार वेदांचे ज्ञानी म्हणून ब्रह्मतेजस्वी आणि धनुर्धारीमध्ये अग्रणी म्हणून क्षात्रतेजस्वी असे त्यांचे वर्णन केले आहे.

वडील जमदग्नींच्या आज्ञेचे पालन म्हणून आईचे मस्तक उडविले आणि प्रसन्न झालेल्या वडिलांकडून पुन्हा माता रेणुकेला जीवन मिळवून देणारा मातृ-पितृभक्त म्हणजे भगवान परशुराम.

आपल्या वडिलांना म्हणजे ऋषी जमदग्नी यांना मिळालेली कामधेनू कार्तवीर्य अर्जुन पळवून नेतो आहे म्हणून त्या सहस्रार्जुनाचा वध करून आश्रमातील ऋषींना अभय देणारे महापराक्रमी परशुराम अवतार आहेत.

भगवान परशुराम साधनेसाठी गेलेत हे पाहून सहस्रार्जुनाच्या मुलांनी जमदग्नींच्या आश्रमावर हल्ला करून जमदग्नींना ठार मारले. हे ऐकताच पृथ्वीवरील दुष्टांचे निर्दालन करण्यासाठी ज्यांनी कार्तवीर्य अर्जुनाच्या मुलांसह २१ वेळा पृथ्वीवरील दुष्टांचा निःपात केला ते क्षात्रतेजस्वी भगवान परशुराम आहेत.



या हत्येचे पातक फेडण्यासाठी यज्ञ करून यज्ञाचे आचार्य कश्यप ऋषींना संपूर्ण पृथ्वी दान करून ज्यांनी महेंद्र पर्वतावर साधना सुरू केली ते महायोगी भगवान परशुराम. संपूर्ण पृथ्वी दान केल्यामुळे स्वतःला जागा हवी म्हणून आपल्या परशूने ज्यांनी आपल्या सामर्थ्याने समुद्राला मागे हटवून परशुराम क्षेत्र म्हणजे केरळ, कोकण, गोवा किनारपट्टी निर्माण केली ते सामर्थ्यवान भगवान परशुराम आहेत.

ज्यांना स्वयं भगवान शंकराने परशू दिला म्हणून ते परशुराम झालेत. त्यांचे शिष्य देखील भीष्माचार्य, द्रोणाचार्य, कर्ण आणि रुख्मीसारखे एक एकाचेनी मनोव्यापारे, अवघे विश्व संहारे असे होते.

जे चिरंजीव असल्यामुळे चारही युगात कार्यरत होते आणि आहेत. कृत युगात ज्यांच्या परशू प्रहाराने भगवान गणेशाचा एक दात खुडला त्यामुळे गणपती एकदंत झाले. त्रेता युगात ज्यांच्या धनुष्यभंगामुळे श्रीराम-जानकी विवाह झाला. द्वापार युगात भीष्म-द्रोणादींना शिष्यत्व दिले, भगवान श्रीकृष्णाला साहाय्यभूत झालेत आणि कलियुगात आजही ज्यांचे अस्तित्व जाणवते ते भगवान परशुराम आहेत. त्यांची कथा या ब्रह्म पुराणात आहे.

याशिवाय ब्रह्म पुराणात राजा पृथुची कथा, चौदा मन्वंतरे, वैवस्वत मनुंचे वंशज, सगर राजाचे चरित्र दिले आहे.

जंबुद्वीपासह विविध सहा द्वीपांचे वर्णन, भारत वर्षाचे वर्णन दिले आहे. भगवान सूर्यनारायणाचे माहात्म्य आणि त्यांची नावे दिली आहेत. माता पार्वतीची तपश्चर्या, स्वयंवर आणि भगवान महादेवाशी विवाह, दक्ष यज्ञ विध्वंस.

मार्कंडेय चरित्र, विविध तीर्थ वर्णन या पुराणात आहेत. अनंत वासुदेव माहात्म्य, कण्डूमुनींचे चरित्र दिले आहे. अध्याय ७२ ते ८४ पर्यंत भगवान श्रीकृष्ण चरित्र दिले आहे.

यमलोक, यमद्वार, नरक इत्यादींबाबत माहिती या पुराणात आहे.

धर्मकार्य, अधर्म, अन्नदानाचे महत्त्व, गृहस्थाश्रमाचे धन्यत्व, वर्ण आणि आश्रम व्यवस्था, एकादशी माहात्म्य, नैमित्तिक आणि प्राकृतिक प्रलय वर्णन, त्रिविध तापाचे वर्णन, अध्यात्म-ज्ञान-विज्ञान, योग, क्षर आणि अक्षरयोग याच पुराणात दिला आहे. देवी पार्वतीचे अद्भुत चरित्र, गौतमी, गंगा तथा गोदावरी स्नानाचे महत्त्व या पुराणात दिले आहे.

गृहस्थाश्रमाचे श्रेष्ठत्व देताना हे पुराण सांगते-

**आश्रमाणि च चत्वारि कर्मद्वाराणि मानदः ।**
**चतुर्णामाश्रमाणाम् च गार्हस्थ्यं पुण्यदम् स्मृतम् ।**

सामाजिक समरसता आपल्या संस्कृतीचा अविभाज्य भाग होता. वर्ण जन्माने नाही तर कर्माने ठरत असे.

**सर्वोऽयं ब्राह्मणो लोके वृत्तेन तु विधीयते ॥**
**वृत्ते स्थितश्च शूद्रोऽपि ब्राह्मणत्वं च गच्छति ।**

गुणवान व्यक्ती जन्माने शूद्र असेल तरीही तिची गणना ब्राह्मण म्हणून होत असे.

कन्या, पुत्र, पृथ्वी, गाय विक्रीला निर्बंध असल्याचेही इथे दिले आहे. त्याला नरक प्राप्ती सांगितली आहे.

**कन्यापुत्रमहीबाजिगवां विक्रयकारिणः ।**
**नरकांत निवर्तन्ते यावदाभूतसंप्लवम ॥**

अतिथीचे स्वागत, आदरातिथ्य आपल्या संस्कृतीचा भाग होता.


**अभ्यागतमनु श्रान्तम् सूर्योढं गृहमागतं ।**
**तं विद्याद्देवरूपेण सर्वक्रतुफलो ह्यसो ।**

थोडक्यात, ब्रह्म पुराणातील परशुराम अवतार ब्रह्मतेज आणि क्षात्रतेजाचा समन्वय होता. त्यामुळेच या भूमीला देवभूमी म्हणत असत. आज मात्र दुर्दैवाने ब्रह्मतेज आणि क्षात्रतेज यांच्यातला समन्वय नष्ट करण्याचा प्रयत्न होत आहे. म्हणूनच आपली पुराणे आपला इतिहास असून त्याचा अभ्यास करणे आणि त्याचे अनुसरण म्हणजे भारतीयत्वाची दृढ स्थापना होय.

९८२२२६२७३५

## तिळगूळ घ्या... गोड गोड बोला...

भारतीय संस्कृतीत सणांना अतिशय महत्त्व आहे. प्रत्येक सण विशिष्ट असा संदेश देत असतो. या सणातून एक वेगळीच प्रेरणा मिळत असते. मकरसंक्रांत हा त्यापैकीच एक सण. मकरसंक्रांत हा वर्षातील पहिला सण त्यामुळे या सणाचा उत्साह काही निराळाच असतो. हा सण संपूर्ण देशात वेगवेगळ्या नावाने आणि वेगवेगळ्या पद्धतीने साजरा केला जातो. महाराष्ट्रात तर या सणाला खूप महत्त्व आहे. मकरसंक्रांत म्हणजे सूर्याने मकर राशीत प्रवेश करणे. संक्रांत ऐन थंडीत येते त्यामुळे हवेत गारवा असतो. त्याचा परिणाम आपल्या प्रकृतीवर होतो. त्यामुळे या दिवसात शरीराला उष्ण ठेवण्यासाठी उष्ण पदार्थ खाल्ले जातात. तिळ आणि गूळ यात उष्मांक अधिक प्रमाणात असतो. कदाचित त्यामुळेच मकरसंक्रांतीच्या दिवशी तिळगूळ वाटला जातो. तिळगूळ देताना ''तिळगूळ घ्या गोड गोड बोला'' असा संदेशही दिला जातो. एकमेकांविषयी स्निग्धता देणारे तिळ आणि गोडवा देणारा गूळ एकत्र आल्याने प्रेमाचे नाते टिकते असे



प्रतीकात्मक रूपही या सणाला आहे. मकरसंक्रांतीला विवाहित स्त्रिया एकमेकांना हळदी-कुंकू लावून सौभाग्याचे वाण देतात. हे सर्व करण्यामागे कोणतीही रूढी परंपरा नसून नव्याने स्वागत आणि त्यातून आनंद घेणे हा आहे. पूर्वी स्त्रियांना एकत्र येण्याची संधी क्वचितच मिळत असे. या सणानिमित्त महिला एकत्र येत असे. आजच्या धकाधकीच्या जीवनातही महिलांना एकत्र येण्याची संधी क्वचितच मिळते त्यामुळे संक्रांतीनिमित्त मिळणारी ही आयती संधी महिलावर्ग सोडत नाहीत. या दिवशी पतंग उडवण्याची परंपरा आहे. अनेक गावांत पतंगोत्सव आयोजित केला जातो. या दिवशी आकाशात विविध रंगांची,

## वाचक पत्रे

आकाराची पतंगे उडताना दिसतात. एकमेकांशी असलेली कटुता विसरून प्रेमाने वागा असा संदेश देणारी मकरसंक्रांत म्हणजे आनंदाची पर्वणीच. मकरसंक्रांतीच्या सर्वांना हार्दिक शुभेच्छा.

**श्याम ठाणेदार**/९९२२५४६२९५

●● ●●

## वाण देणे प्रदेशानुसार भिन्नता पण भावना एकच

मकरसंक्रांती हा दान, कृतज्ञता आणि सामूहिक आनंदाचा सण आहे. वाण देणे ही त्यातील महत्त्वाची धार्मिक परंपरा आहे. शास्त्रानुसार संक्रांतीच्या काळात यथाशक्ती दान देणे पुण्यकारक मानले जाते. संक्रांतीनिमित्त सुवासिनी हळदी-कुंकू



दान देतात, त्याला वाण म्हणतात. हळदी-कुंकवाचे वाण देणे ही प्रथा असून वाणातील वस्तू सात्त्विक व अध्यात्मपूरक असाव्यात.

याच परंपरेत सुगड्याचे वाण विशेष महत्त्वाचे आहे. 'सुगड' हा 'सुघट' या शब्दाचा अपभ्रंश असून मातीच्या या छोट्या घटांत शेतातील नवे धान्य, कडधान्ये, तिळगूळ, कापूस, बोर, भाजीपाला भरून त्यांची पूजा केली जाते. शेतशिवारातील समृद्धी सर्वांना मिळावी, त्यातील आनंद सगळ्यांना अनुभवता यावा हा त्यामागील भाव आहे. प्रदेशानुसार या प्रथेत भिन्नता आढळते. महाराष्ट्रात सुगडे मातीच्या झाकणाने झाकून देतात, कोकणात काळ्या सुगड्यावर लाल सुगड पालथे ठेवून पूजन करतात, अन्यत्र काळे मोठे सुगड खाली त्यावर लाल सुगड ठेवून दोन्हीत वाण भरतात, गोव्यात सुगड पूजन करतात त्या घटात वेगवेगळ्या प्रकारची कडधान्ये, हिरव्या काचेच्या बांगड्या, हळद-कुंकू आणि सौभाग्याचं वाण ठेवून त्याची पूजा केली जाते आणि पूजा सांगायला आलेल्या ब्राह्मणाला हा घट दान केला जातो. कर्नाटक व आंध्र प्रदेशात एल्लू-बेल्ला (तिळ-गूळ, नारळ, शेंगदाणे) दिले जाते; तामिळनाडूमध्ये पोंगल साजरा होतो; गुजरातमध्ये पतंगोत्सव सोबत तिळगूळ, चिवडा आणि मिठाईचे आदानप्रदान केले जाते. सर्व ठिकाणच्या विविधतेतून एकच संदेश मिळतो, तो म्हणजे ईश्वरकृपेचे आदानप्रदान आणि प्रेम भाव वाढवणे.

**प्रांजली विजय ब्रह्मे**/ नागपूर

वाचक पत्रे पाठविण्यासाठी ईमेल ॲड्रेस
tbedit2016@gmail.com
तसेच **कुठलाही लेख** पाठवायचा असल्यास **९८५०७५३२८१** या व्हॉट्स ॲप क्रमांकावर पाठवावा.

**हे पत्र मुद्रक व प्रकाशक** दिलीप शिवमुर्ती दुलंगे यांनी **सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय** १९/२० औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर येथे छापून तरुण भारत कार्यालय, श्री. मसलेकर निवास, जिल्हा न्यायालय पाठीमागे, समर्थ नगर, धाराशिव (उस्मानाबाद) ४१३५०१, कार्यालयातून प्रकाशित करून वितरीत केले. दूरध्वनी : ९३७३४३८३५२ / ८८८८८४७२३९ ● मुख्य समुह संपादक : **दिलीप यशवंत पेठे.** ● मुख्य संपादक : **प्रशांत वसंतराव माने** (पी. आर. बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांच्यावर आहे) दैनिक सोलापूर तरुण भारत. RNI No. MAHMAR/2023/86468. **E-mail starunbharatgmail.com.** ● **Websate:http://dainiktarunbharat/** या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही.

**Owned by, SOLAPUR TARUN BHARAT MEDIA LTD. Printed by, Published by** DILIP SHIVMURTI DULANGE **Printed at** SOLAPUR TARUN BHARAT MEDIA LT. 19,20 INDUSTRIAL ESTATE, HOTGI ROAD, SOLAPUR, Dist. SOLAPUR, 413003.**Publised at** TARUN BHARAT OFFICE Mr. Maslekar Residence, Behind District Court, Samarth Nagar, Dharashiv. PIN - 413501 |**RNI No. MAHMAR/2023/86468**
● **CHIEF GROUP EDITOR :** DILIP YASHWANT PETHE ● **CHIEF EDITOR :** PRASHANT VASANTRAO MANE

## महत्वाचे...



### महापलिका आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे बाराबंदीत

सोलापूर : श्री सिद्धेश्वर यात्रेमध्ये अक्षदा सोहळा निमित्त आज महापलिका आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे हे बाराबंदी परिधान केली होती.यावेळी पोलीस आयुक्त एम. राजकुमार, पोलीस अधीक्षक अतुल कुलकर्णी, पोलीस उपायुक्त विजय कबाडे यांच्यासह अधिकारी उपस्थित होते.



### शिवाजी पॉलिटेक्निकमध्ये माजी विद्यार्थी मेळावा

**सांगोला, दि. १३ जानेवारी-**

सांगोल्यातील शिवाजी पॉलिटेक्निक कॉलेज व कॉलेजची माजी विद्यार्थी संघटना यांच्या वतीने माजी विद्यार्थी मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते. मेळाव्याच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे अध्यक्ष बाबुराव गायकवाड होते. यावेळी सचिव अंकुशराव गायकवाड उपस्थित होते. कार्यक्रमाच्या प्रास्ताविकात प्राचार्य डॉ.आर. ए. देशमुख यांनी कॉलेजच्या प्रगतीचा आढावा सादर करत माजी विद्यार्थी संघटनेच्या माध्यमातून निधी उभा करून सध्या कॉलेजमध्ये शिकत असलेल्या गोर गरीब विद्यार्थ्यांना मदत करावी, असे आवाहन केले. बाबुराव गायकवाड यांनी माजी विद्यार्थ्यांनी आपल्या गावी आल्यानंतर कॉलेजला भेट देऊन सध्या ज्ञानग्रहण करत असणाऱ्या विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करून त्यांचा आत्मविश्वास वाढवावा असे आवाहन केले. यावेळी विजय नागणे, शर्विल अंकलगी, संकेत शिंदे, ज्ञानेश्वर पाटील, सोनाली गोडसे या विद्यार्थ्यांनी मनोगतात संस्थेचे अध्यक्ष बाबुराव गायकवाड व संचालक मंडळ यांनी सांगोला सारख्या ग्रामीण भागात सुरू केलेल्या या कॉलेजमुळेच आम्ही तंत्रशिक्षण घेऊ शकलो व जीवनात यशस्वी होऊ शकलो अशी भावना व्यक्त केली. सदर कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी माजी विद्यार्थी संघटनेचे पदाधिकारी प्रा.गणेश मिसाळ, इंजि.निलेश माने, प्रा.आनंद गायकवाड, प्रा.पृथ्वीराज लिगाडे यांनी परिश्रम घेतले. सूत्रसंचालन प्रा.एस.डी.बावचे यांनी केले.

# शिव, आंबेडकर जयंतीला जिल्ह्यात डॉल्बी नाही वाजणार

## पोलिस अधीक्षक अतुल कुलकर्णी यांनी केले स्पष्ट; येणाऱ्या अधिकाऱ्यांनी योजना सुरु ठेवाव्यात

**तभा वृत्तसेवा । विशेष प्रतिनिधी**
**सोलापूर, दि १३ जानेवारी-**

गतवर्षी जिल्ह्यात गणेशोत्सव हा डॉल्बीमुक्त साजरा झाल्याची दखल सरकारी पातळीवर घेण्यात आली असून सोलापूरचे कौतुक होत आहे. सोलापूरचा डॉल्बीमुक्त पॅटर्न राज्यभर राबविला जाण्याची शक्यता आहे. येत्या काळात साजऱ्या होणाऱ्या शिव जयंती, डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्सव मिरवणुकीत जिल्ह्यात डॉल्बी वाजणार नाही, आम्ही वाजू देणार नाही असे पोलिस अधीकक्षक अतुल कुलकर्णी यांनी आज पोलिस मुख्यालयात झालेल्या वार्तालापात स्पष्ट केले.

पोलिस अधीक्षक कार्यालयाने आपल्या कार्यकाळात पोलिसिंग व्यतिरिक्त अनेक समाजाभिमुख कामे केली आहेत. पारधी समाजाला मुख्य प्रवाहात आणण्यासाठी पहाट योजना, गुन्हेगारांना गुन्हेगारीपासून परावृत्त करण्यासाठी ऑपरेशन परिवर्तन योजना, पारधी समाजाला मुख्य प्रवाहात आणण्यासाठी अनेक उपक्रम राबविले असून त्यांना पंतप्रधान आवासमधून घरे मिळण्यासाठीचा प्रस्ताव शासनाकडे पाठविला



आहे. स्वागत पोर्टलद्वारे नागरिकांना विविध सुविधा, पोलिस स्टेशनमध्ये येणाऱ्या लोकांना तणाव न वाटता पोलिस आपले वाटले पाहिजे त्यासाठी लोकांशी सुसंवादाचे प्रशिक्षण पोलिसांना दिले जाते आहे. सण, उत्सवासह विविध पोलिस परवानग्यांचे स्टेटस या ॲपद्वारे नागरिकांना कळणार आहे.

एमपीडीए, तडीपारी आणि प्रतिबंधात्मक कारवाईत सोलापूर जिल्ह्यात मोठी कामगिरी झाली आहे. त्याम ुळे नगरपालिका निवडणुका सुरळीत पार पडण्यास मदत झाली. गुन्हेगारी जास्त असलेल्या तीस गावांची यादी करून त्या गावात परिवर्तन करण्याची प्रक्रिया सुरु आहे. वाहनांना जीपीआएस लावले आहे. पोलिस मुख्यालयात क्रीडा ग्राऊंड तयार केलेले असून येथे फूटबॉल, व्हॉलिबॉल, टेनिस, क्रीकेट खेळांचे सराव सुरु असून पोलिस बॉईज यांच्यासह बाहेरच्या खेळाडूंनाही याचा लाभ घेता येणार आहे. यासाठी प्रशिक्षकही तैनात करण्यात आले आहेत. गार्डन, नर्सरीदेखील सुसज्ज करण्यात आल्याचे पोलिस अधीक्षक कुलकर्णी यांनी सांगितले. शेतकऱ्यांसाठी बाजाराची योजना असून ऑरगॅनिक शेती करणाऱ्यांना येथे मार्केट उपलब्ध करून दिले जाणार आहे. शेतकऱ्यांना आपला शेतमाल थेट विक्री करता येणार आहे. शेतकऱ्यांनीही संपर्क साधण्याचे आवाहन कुलकर्णी यांनी केले आहे. याप्रसंगी जिल्ह्यातील गुन्हेगारी गेल्या दोन वर्षात कमी झाल्याचे सांगताना अतिरिक्त पोलिस अधीक्षक प्रितम यावलकर यांनी आकडेवारी मांडली. पोलिस अधीक्षक कुलकर्णी यांनी पंढरपूर आषाढी वारी ही हरित वारी संकल्पना तसेच एआय तंत्रज्ञानाद्वारे सीसीटिव्ही मॉनिटरींग असे उपक्रम राबविले, पारधी समाजासोबत दिवाळी सण साजरा केला. शासनाने कुलकर्णी यांच्या कार्याची दखल घेवून सन्मान केला असल्याचे सांगितले. याप्रसंगी स्थानिक गुन्हे शाखेचे पोलिस निरिक्षक संजय जगताप यांनीही गुन्हेगारी कमी झाल्याची आकडेवारी दिली. अवैध दारू प्रकरणात ठोस कारवाईमुळे प्रकार कमी झाल्याचेही जगताप यांनी सांगितले.

**बदलून येणाऱ्या अधिकाऱ्यांनी योजना सुरु ठेवाव्यात**

पोलिस अधीकक्ष कार्यालयाकडून अनेक लोकाभिमुख योजना सुरु केल्या आहेत. बदली होवनू येणाऱ्या अधिकाऱ्यांनी या योजना पुढे सुरु ठेवल्यास लोकांना त्याचा चांगला लाभ होईल आणि पोलिस व लोकांमध्ये समन्वय वाढेल. योजना पुढे सुरु राहाव्यात यासाठी वरिष्ठ कार्यालयाकडे हा प्रस्ताव मांडला असून याची अंमलबजावणी होईल, असे कुलकर्णी म्हणाले.

**पासपोर्ट व्हेरिफिकेशनसाठी लोकांच्या घरी जावे**

पासपोर्ट पोलिस व्हेरिफिकेशनसाठी संबंधित लोकांना पोलिस स्टेशनला बोलविण्याऐवजी पोलिसांनी त्यांच्या घरी जावे. यासंदर्भात महिला, मुली, लहान मुलांना पोलिस स्टेशनला बोलवून ताटकळत ठेवण्यापेक्षा पोलिसांनी घरी जावून पासपोर्ट व्हेरिफिकेशन करावे, असेही पोलिस अधक्षक अतुल कुलकर्णी यांनी आदेशित केले.

# गाईंची अवैधपणे तस्करी; ७ आरोपींना अटक

**तभा वृत्तसेवा,**
**मोहोळ, दि. १३ जानेवारी -**

गाईंची अवैधपणे आणि बेकायदेशीर तस्करी वाहतूक करणाऱ्या आरोपीवर मोहोळ पोलिसांनी कारवाई करून ७ आरोपींना अटक केली आहे.

सहा महिन्यापूर्वी म्हणजे ५ जुलै २०२५ रोजी दुपारी साडेतीन ते साडेचार वाजण्याच्या दरम्यान नरखेड तालुका मोहोळ येथे फिर्यादी हे गोमास वाहतूक करणारी गाडी पकडण्यास गेले असता त्याचा राग मनात धरून आरोपी नामे दानिश लियाकत कुरेशी,मोहम्मद अली लियाकत कुरेशी शहाबाज अबू तालीब कुरेशी, तौफिक अबूत तालीम कुरेशी, दस्तगीर कोंडाजी कुरेशी, अरबाज अफजल कुरेशी रा धाराशिव यांनी फिर्यादीस तू यांची गाडी का पकडतो म्हणून शिवीगाळ व दमदाटी करून तुला दोन दिवसात जिवंत सोडणार नाही असे म्हणून दंड थोपटून निघून गेले होते. याबाबत मोहोळ पोलीस ठाण्यामध्ये गुन्हा दाखल करण्यात आला होता सदर गुन्ह्याचा तपास करत असताना वरील आरोपीवर अशाच स्वरूपाचे एकूण २६ गुन्हे दाखल असल्याचे निष्पन्न झाले.

यातील आरोपी व त्यांचे साथीदार यांनी सर्व शरीरा विषयी व प्राणी संरक्षक विषयी गुन्हे यातील टोळीप्रमुख व टोळीतील सदस्यांनी त्या अवैध मार्गाने गैरवाजवी आर्थिक फायदा मि ळवण्याकरिता गुन्हेगारी क्षेत्रात व समाजात दहशत निर्माण केलेली आहे. तसेच टोळी प्रमुख व टोळीतील सदस्यांनी मोहोळ परिसरात बेकायदेशीर कृत्य करताना प्राणी संरक्षण विषयक सामाजिक संघटना व नागरिकांना हिंसाचार करण्याची धमकी देऊन मारहाण करत असल्यामुळे सामान्य जनता संतप्त झालेली आहे. टोळी प्रमुख व इतर सदस्य यांचे वर वेळोवेळी प्रतिबंध कारवाई करण्यात आलेली असून देखील त्यांनी वेळोवेळी अशा प्रकारचे गुन्हे करून त्यांचे गुन्हे करण्याचे प्रवृत्ती मध्ये सातत्य ठेवले आहे . त्यांना कायद्याची भीती राहिलेली नसून त्यांचेवर प्रतिबंध करणे गरजेचे असल्याने मोहोळ पोलीस ठाण्यामध्ये त्यांचे वर गुन्हे दाखल करण्यात आला होता. त्यात गुन्ह्यांच्या कलमात वाढ करण्यात आली आहे.सदर गुन्ह्याच्या तपास कामी १२ जानेवारी रोजी आरोपी दानिश लियाकत कुरेशी(२५), मोहम्मद लियाकत कुरेशी वय(२४), तोफिक अबूतालीब कुरेशी (वय३२), इरफान इकबाल कुरेशी (वय २७) कुरेशी (वय२५) अरबाज अफजल कुरेशी वय (२५) वर्षे राहणार कुरेशी मोहल्ला मोहोळ ता मोहोळ यांना अटक करण्यात आली असून मोहोळ पोलिस अधिक तपास करत आहेत . सदर गुन्हच्या तपासात मोहोळचे पोलीस निरीक्षक हेमंत शेंडगे यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक संजय केसरकर, पोलीस हेडकॉन्स्टेबल अविनाश पाटील, दयानंद हेंबाडे, अमोल जगताप, स्वप्नील कुबेर, संदीप सावंत, योगेश खलाटे, सुनिल पवार यांनी ही कामगीरी केली

# चोरुन चालणाऱ्या गावठी दारुच्या हातभट्टया उध्दवस्त

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १३ जानेवारी -**

चोरून अवैधरित्या देशी दारूच्या हातभट्टयावर व दारू विक्री करणाऱ्या विरूध्द केलेल्या कारवाईत एकूण ८ लाख ८५ हजार ८२० रूपये किंमतीचा मुद्देमाल जप्त केला असून त्यामध्ये १६ हजार, ८०० हजार लिटर गुळमिश्रीत रसायन हातभट्टी दारू, प्लॅस्टीक व लोखंडी बॅरेल मध्ये भरून ठेवलेली गावंठी हातभट्टी दारू, हातभट्टी दारू तयार करणे करीता लागणारे साहित्य तसेच अवैधरित्या दारूच्या हातभट्टया उध्दवस्त करून प्लॅस्टीक व लोखंडी बॅरेल जागीच फोडुन त्यातील गुळमिश्रीत रसायन जागेवरच नष्ट करण्यात आले आहे.

वडजी तांडा, शिवा तांडा बक्षीहिप्परगा येथे चोरून अवैधरित्या चालणाऱ्या दारूच्या हातभट्टया व एमआयडीसी पाकणी ता.उत्तर सोलापूर येथे हातभट्टी दारूची विक्री करणाऱ्या विरूध्द छापा कारवाई केली आहे. एकूण ५ इसमा विरूध्द महाराष्ट्र दारूबंदी कायद्या कलम ६५ फ व ६५ ई अन्वये एकूण ५ गुन्हे दाखल केले आहेत.

ही कारवाई अतुल कुलकर्णी, पोलीस अधीक्षक, प्रितम यावलकर, अपर पोलीस अधीक्षक, संकेत देवळेकर, उपविभागीय पोलीस अधिकारी सोलापूर उपविभाग सोलापूर यांचे मार्गदर्शनाखाली राहुल देशपांडे, पोलीस निरीक्षक, सोलापूर तालुका, पोलीस ठाणे यांचे नेतृत्वाखाली सोलापूर तालुका, पोलीस ठाणे कडील कार्यरत असलेले पो. उपनिरिक्षक घोळवे, बागवान, सपोफौ रामेश्वर कोडक, पोहवा महेश कटकधोंड, पोकॉ सागर ननवरे व विलास लोखंडे व मपोकॉ दिपाली खोत यांनी बजावली आहे.

# आनंद चंदनशिवे यांच्यासह सर्व उमेदवारांना विजयी करण्याचा निर्धार

## राष्ट्रवादी काँग्रेस उमेदवारांचा प्रभाग ५ मध्ये होम टू होम प्रचार

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१३ जानेवारी-**

सोलापूर महानगरपालिकेच्या सार्वत्रिक निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर राष्ट्रवादी काँग्रेसच्या वतीने प्रभाग क्रमांक ५ मध्ये होम टू होम प्रचार करण्यात आला. मकर संक्रांतीनिमित्त तीळगुळ वाटपाचा उपक्रम राबविण्यात आला. राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे उमेदवार आनंद चंदनशिवे यांच्यासह भाग्यश्री काळे, महादेवी रणदिवे, गणेश पुजारी यांना विजयी करण्याचा निर्धार यावेळी करण्यात आला.


वसंत विहार, गायत्री नगर, मडकी वस्ती, वारद फार्म हद्दवाढ परिसरासह बुधवार पेठेतील जय मल्हार चौक, साठे चाळ, नरवीर तानाजी चौक, पठाण चाळ, माशाळ वस्ती, गणेश नगर, लक्ष्मी नगर, गुलमोहर आदी भागांत घरोघरी जाऊन प्रचार करण्यात आला. आनंद चंदनशिवे



व गणेश पुजारी यांच्या माध्यमातून आजवर झालेल्या विविध विकासकामांची दखल घेत नागरिकांनी समाधान व्यक्त केले.

याप्रसंगी प्रबुध्द भारत तरुण मंडळाचे प्रमुख गौतम चंदनशिवे, धम्मपाल मैंदर्गीकर, भीमा इंगळे, बाळासाहेब तांबे, उमर शेख, रवींद्र काळे, उमेश रणदिवे, हृदयनाथ मोकाशी, बलवीर तीर्थकर, बिभीषण बाकले, मनोज थोरात, सोमनाथ करंडे, मुकेश मोकाशे, किरण वाळके यांच्यासह राष्ट्रवादी काँग्रेसचे कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## दुर्मिळ हरणटोळ साप आढळला, सर्पमित्रांनी वाचवले सापाचे प्राण



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१३ जानेवारी-**

कुंभारी साखर कारखाना रोड परिसरात १० जानेवारी २०२६ रोजी रात्री ११:४५ वाजता दुर्मीळ हरणटोळ साप आढळून आल्याची घटना घडली. सागर बिराजदर यांच्या घराजवळ हा साप आढळला. सर्पमित्रांना संपर्क केले असता सर्पमित्र इमरान पटेल व इस्माईल रंगरेज यांनी तत्काळ घटनास्थळी दाखल होत सापाचा सुरक्षितपणे पकडले.या संदर्भात सर्प अभ्यासक राहुल शिंदे यांनी प्रतिक्रिया देताना सांगितले, हरणटोळ हा अत्यंत देखणा आणि परिसंस्थेसाठी उपयुक्त असा साप आहे. सोलापूर परिसरात त्याचा आढळ दुर्मीळ असल्यामुळे ही नोंद वैज्ञानिक दृष्टिकोनातून महत्त्वाची आहे. साप निघाल्यास नागरिकांनी घाबरून जाता तात्काळ सर्पमित्रांशी संपर्क साधावा. अशा घटनांची नोंद भविष्यातील संशोधनासाठी उपयुक्त ठरते. या यशस्वी बचावामुळे स्थानिकांमध्ये समाधान व्यक्त होत असून वन्यजीव संवर्धनाबाबत जनजागृती होण्यासही मदत होईल, असे मत व्यक्त करण्यात येत आहे. सर्पमित्र इम्रान पटेल व इस्माईल रंगरेज यांचे नागरिकांनी आभार मानले.

Classifieds

**भाड्याने देणे आहे**

मंद्रूपमधील समर्थ नगर येथील टू बीएचके घर भाड्याने देणे आहे. कुटुंब असणाऱ्यांना प्राधान्य. लाईट, पाणी, पार्किंग, या सर्व सोयी सहित घर भाड्याने देणे आहे.

**संपर्क - सावन चव्हाण**
**९७६७३६९७८९**

**दै. सोलापूर तरुण भारत मध्ये प्रसिद्ध होणाऱ्या सर्व प्रकारच्या जाहिरातींमधील मजकूर जाहिरातदाराने दिल्या नुसारच प्रसिद्ध केला जातो. यातील कोणत्याही मजकुराच्या सत्यतेबाबत दै. सोलापूर तरुण भारत हमी घेऊ शकत नाही, याची वाचकांनी नोंद घ्यावी.**

**CHANGE IN NAME**

I HEREBY DECLARE THAT MY OLD NAME AAKASH VIJAY RAKA HAS BEEN CHANGED TO **AAKASH VIJAYKUMAR RAKA** RESIDING AT 203 A. WEST MANGALWAR PETH, SOLAPUR - 413002 MAHARASHTRA. KINDLY NOTE THE SAME.

**मध्य रेल्वे**
**सोलापूर विभाग**
**कलाबुरगी येथील खासदार स्टॉल**

सोलापूर विभागातील कलबुरगी स्टेशनवरील एमपीएस स्टॉलसाठी ई- लिलाव (सामान्य लिलाव-सिग्नल स्टेज). लिलाव कॅटलॉग क्रमांक: KLBG-MPS27-1-26. लिलाव सुरू बंद, तारीख आणि वेळ: सुरू - दुपारी 12.00 27.01.2026 बंद - दुपारी 12.30 27.01.2026. स्थानकांचे नाव: ई- कलबुरागी स्टेशनवरील एमपीएस स्टॉलचा लिलाव. पद्धत: ireps-e लिलावाद्वारे ई-लिलाव (लीज मॉड्यूल). निविदेची तरतूद: वार्षिक परवाना शुल्क आणि 4 आणि 5व्या वर्षांसाठी 10% वाढीसह 5 वर्षे. वेबसाइट पत्ता:- सर्व ई-लिलाव सेंट्रल रॅलवे/इंडियन रॅलवे पोर्टल www.ireps.gov.in वर उपलब्ध आहेत.

**एसीएम/टीसी/सोलापूर**
Akar/Sur-4
**तुमच्या प्राण्यांना रेल्वे रुळांपासून दूर ठेवा.**

**मध्य रेल्वे**
**सोलापूर विभाग**
**विद्युत काम**

निविदा क्रमांक SUR/TD/T/2025/23R, मध्य रेल्वे, सोलापूर, भारताच्या राष्ट्रपतींच्या वतीने आणि त्यांच्या वतीने रेल्वे ई-प्रोक्योरमेंट वेबसाइट www.Ireps.gov.In वर खालील कामांसाठी प्रतिष्ठित, अनुभवी आणि परवानाधारक विद्युत कंत्राटदारांकडून ऑनलाइन ई-निविदा मागवत आहे. कामाचे नाव: सोलापूर विभागातील दौंड-सोलापूर विभागात मलठण स्टेशनवर प्रत्येक दिशेने एक लांब पल्ल्याच्या लूप लाईनच्या तरतुदीशी संबंधित कामाचा विद्युत TRD भाग. (पुनर्निमंत्रण). अंदाजे खर्च: 1,22,40,703.62/- बिल्ड सुरक्षा: 2,11,200/- पूर्ण कालावधी: 12 महिने. ऑफरची वैधता: 60 दिवस. वेबसाइटवर निविदा बंद करण्याची तारीख आणि वेळ: 10.02.2026 दुपारी 3:00 वाजता.

वरिष्ठ विभागीय विद्युत अभियंता (TRD)
**सीआर, सोलापूर**
Akar/Sur-3
**तुमच्या प्राण्यांना रेल्वे रुळांपासून दूर ठेवा.**

**मध्य रेल्वे**
**सोलापूर विभाग**
**सिग्नलिंग कामे**

सहाय्यक विभागीय सिग्नल आणि दूरसंचार अभियंता (बांधकाम) सी.आर., सोलापूर, भारताच्या राष्ट्रपतींच्या वतीने आणि त्यांच्या वतीने, खालील कामांसाठी पात्र निविदाधारकांकडून ऑनलाइन खुल्या ई-निविदा मागवत आहेत. निविदा सूचना क्रमांक SUR-NC-CR-SNT-C-S-01-2026 दिनांक १०-०१-२०२६. कामाचे नाव: मध्य रेल्वेच्या पुणे विभागात ५ स्टेबलिंग लाईनच्या तरतुदींसंदर्भात साईनगर शिर्डी स्टेशनवर इनडोअर आणि आउटडोअर उपकरणांचा पुरवठा, स्थापना, चाचणी आणि कार्यान्वित करणे आणि इलेक्ट्रॉनिक इंटरलॉकिंगची तरतूद. कामाची अंदाजे किंमत: 13,89,15,238.08 (रु. तेरा कोटी एकोणऐंशी लाख पंधरा हजार दोनशे अठ्ठावीस पैसे फक्त). निविदा फॉर्म/पुस्तिकेची किंमत: रू 0.00. कमाईची रक्कम: 8,44,600/- (रु. आठ लाख चव्वेचाळीस हजार सहाशे फक्त). काम पूर्ण करण्याचा कालावधी: LOA जारी केल्याच्या तारखेपासून 08 महिने (आठ महिने). पावसाळा आणि कापणीचा कालावधी समाविष्ट आहे. निविदा सादर करण्याची सुरुवात तारीख: 20-01-2026. निविदा सादर करण्याची अंतिम तारीख आणि वेळ तारीख: 03.02.2026 दुपारी 3:00 वाजेपर्यंत. निविदा बंद करण्याची तारीख आणि वेळ तारीख: 03.02.2026 दुपारी 3:00 वाजेपर्यंत. निविदेची संपूर्ण माहिती उपलब्ध असलेली वेबसाइट: www.ireps.gov.in

**सहाय्यक विभागीय सिग्नल आणि दूरसंचार अभियंता (नियंत्रक) सीआर, सोलापूर**
Akar/Sur-1
**तुमच्या प्राण्यांना रेल्वे लाईनपासून दूर ठेवा**

**मध्य रेल्वे**
**सोलापूर विभाग**
**सिग्नलिंग कामे**

सहाय्यक विभागीय सिग्नल आणि दूरसंचार अभियंता (बांधकाम) सी.आर., सोलापूर, भारताच्या राष्ट्रपतींच्या वतीने आणि त्यांच्या वतीने, खालील कामांसाठी पात्र निविदाधारकांकडून ऑनलाइन खुल्या ई-निविदा मागवत आहेत. निविदा सूचना क्रमांक SUR-NC-CR-SNT-C-S-02-2026 दिनांक 11-01-2026. कामाचे नाव: मध्य रेल्वेच्या सोलापूर विभागात सोलापूर-उस्मानाबाद नवीन बीजी लाईनच्या संदर्भात उस्मानाबाद ते तुळजापूर दरम्यान 3 स्थानकांवर इलेक्ट्रॉनिक इंटरलॉकिंगची तरतूद, उस्मानाबाद येथे आरआरआयमध्ये बदल करण्याचे काम आणि उस्मानाबाद ते तुळजापूर दरम्यान 04 स्थानकांवर आउटडोअर सिग्नलिंगचे काम. कामाची अंदाजे किंमत: 25,77,79,676.19 (पंचवीस कोटी सत्तावन्न लाख एकोणसाठ हजार सहाशे छहत्तर पैसे फक्त). निविदा फॉर्म/पुस्तिकेची किंमत: रु.0.00. 14,38,900/- (रु. बयाणा रक्कम: चौदा लाख अठ्ठावीस हजार) नऊशे फक्त) काम पूर्ण करण्याचा कालावधी: ड्ज जारी केल्याच्या तारखेपासून १२ महिने (बारा महिने). पावसाळा आणि कापणीचा कालावधी समाविष्ट आहे. निविदा सादर करण्याची सुरुवात तारीख: 26-01-2026. निविदा सादर करण्याची अंतिम तारीख आणि वेळ तारीख: 09.02.2026 दुपारी 3:00 वाजेपर्यंत. निविदा बंद करण्याची तारीख आणि वेळ तारीख: 09.02.2026 दुपारी 3:00 वाजेपर्यंत. निविदेची संपूर्ण माहिती उपलब्ध असलेली वेबसाइट: www.ireps.gov.in

**सहाय्यक विभागीय सिग्नल आणि दूरसंचार अभियंता (नियंत्रक) सीआर, सोलापूर**
Akar/Sur-2
**तुमच्या प्राण्यांना रेल्वे मार्गांपासून दूर ठेवा**

**जाहीर प्रसिध्दीकरण**

निशाणी नंबर - ६
कि.दि. अर्ज नं १३९/२०२५

**बार्शी येथिल मे. दिवाणी न्यायाधिश सा. कनिष्ठ स्तर यांचे कोर्टात**

१) श्री रमेश विश्वनाथ सरडेपाटील
वय-६६ वर्षे, धंदा - नोकरी
२) श्री रामदास विश्वनाथ सरडे — **अर्जदार**
वय -६३ वर्षे, धंदा - शेती
दोघे रा. पागंरी, ता बार्शी, जि सोलापूर
३) सौ. सुनंदा विठ्ठल मडके
वय- ६७ वर्षे, धंदा - घरकाम
रा. मोहा, ता. कळंब, जि. धाराशिव

**विरूध्द**

कोणीही नाही — **जाब देणार**

ज्याअर्थी, यातील अर्जदार नामे १) श्री. रमेश विश्वनाथ सरडेपाटील, २) श्री रामदास विश्वनाथ सरडे, ३) सौ. सुनंदा विठ्ठल मडके हे कै. द्रोपदी विश्वनाथ सरडे यांचे कायदेशीर वारस आहेत.

त्याअर्थी कै. द्रोपदी विश्वनाथ सरडे यांच्या नावे बँक ऑफ इंडिया शाखा पांगरी, ता. बार्शी, जि. सोलापूर बचत खाते नं. ०७३२१०१००००३८४७ असून त्यांच्या खात्यावर रक्कम रूपये ३९,०००/- अक्षरी रक्कम रू. एकोणचाळीस हजार फक्त किंवा जी जमा असेल ती शिल्लक रक्कम आहे. अर्जदार नं. १ ते ३ यांनी सदर बचत खातेवरील रक्कम मिळणेकामी या न्यायालयात वारसाप्रमाणपत्र मिळणेकामी अर्ज दाखल केला आहे.

ज्याअर्थी, या जाहीर प्रसिध्दीकरणाने कळविणेत येते की, अर्जदारांचे वर नमूद मागणी संबंधाने व अन्य कोणाचे काही कायदेशीर हक्क, हितसंबंध आक्षेप असलेस व मयतास अन्य कोणी वारस असल्यास संबंधितांनी ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसांच्या आत व पुढील नेमलेली तारीख १६/०२/२०२६ रोजी में. कोर्टात स्वतः व माहितीगार ॲडव्होकेट मार्फत हजर होवून आपले म्हणणे, हरकती, तक्रारी लेखी स्वरूपात सादर कराव्यात, मुदतीत कोणाच्याही तकारी, हरकती प्रकरणी में. कोर्टाचे पुढील योग्य ते हुकुम होतील.

ता. १३/०१/२०२६

**सही/-**
**कनिष्ठ लिपीक**
**दिवाणी न्यायालय क. स्तर बार्शी**

शिक्का

**सही/-**
**सहाय्यक अधिक्षक**
**दिवाणी न्यायालय क. स्तर बार्शी**

**IDFC FIRST Bank Limited**
**(erstwhile Capital First Limited, amalgamated with IDFC Bank Limited and presently known as IDFC First Bank Limited)**
**CIN : L65110TN2014PLC097792**
**Registered Office: -** KRM Towers, 8th Floor, Harrington Road, Chetpet, Chennai-600031.
Tel : +91 44 4564 4000 | Fax: +91 44 4564 4022

IDFC FIRST Bank

**वित्तीय मालमत्तेचे सुरक्षा आणि पुनर्बांधणी आणि सुरक्षा व्याज अंमलबजावणी कायदा, २००२ च्या कलम १३ (२) अंतर्गत सूचना**

खालील कर्जदार आणि सह-कर्जदारांनी आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड (पूर्वी कॅपिटल फर्स्ट लिमिटेड, आयडीएफसी बँक लिमिटेडमध्ये विलीन झालेले आणि सध्या आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड म्हणून ओळखले जाणारे) कडून खाली नमूद केलेली सुरक्षित कर्जे घेतली. खाली नमूद केलेल्या कर्जदार आणि सह-कर्जदारांची कर्जे त्यांच्या संबंधित मालमत्तेच्या गहाणखताने सुरक्षित करण्यात आली आहेत. त्यांनी संबंधित कर्ज करारांच्या अटी आणि शर्तींचे पालन करण्यात अयशस्वी झाल्यामुळे आणि अनियमित झाल्यामुळे, आरबीआयच्या मार्गदर्शक तत्त्वांनुसार त्यांचे कर्ज एनपीए म्हणून वर्गीकृत करण्यात आले. आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड (पूर्वीची कॅपिटल फर्स्ट लिमिटेड, आयडीएफसी बँक लिमिटेडमध्ये विलीन झालेली आणि सध्या आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड म्हणून ओळखली जाणारी) यांना त्यांच्याकडून देय असलेल्या रकमा खालील तक्त्यात अधिक स्पष्टपणे वर्णन केलेल्या संबंधित सूचनांनुसार नमूद केल्या आहेत आणि त्या रकमेवरील पुढील व्याज देखील लागू असेल आणि ते त्यांच्या संबंधित तारखांपासून लागू होणाऱ्या कराराच्या दरानुसार आकारले जातील.

| अं. क्र. | कर्ज खाते क्र. | कर्जाचा प्रकार | कर्जदार आणि सह-कर्जदारांची नावे | कलम १३ (२) सूचना दिनांक | कलम १३ (२) सूचनेनुसार थकबाकीची रक्कम |
|---|---|---|---|---|---|
| 1 | 78954077 | मालमत्तेवर कर्ज | 1. नंदकुमार दत्तात्रय भोसले<br>2. दत्तू दगडू भोसले<br>3. चंद्रकांत दत्तात्रय भोसले | 06/12/2025 | INR 4,30,725.12/- |

**मालमत्तेचा पत्ता :** आलेगाव बुद्रुकचा सर्व तुकडा आणि पार्सल गावठाण प्लॉट क्रमांक ५ पैकी ३१ क्षेत्र ० एच ०१ आर, मूल्यांकन १ रु. ५० . त्यात आलेगाव बुद्रुक ग्रामपंचायत मिल्कट क्र.२६३, एकूण जमीन-१६४३. चौ. ., आलेगाव बुद्रुक येथे वसलेले, आलेगाव बुद्रुक ग्रामपंचायतीच्या स्थानिक मर्यादेत, तालुका: माढा, जिल्हा: सोलापूर, महाराष्ट्र-४१३२१२, आणि सीमा: पूर्व: ग्रामपंचायत मिल्कट क्र. २६९ श्री. शिवाजी गोपीनाथ शेलार पश्चिम: ग्रामपंचायत क्रमांक २६९ श्री. शिवाजी गोपीनाथ शेलार पश्चिम: ग्रामपंचायत क्रमांक २६. श्री. शिवाजी गोपीनाथ शेलार. वसंत काळे. दक्षिण: ग्रामपंचायत रस्ता

या प्रकाशनाच्या तारखेपासून ६० दिवसांच्या आत तुम्हाला वरील तक्त्यात दाखवलेल्या तपशीलांनुसार आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड (पूर्वीची कॅपिटल फर्स्ट लिमिटेड, आयडीएफसी बँक लिमिटेडमध्ये विलीन झालेली आणि सध्या आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड म्हणून ओळखली जाणारी) कडे रक्कम त्यांच्या संबंधित तारखांपासून आणि इतर खर्च, शुल्क इत्यादींपासून करारबद्ध व्याजदरासह भरण्याचे आवाहन करण्यात येत आहे. असे न केल्यास, खाली स्वाक्षरी करणाऱ्या व्यक्तीला आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड (पूर्वीची कॅपिटल फर्स्ट लिमिटेड, आयडीएफसी बँक लिमिटेडमध्ये विलीन झालेली आणि सध्या आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड म्हणून ओळखली जाणारी) कडे देय रक्कम वसूल करण्यासाठी वर नमूद केलेल्या गहाण ठेवलेल्या मालमत्तेविरुद्ध कलम १३ (४) आणि कलम १४ अंतर्गत कार्यवाही सुरू करण्यास भाग पाडले जाईल. शिवाय, तुम्हाला सदर कायद्याच्या कलम १३ (१३) अंतर्गत सदर सुरक्षित मालमत्ता विक्री/भाडेपट्टा किंवा इतर प्रकारे हस्तांतरित करण्यास मनाई आहे.

**दिनांक : 14/01/2026**
**स्थळ : सोलापूर, महाराष्ट्र**

**सही/- अधिकृत अधिकारी**
**आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड (पूर्वीचे कॅपिटल फर्स्ट लिमिटेड, आयडीएफसी बँक लिमिटेडमध्ये एकत्र केलेले आणि सध्या आयडीएफसी फर्स्ट बँकलिमिटेडम्हणून ओळखले जाते)**

CMYK

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत

https://epaper.dainiktarunbharat.com/



## महत्त्वाचे

### भारताविरुद्धच्या मालिकेनंतर एलिसा हिलीची निवृत्ती

**सिडनी** : ऑस्ट्रेलियाच्या सर्वोत्तम महिला क्रिकेटपटूंपैकी एक असलेली एलिसा हिली मार्चमध्ये भारताविरुद्धच्या घरच्या मालिकेनंतर आंतरराष्ट्रीय



क्रिकेटमधून निवृत्त होणार आहे. ३५ वर्षीय हिली पर्थमध्ये भारताविरुद्ध होणाऱ्या तीन सामन्यांच्या एकदिवसीय आणि एकमेव महिला कसोटी मालिकेत शेवटच्या वेळी ऑस्ट्रेलियाचे नेतृत्व करेल. महिला क्रिकेटमधील सर्वात स्फोटक फलंदाजांपैकी एक असलेल्या हिलीने एका निवेदनात म्हटले आहे की, भारताविरुद्धची आगामी मालिका ही ऑस्ट्रेलियासाठी माझी शेवटची मालिका असेल. ऑस्ट्रेलियासाठी खेळण्याची माझी इच्छा कायम आहे, परंतु सुरुवातीपासूनच मला प्रेरित करणारी स्पर्धात्मक भावना काहीशी कमी झाली आहे, त्यामुळे निवृत्तीची ही योग्य वेळ आहे असे वाटते. या वर्षीच्या टी-२० विशवचषकात मी खेळू शकणार नाही आणि संघाकडे तयारीसाठी मर्यादित वेळ आहे हे माहीत असल्याने, मी हिलीच्या नेतृत्वाखाली ऑस्ट्रेलियाने आठ विश्वविजेतेपदे जिंकली आहेत, त्यापैकी सहा टी-२० स्वरूपात आणि दोन एकदिवसीय क्रिकेटमध्ये. एलिसा हिलीने ऑस्ट्रेलियासाठी १० कसोटी, १२३ एकदिवसीय आणि १६२ टी-२० आंतरराष्ट्रीय सामने खेळले आहेत. ■

### प्रिटोरिया कॅपिटल्सकडून एमआय केपटाऊनचा पराभव

**सेंच्युरियन** : प्रिटोरिया कॅपिटल्सने शानदार अष्टपैलू कामगिरीचे प्रदर्शन करत एमआय केपटाऊनचा ५३ धावांनी पराभव करून एसए२० क्रिकेट स्पर्धेच्या गुणतालिकेत अव्वल स्थान पटकावले. बोनस पॉईंट विजयामुळे प्रिटोरिया कॅपिटल्सचे २० गुण झाले, तर सनरायझर्स ईस्टर्न केप (१९ गुण) दुसऱ्या स्थानावर घसरले. या पराभवामुळे एमआय केपटाऊनच्या प्लेऑफमध्ये पोहोचण्याच्या अपेक्षांना मोठा धक्का बसला. सोमवारी रात्री खेळल्या गेलेल्या सामन्यात, कॅपिटल्सने प्रथम फलंदाजी करताना शेरफेन रुदरफोर्ड (२७ चेंडूत ५३ धावा) यांच्या अर्धशतकाच्या जोरावर ६ बाद १८५ धावा केल्या. प्रत्युत्तरात एमआय केपटाऊनला ७ बाद १३२ धावाच करता आल्या. एमआय केपटाऊनकडून रीझा हेंड्रिक्सने नाबाद ६८ धावा केल्या. कॅपिटल्सकडून गिडॉन पीटर्सने ३२ धावांत तीन बळी घेतले.

### मर्यादित एकदिवसीय सामन्यांमुळे मालिकेचे महत्त्व

**राजकोट** : जागतिक स्तरावर होणाऱ्या असंख्य स्पर्धांमध्ये मर्यादित संख्येने एकदिवसीय सामने खेळले जात असल्याने भारताविरुद्ध सुरू असलेल्या एकदिवसीय मालिकेचे महत्त्व आणखी वाढले आहे, असे मत न्यूझीलंडचा फलंदाज हेन्री निकोलसने मंगळवारी व्यक्त केले. एकदिवसीय विश्वचषक अजून २२ महिने दूर आहे आणि म्हणूनच पुढील महिन्यात होणाऱ्या टी-२० विश्वचषकावर सर्वांचे लक्ष केंद्रित असल्याने, चालू एकदिवसीय मालिकेच्या प्रासंगिकतेवर आणि संदर्भावर पुन्हा प्रश्न उपस्थित झाले आहेत. मोठ्या स्पर्धांमध्ये इतके एकदिवसीय सामने खेळले जात नाहीत आणि म्हणूनच मला वाटते की अशा मालिका आणखी महत्त्वाच्या बनतात, असे निकोलस बुधवारी होणाऱ्या दुसऱ्या एकदिवसीय सामन्यापूर्वी म्हणाला. आपल्यापैकी काही जण घरच्या मैदानावर लिस्ट ए क्रिकेट खेळत आहेत, म्हणून आम्हाला या फॉरमॅटचा काही अनुभव आहे. पण हा एक फॉरमॅट आहे जो आम्हाला खेळायला आवडतो. तो म्हणाला. या फॉरमॅटमध्ये मर्यादित संख्येने सामने असल्याने ही मालिका पूर्वीपेक्षा अधिक महत्त्वाची बनली आहे. जर न्यूझीलंडला भारताला हरवायचे असेल तर त्यांना त्यांचे सातत्य राखावे लागेल. फलंदाजीच्या दृष्टिकोनातून, आम्ही बऱ्याच गोष्टी खरोखर चांगल्या केल्या आणि त्या गोष्टी आपण आणखी काही काळ चालू ठेवू शकतो का हा प्रश्न आहे. ■

# भारताचा मालिका जिंकण्याचा निर्धार

## न्यूझीलंडविरुद्ध दुसरा एकदिवसीय सामना आज

◆ **राजकोट, १३ जानेवारी**

विराट कोहलीच्या उत्कृष्ट फॉर्ममुळे भारताच्या काही प्रमुख खेळाडूंच्या दुखापतींबद्दल वाढत्या चिंता काही प्रमाणात कमी झाल्या आहेत आणि बुधवारी न्यूझीलंडविरुद्धचा दुसरा एकदिवसीय सामना जिंकून भारत तीन सामन्यांच्या मालिकेत अजिंक्य आघाडी घेण्याचा प्रयत्न करेल.

वडोदरा येथे खेळल्या गेलेल्या पहिल्या सामन्यात भारताने न्यूझीलंडचा चार गड्यांनी पराभव केला. त्या सामन्यात वॉशिंग्टन सुंदर जखमी झाला होता आणि तो एकदिवसीय मालिकेतून बाहेर पडला आहे. निवडकर्त्यांनी दिल्लीच्या आयुष बदोनीचा संघात समावेश केला आहे, परंतु भारताचे मुख्य प्रशिक्षक गौतम गंभीर यांच्या अष्टपैलू खेळाडूंना प्राधान्य देण्याच्या धोरणामुळे, नितीश कुमार रेड्डी याच्या रूपात आणखी एक अष्टपैलू खेळाडू प्लेइंग इलेव्हनमध्ये समाविष्ट होऊ शकतो.





पहिल्या एकदिवसीय सामन्यापूर्वी दुखापतीमुळे ऋषभ पंत मालिकेतून बाहेर पडला. निवडकर्त्यांनी त्याच्या जागी ध्रुव जुरेलला घेण्याचा निर्णय घेतला, जो संघ व्यवस्थापनासाठी एक विशेषज्ञ फलंदाज म्हणून दुसरा पर्याय असू शकतो. भारतीय संघाकडे अनेक पर्याय आहेत, परंतु पुढील महिन्यात सुरू होणाऱ्या टी-२० विश्वचषकाच्या पृष्ठभूमीवर ते कोणताही धोका पत्करू इच्छित नाहीत.

भारतीय संघासाठी या चिंता असताना, सर्वांच्या नजरा कोहली आणि रोहित शर्मावर असतील, जे आता त्यांच्या कारकीर्दीच्या शेवटच्या टप्प्यात आहेत. कोहलीचे पहिल्या सामन्यात त्याचे ५४ वे एकदिवसीय शतक हुकले, परंतु ९१ चेंडूत त्याच्या ९३ धावांनी भारताच्या विजयाचा पाया रचला.

भारत आणि न्यूझीलंड संघांमध्ये लक्षणीय फरक आहे. किवीजचा गोलंदाजीचा हल्ला मजबूत नाही आणि भारतीय फलंदाज याचा पुरेपूर फायदा घेण्याचा प्रयत्न करतील.

पहिल्या एकदिवसीय सामन्यात पराभव असूनही, न्यूझीलंडला विश्वास आहे की कोहलीच्या प्रभावी कामगिरी असूनही त्यांनी भारताला कठीण लढत दिली. भारत लक्ष्याच्या दिशेने सहज मार्गावर असताना, काइल जेमिसनने त्याच्या गोलंदाजी कौशल्याचे उत्कृष्ट प्रदर्शन करून सामना रोमांचक बनवला. शेवटच्या क्षणी झेल सोडल्याचे त्याचे परिणाम त्याच्या संघाला भोगावे लागले.

डावखुरा फलंदाज डेव्हॉन कॉनवे आणि हेन्री निकोल्सने पहिल्या गड्यासाठी ११७ धावा जोडून न्यूझीलंडला चांगली सुरुवात करून दिली, परंतु त्यांचे मधल्या फळीतील फलंदाज भांडवल करण्यात अपयशी ठरले. या क्षेत्रात सुधारणा करण्याच्या उद्देशाने संघ मैदानात उतरेल. ◂(वृत्तसंस्था)

**आजचा सामना**
**भारत विरुद्ध न्यूझीलंड**
**स्थळ** : सौराष्ट्र क्रिकेट असोसिएशन स्टेडियम, राजकोट
**वेळ** : दुपारी १:३० वाजतापासून
**थेट प्रसारण** : स्टार स्पोर्ट्सवर

# दिल्ली कॅपिटल्स, यूपी वॉरियर्स पॉवरप्लेमध्ये वर्चस्व गाजवणार

### महिला प्रीमियर लीग

◆ **नवी मुंबई, १३ जानेवारी**

बुधवारी येथे होणाऱ्या महिला प्रीमियर लीग (डब्ल्यूपीएल) सामन्यात यूपी वॉरियर्स आणि दिल्ली कॅपिटल्स या संघांना पॉवरप्लेमध्ये त्यांची कामगिरी सुधारावी लागणार आहे.

वॉरियर्सच्या फलंदाजांनी पॉवरप्लेमध्ये अपेक्षेनुसार चांगली कामगिरी केलेली नाही, तर कॅपिटल्सच्या गोलंदाजांना खेळाच्या या महत्त्वाच्या टप्प्यात संघर्ष करावा लागला आहे. जेमिमाह रॉड्रिग्जच्या नेतृत्वाखाली कॅपिटल्सची सुरुवात चांगली झालेली नाही आणि तिचा संघ त्यांची मोहीम पुन्हा रुळावर आणण्यासाठी उत्सुक असेल.

गुजरात जायंट्सविरुद्धच्या पराभवानंतर रॉड्रिग्ज म्हणाली, मला वाटते की, पॉवरप्लेमध्ये आमची गोलंदाजी चांगली नव्हती. आम्हाला आमची रणनीती सुधारण्याची गरज आहे. दिल्ली कॅपिटल्ससाठी आतापर्यंतचे सकारात्मक पैलू म्हणजे श्री चरणी आणि नंदिनी शर्मा या गोलंदाजांची चांगली कामगिरी. गेल्या सामन्यात



जेमिमाह रॉड्रिग्ज



मेग लॅनिंग

नंदिनीची हॅट्ट्रिक तिच्या आत्मविश्वासात लक्षणीय वाढ करेल.

दुसरीकडे, यूपी वॉरियर्सना पॉवरप्लेमध्ये चांगली फलंदाजी करावी लागेल. पहिल्या दोन सामन्यांमध्ये, हरलीन देओल आणि किरण नवघरे यांनी मेग लॅनिंगसोबत डावाची सुरुवात केली, परंतु दोघांचेही संयोजन प्रभावी ठरले नाही. लॅनिंगसोबत डावाची सुरुवात करण्यासाठी संघ व्यवस्थापनाला योग्य खेळाडू शोधण्याची आवश्यकता असेल. भारतीय जलद गोलंदाज क्रांती गौड आणि शिखा पांडे यांनाही त्यांच्या कामगिरीत सुधारणा करावी लागेल. डिआंड्रा डॉटिन यांनाही गेल्या सामन्यातील निराशेतून सावरावे लागेल. त्या सामन्यात ग्रेस हॅरिसने तिच्या एका षटकात ३२ धावा दिल्या.

रॉयल चॅलेंजर्स बंगळुरूविरुद्धच्या पराभवानंतर, कर्णधार लॅनिंग म्हणाली, निश्चितच काही क्षेत्रांमध्ये आपल्याला सुधारणा करण्याची आवश्यकता आहे. विशेषतः आघाडीच्या फलंदाजांना चांगली कामगिरी करावी लागेल. सुरुवातीला आम्ही बरेच डॉट बॉल खेळले. ◂(वृत्तसंस्था)

# दिल्लीला हरवून विदर्भ उपांत्य फेरीत

### कर्नाटकशी लढत

◆ **बंगळुरू, १३ जानेवारी**

गेल्या हंगामातील उपविजेत्या विदर्भाने शिस्तबद्ध आणि अष्टपैलू कामगिरी दाखवत मंगळवारी येथे विजय हजारे एकदिवसीय क्रिकेट स्पर्धेच्या उपांत्य फेरीत प्रवेश केला. उपांत्य फेरीत विदर्भाचा सामना कर्नाटकशी होईल. या दोन्ही संघांमधील गेल्या हंगामातील अंतिम सामना खेळला गेला.

विदर्भाने प्रथम फलंदाजी करताना ९ बाद ३०० धावांचा आव्हानात्मक आकडा गाठला. यश राठोडने ८६ धावांचे योगदान दिले आणि सलामीवीर अथर्व तायडेने ६२ धावांचे योगदान दिले.

प्रत्युत्तरादाखल, दिल्लीचा संघ ४५.१ षटकांत २२४ धावांवर गारद झाला. त्यांना कर्णधार ऋषभ पंत आणि उपकर्णधार आयुष बदोनीची उणीव भासली. पंत दुखापतग्रस्त आहे, तर बदोनीचा न्यूझीलंडविरुद्धच्या एकदिवसीय मालिकेसाठी राष्ट्रीय संघात समावेश करण्यात आला आहे.

त्याच्या अनुपस्थितीत, विदर्भाच्या मिश्र गती आणि फिरकी आक्रमणाविरुद्ध दिल्लीच्या फलंदाजांना संघर्ष करावा लागला. विदर्भाकडून वेगवान गोलंदाज नचिकेत भुतेने ७.१ षटकांत ५१ धावा देत चार बळी घेतले. डावखुरा फिरकी गोलंदाज आणि कर्णधार हर्ष दुबेनेही प्रभावी कामगिरी केली, त्याने ९ षटकांत ३६ धावा देत तीन बळी घेतले, तर नवीन गोलंदाज प्रफुल्ल हिंगेने ५४ धावांत दोन बळी घेऊन उपयुक्त योगदान दिले.



सामनावीर यश राठोड

यष्टीरक्षक-फलंदाज अनुज रावतने दिल्लीकडून एकट्याने झुंज दिली, ९८ चेंडूत ६६ धावा केल्या, परंतु संघाला उपांत्य फेरीत पोहोचवण्यासाठी ते पुरेसे नव्हते. सहाव्या क्रमांकावर खेळताना, रावतने वरच्या आणि मध्यम क्रमवारीतील फलंदाजांच्या अपयशानंतर डाव स्थिर करण्याचा प्रयत्न केला, मयंक गुसैन (१८), हर्ष त्यागी (२७) आणि हृतिक शोकिन (२१) यांच्यासह उपयुक्त धावा जोडल्या. तथापि, नियमित अंतराने गडी बाद झाल्याने त्याचे प्रयत्न निष्फळ ठरले.

तत्पूर्वी, सलामीवीर अमन मोखाडे (०६) लवकर बाद झाल्यानंतर विदर्भाने जोरदार पुनरागमन केले. तायडे (७२ चेंडूत ६२ धावा) आणि ध्रुव शौरी (७१ चेंडूत ४९ धावा) यांनी दुसऱ्या गड्यासाठी ९० धावांची भागीदारी केली. दिल्लीचा कर्णधार इशांत शर्माने तायडेला बाद करून लिस्ट ए क्रिकेटमध्ये आपला २०० वा बळी घेतला. इशांत व्यतिरिक्त, नवदीप सैनी आणि प्रिन्स यादव यांनीही दिल्लीकडून प्रत्येकी दोन बळी घेतले. ◂(वृत्तसंस्था)

# पंजाबचा १८३ धावांनी विजय, उपांत्यमध्ये सौराष्ट्रशी गाठ

### विजय हजारे चषक

◆ **बंगळुरू, १३ जानेवारी**

विजय हजारे ट्रॉफीच्या उपांत्य फेरीत पंजाबने स्थान निश्चित केले आहे. प्रथम फलंदाजी करताना पंजाबने ६ बाद ३४५ धावा केल्या. प्रत्युत्तरात मध्यप्रदेश संघ केवळ १६२ धावा काढू शकला. त्यांना १८३ धावांनी पराभव पत्करावा लागला. उपांत्य सामन्यात १६ जानेवारी रोजी पंजाबचा सामना सौराष्ट्राशी होईल. पंजाबचे नेतृत्व प्रभसिमरन सिंग करत आहेत.

प्रथम फलंदाजी करताना पंजाबने कर्णधार प्रभसिमरन सिंगच्या ८६ चेंडूत ८८ धावा, अनमोलप्रीत सिंगच्या ६२ चेंडूत ७० धावा, नेहल वधेराच्या ३८ चेंडूत ५६ धावा आणि हरनूर सिंगच्या ७१ चेंडूत ५१ धावा यामुळे ६ गडी गमावून ३४५ धावा केल्या.



अर्धशतक झळकविल्यानंतर बॅट उंचावताना प्रभसिमरन सिंग

अय्यरचा प्रथम गोलंदाजी करण्याचा निर्णय चुकीचा ठरला आणि प्रभसिमरन आणि हरनूर यांनी २१ षटकांत पहिल्या गड्यासाठी १६६ धावा जोडत पंजाबला दमदार सुरुवात करून दिली.

आर्यन पांडेने २२ व्या षटकात हरनूरला बाद करून मध्य प्रदेशला पहिले यश मिळवून दिले, परंतु त्यानंतर अनमोलप्रीतने झटपट धावा काढल्या. प्रभसिमरनचे शतक हुकले रमणदीप सिंगनेही १५ चेंडूत २४ धावा केल्या. मध्य प्रदेशकडून त्रिपुरेश सिंग आणि कर्णधार वेंकटेश अय्यर यांनी प्रत्येकी दोन गडी बाद केले. प्रत्युत्तरादाखल मध्य प्रदेशचा संघ ३१.२ षटकांत १६२ धावांवर संपुष्टात आला.

आणि ३० व्या षटकात कुलदीप सेनच्या गोलंदाजीवर सारांश जैनने त्याला झेलबाद केले. नमन धीरही २३ धावांवर बाद झाला. त्यामुळे पंजाबची अवस्था ३ बाद १९९ अशी झाली. वधेराने चौथ्या गड्यासाठी अनमोलप्रीतसोबत ७६ धावांची जलद भागीदारी केली.

प्रत्युत्तरादाखल मध्य प्रदेशची सुरुवात खराब झाली. १७ व्या षटकापर्यंत ६६ धावांत गडी गमावले. रजत पाटीदारने ४० चेंडूत ३८ धावा केल्या. त्यामुळे धावसंख्या ७ बाद १३२ अशी राहिली. त्रिपुरेश सिंगने पाटीदारसह ३१ धावा केल्या. पंजाबकडून संवीर सिंगने सहा षटकांत ३१ धावांत ३ गडी बाद केले. ◂(वृत्तसंस्था)

### भारताबाहेर सामने हलवण्यास बीसीसीआयचा नकार

**ढाका** : आयसीसीने मंगळवारी बांगलादेश क्रिकेट बोर्डाला टी-२० विश्वचषक सामने भारताबाहेर हलवण्याच्या विनंतीवर पुनर्विचार करण्याची विनंती केली, परंतु बीसीसीआयने सुरक्षेच्या कारणास्तव तसे करण्यास नकार दिला. एका निवेदनात, बीसीबीने म्हटले आहे की बोर्डाचा निर्णय तसाच आहे, जरी आयसीसीने त्यांची विनंती स्वीकारण्यास नकार दिला आहे. दोन्ही पक्ष संभाव्य उपाय शोधत राहतील असे म्हटले आहे. ■

### कार्लसन नॉर्वे बुद्धिबळ स्पर्धेत सहभागी होणार

◆ **नवी दिल्ली, १३ जानेवारी**

बुद्धिबळ खेळाडू मॅग्नस कार्लसन यांनी आगामी नॉर्वे बुद्धिबळ स्पर्धेत सहभागी होण्याबाबतच्या अटकळांना पूर्णविराम देत, यावेळी स्टॅव्हेंजरऐवजी ओस्लो येथे होणाऱ्या या प्रतिष्ठित स्पर्धेत सहभागी होणार असल्याची घोषणा केली आहे.

कार्लसन गेल्या १३ वर्षांपासून सातत्याने त्याच्या घरच्या भूमीवर होणाऱ्या स्पर्धेत खेळत आहे, परंतु अलिकडेच त्याने क्लासिकल बुद्धिबळापासून दूर राहण्याचा निर्णय घेतला आहे. त्यामुळे या स्पर्धेत त्याच्या सहभागाबद्दल शंका निर्माण झाली आहे. नॉर्वे बुद्धिबळ ही एक क्लासिकल स्वरूपाची स्पर्धा आहे आणि कार्लसनने ती सात वेळा जिंकली आहे. मॅग्नस कार्लसन हा नॉर्वे बुद्धिबळ २०२६ मध्ये त्याच्या सहभागाची सार्वजनिकपणे पुष्टी करणारा पहिला खेळाडू आहे. उर्वरित सहभागींची घोषणा येत्या आठवड्यात नॉर्वे बुद्धिबळात सहभागी होणाऱ्या महिला खेळाडूंच्या यादीसह केली जाईल, असे आयोजकांनी प्रसिद्धी पत्रकात म्हटले आहे. ◂(वृत्तसंस्था)

# सात्त्विक-चिरागला वॉकओव्हर

## आयुषला हरवून लक्ष्य सेन दुसऱ्या फेरीत

◆ **नवी दिल्ली, १३ जानेवारी**

स्टार खेळाडू लक्ष्य सेनने मंगळवारी येथे योनेक्स सनराइज इंडिया ओपन २०२६ सुपर ७५० स्पर्धेच्या दुसऱ्या फेरीत सरळ गेममध्ये पराभव केला.



सात्त्विकसाईराज रंकीरेड्डी आणि चिराग शेट्टी ही तिसरी मानांकित जोडी बुधवारी पहिल्या फेरीत खेळणार होती, परंतु त्यांचे अमेरिकन प्रतिस्पर्धी चेन झी यी आणि प्रेस्ली स्मिथ स्पर्धेतून माघार घेतल्यानंतर, या स्टार भारतीय जोडीला दुसऱ्या फेरीत प्रवेश करण्यासाठी वॉकओव्हर मिळाला. गेल्या आठवड्यात मलेशिया ओपनच्या पहिल्या फेरीत अमेरिकन जोडी पराभूत झाली होती.

२०२२ चा चॅम्पियन लक्ष्यने आयजी स्टेडियमवर खेळल्या जाणाऱ्या ९५०,००० च्या स्पर्धेच्या पहिल्या फेरीत फक्त ३६ मिनिटांत आयुषचा २१-१२, २१-१५ असा पराभव केला. आयुष पहिल्यांदाच इंडिया ओपनमध्ये खेळत होता. चोवीस वर्षीय लक्ष्यचा पुढचा सामना जपानच्या केंटा निशिमोतोशी होईल, जो त्याचा सातवा मानांकित सहकारी कोडाई नारोका २१-६, ७-५ असा सामना सोडून दुसऱ्या फेरीत पोहोचला. ◂(वृत्तसंस्था)

# त्रिशा-गायत्री दुसऱ्या फेरीत ध्रुव आणि मनीषा बाहेर

### इंडिया ओपन २०२६ सुपर ७५० बॅडमिंटन

◆ **नवी दिल्ली, १३ जानेवारी**

भारताची अव्वल महिला दुहेरी जोडी त्रिशा जॉली आणि गायत्री गोपीचंद यांनी मंगळवारी येथे सरळ गेममध्ये विजय मिळवत इंडिया ओपन २०२६ सुपर ७५० बॅडमिंटन स्पर्धेच्या दुसऱ्या फेरीत प्रवेश केला.

नोव्हेंबरमध्ये सय्यद मोदी इंटरनॅशनल सुपर ३०० स्पर्धेत यशस्वीरीत्या आपले जेतेपद राखणाऱ्या त्रिशा आणि गायत्री यांनी ऑर्निचा जोंगसाथापोनपर्न आणि सुकिता सुवाचाई या थाई जोडीचा ४२ मिनिटांत २१-१५, २१-११ असा पराभव केला.

त्रिशा आणि गायत्री यांनी संपूर्ण सामन्यात दमदार खेळ केला. भारतीय जोडीने उत्कृष्ट नेट प्ले दाखवला आणि स्मॅशसह बरेच गुण मिळवले. दुसऱ्या गेममध्ये थाई जोडीने चांगली सुरुवात केली होती, परंतु त्रिशा आणि गायत्रीने पुनरागमन करून विजय मिळवला.

विजयानंतर गायत्री म्हणाली, गेल्या वर्षी दुखापतींमुळे आम्हाला थोडा त्रास झाला होता, परंतु वर्षाच्या अखेरीस सय्यद मोदी आंतरराष्ट्रीय स्पर्धा जिंकून आम्ही आत्मविश्वास मिळवू शकलो. नवीन हंगाम सुरू होण्यापूर्वी हा एक चांगला निकाल होता. ध्रुव रावत आणि मनीषा के या भारतीय जोडीला मात्र एकतर्फी मिश्र दुहेरी सामन्यात जपानी जोडी हिरोकी मिदोरिकावा आणि नामी मत्सुयामा यांच्याकडून ९-२१, १०-२१ असा सरळ गेममध्ये पराभव पत्करावा लागला.



**व्हिक्टर लेई आणि कुसुमा वर्दानीची धडक**

जागतिक अजिंक्यपद कांस्यपदक विजेता कॅनडाचा व्हिक्टर लेई याने मंगळवारी येथे योनेक्स सनराइज इंडिया ओपन २०२६ सुपर ७५० बॅडमिंटन स्पर्धेच्या पुरुष एकेरीच्या दुसऱ्या फेरीत तीन सामन्यांच्या कठीण सामन्यात विजय मिळवला, तर त्याचाच देशबांधव ब्रायन यांगने चौथ्या मानांकित चायनीज तैपेईच्या चौथ्या मानांकित चाऊ टिएन चेनला सरळ गेममध्ये हरवून धक्का दिला.

महिला एकेरीत, सहाव्या मानांकित आणि जागतिक अजिंक्यपद कांस्यपदक विजेती इंतानोन आणि अनुभवी सातव्या मानांकित इंडोनेशियाची पुत्री कुसुमा वर्दानी आणि अनुभवी सातव्या मानांकित थायलंडची रत्चानोक इंतानोन यशस्वी ठरल्या.

एकवीस वर्षीय व्हिक्टरने फ्रान्सच्या टोमा ज्युनियर पोपोव्हचा २१-१२, १६-२१, २१-८ असा पराभव केला, तर यांगने तिएन चेनचा २१-१९, २१-११ असा सरळ गेममध्ये पराभव केला.

पुरुषांच्या एका सामन्यात, चायनीज तैपेईच्या ची यु-जेनने सहाव्या मानांकित फ्रान्सच्या ॲलेक्स लॅनियरचा २१-१७, २१-१९ असा सरळ गेममध्ये पराभव करून सर्वांनाच धक्का दिला.

महिला एकेरीत, माजी जागतिक नंबर वन रत्चानोकने जपानच्या रिको गुंजीवर २१-१९, २१-१५ असा विजय मिळवला, तर कुसुमा वर्दानीने कॅनेडियन अनुभवी मिशेल लीचा २१-१२, २०-२२, २१-१५ असा पराभव केला. अनुभवी डॅनिश मिया ब्लिचफेल्डने चायनीज तैपेईच्या चू पिन चिएनचा २१-१९, २१-११ असा सरळ गेममध्ये पराभव करून दुसऱ्या फेरीत प्रवेश केला. ◂(वृत्तसंस्था)

# आंतरराष्ट्रीय संबंध आणि ‘मेक इन इंडिया’ समित्या स्थापन करा

### क्रीडा मंत्रालयाची एनएसएफना सूचना

◆ **नवी दिल्ली, १३ जानेवारी**

क्रीडा मंत्रालयाने प्रत्येक राष्ट्रीय क्रीडा महासंघाला (एनएसएफ) संयुक्त सराव कार्यक्रम आणि भारतात प्रमुख स्पर्धा आयोजित करणे यासारख्या मुद्यांवर जागतिक संस्थांशी चांगले सहकार्य सुनिश्चित करण्यासाठी आंतरराष्ट्रीय संबंध समिती स्थापन करण्यास सांगितले आहे.

क्रीडा उत्पादन परिसंस्था मजबूत करण्यासाठी भारतीय उत्पादक, स्टार्टअप्स, संशोधन संस्था आणि चाचणी आणि मानकीकरण संस्थांशी संपर्क साधण्यासाठी मंत्रालयाने एनएसएफना ‘मेक इन इंडिया स्पोर्ट्स कमिटी’ स्थापन करण्यास सांगितले आहे.

एनएसएफना लिहिलेल्या पत्रात मंत्रालयाने म्हटले आहे की, आंतरराष्ट्रीय संबंध समितीमध्ये फेडरेशनचे वरिष्ठ सदस्य, माजी आंतररष्ट्रीय खेळाडू, प्रशिक्षक आणि ‘जागतिक क्रीडा प्रशासन आणि राजनैतिक कूटनीतीमध्ये महत्त्वपूर्ण अनुभव असलेले तज्ज्ञ’ यांचा समावेश असावा.

पत्रात मंत्रालयाने म्हटले आहे की, समितीची संपूर्ण माहिती ३० दिवसांच्या आत मंत्रालयाला कळवावी. क्रीडा सचिव हरि रंजन राव यांनी एनएसएफ अधिकाऱ्यांना दैनंदिन प्रशासन सीईओंवर सोपवून भारताच्या फायद्यासाठी आंतरराष्ट्रीय संबंध निर्माण करण्यावर लक्ष केंद्रित करण्याचे आवाहन केल्यानंतर काही दिवसांतच मंत्रालयाचा हा सल्ला आला आहे.

गेल्या आठवड्यात त्यांनी अहमदाबादमध्ये म्हटले होते की, तुम्ही प्रशासक नाही तर दूरदर्शी बांधकाम व्यावसायिक आहात. तुमच्या संघटनेत व्यावसायिक प्रशासकांची आवश्यकता आहे जे फेडरेशनचे दैनंदिन कामकाज हाताळू शकतील आणि तुम्ही आंतरराष्ट्रीय संस्थांशी संबंध विकसित करण्यावर आणि विकास योजना तयार करण्यावर लक्ष केंद्रित केले पाहिजे. ◂(वृत्तसंस्था)

# महाराष्ट्राचे दोन्ही संघ उपउपांत्यपूर्व फेरीत

## ५८ वी वरिष्ठ राष्ट्रीय अजिंक्यपद खो-खो स्पर्धा

◆ **काझीपेठ, १३ जानेवारी**

येथील रेल्वे ग्राऊंडवर सुरू असलेल्या ५८ व्या वरिष्ठ राष्ट्रीय खो-खो अजिंक्यपद स्पर्धेने पहिल्याच दिवसापासून प्रेक्षकांची मने जिंकली आहेत. तेलंगणा खो-खो असोसिएशनच्या आयोजनाखाली देशभरातील बलाढ्य संघांनी मैदानात उतरून कौशल्य, वेग, चपळाई आणि रणनीतीचा अफलातून संगम सादर केला. प्रारंभीच्या सामन्यांतच महाराष्ट्र, कोल्हापूर, रेल्वे आणि छत्तीसगड संघांनी जोरदार विजय मिळवत प्रतिस्पर्ध्यांची दाणादाण केली आणि दिमाखात उपउपांत्यपूर्व फेरीत पुढील फेरीत प्रवेश निश्चित केला.

पुढील संघांनी उपउपांत्यपूर्व फेरी गाठली पुरुष गट : महाराष्ट्र, रेल्वे, पुद्दुचेरी, उत्तर प्रदेश, कोल्हापूर, गुजरात, ओडिशा, विदर्भ, केरळ, दिल्ली, पश्चिम बंगाल, छत्तीसगड, आंध्र प्रदेश, तामिळनाडू, कर्नाटक, तेलंगणा.




प्रतिस्पर्धी संघाच्या खेळाडूला बाद करताना महाराष्ट्र संघाच्या मुली

**महिला गट** : महाराष्ट्र, ओडिशा, विदर्भ, विमानतळ, पंजाब, दिल्ली, राजस्थान, कोल्हापूर, गुजरात, केरळ, कर्नाटक, पश्चिम बंगाल, आंध्र प्रदेश, तामिळनाडू.

**महिला गटात महाराष्ट्राचा उत्तर प्रदेश व चंदीगडवर विजय**

महिला गटात महाराष्ट्राने उत्तर प्रदेशवर ४४-१० असा १ डाव ३४ गुणांनी दणदणीत विजय मिळवून गटात अव्वल स्थान पटकावले. ड्रीम रनद्वारे ८ गुण मिळवण्यात महाराष्ट्र यशस्वी ठरला. महाराष्ट्राकडून सरिता दिवा (२.५० मि. संरक्षण व २ गुण), सुहानी धोत्रे (१.३० मि. संरक्षण व ८ गुण), रेश्मा राठोड (२ मि. संरक्षण व ६ गुण), प्रियांका इंगळे (१.१० मि. संरक्षण व १४ गुण), संध्या सुरवसे (२.१० मि. संरक्षण व २ गुण) यांनी मोलाची कामगिरी नोंदवली.

महिला गटातच महाराष्ट्राने चंदीगडचा ४२-१२ असा १ डाव ३० गुणांनी पराभव केला. या सामन्यात श्वेता नवाले (१.५०, १.५० मि. संरक्षण), रेश्मा राठोड (२.२० मि. संरक्षण व २ गुण), प्रियांका इंगळे (१.५० मि. संरक्षण व ६ गुण) यांनी उत्कृष्ट खेळ सादर केला. चंदीगडकडून रितू (१ मि. संरक्षण व २ गुण) हिने चांगली कामगिरी केली.

**पुरुष गटात उत्तर प्रदेश व जम्मू-काश्मीरवर विजय**

पुरुष गटात महाराष्ट्राने उत्तर प्रदेशवर २५-१५ असा ५ मिनिटे राखून १० गुणांनी विजय मिळवला. महाराष्ट्राकडून सुयश गरगटे (२.१० मि. संरक्षण व ४ गुण), निहार दुबळे (४ गुण), प्रतीक वायकर (२.०० मि. संरक्षण), ऋषीकेश मुर्चावडे (२.१० मि. संरक्षण) यांनी चमकदार कामगिरी केली. दुसऱ्या सामन्यात महाराष्ट्राने जम्मू-काश्मीरचा ४८-१४ असा १ डाव ३४ गुणांनी धुव्वा उडवला. विजय शिंदे (२.५० मि., १.२० मि.), सुयश गरगटे (३.०० मि.), शुभम थोरात (१.१० मि. संरक्षण व ६ गुण), रुद्र थोपटे व प्रतीक वायकर (प्रत्येकी ६ गुण) यांनी सामना आपल्या नावावर केला. ◂(वृत्तसंस्था)

CMYK
सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## महत्वाचे...



### महाराष्ट्र राज्य दिव्यांग क्रीडा स्पर्धेत निखिल मेड राज्यात प्रथम

**बार्शी, दि. १२ जानेवारी**

रामटेक नागपूर येथे झालेल्या राज्य दिव्यांग क्रीडा स्पर्धेत बार्शी शाळेचे खेळाडूंनी उल्लेखनीय कामगिरी केली. यशस्वी खेळाडूंना कविता कोळगे, नितीन सुरवसे, तसेच सोलापूर जिल्हा अध्यक्ष स्पेशल ऑलिंपिक भारत प्रशांत मधुकर पवार व एक्सपर्ट कोच म्हणून दयानंद पवार यांचे मार्गदर्शन लाभले. त्यांचे संस्थेचे अध्यक्ष अरुणदादा बारबोले, शाळेचे मुख्याध्यापक व सर्व कर्मचारी यांनी प्रशिक्षक तसेच मशस्वी विद्यार्थ्यांचे कौतुक केले व शुभेच्छा दिल्या. कामगिरी केलेले खेळाडू : निखिल मेड (५० मीटर धावणे प्रथम व उभा राहून लांब उडीत द्वितीय, जिव्हाळा मतिमंद मुलाची शाळा बार्शी), प्रांजल इचके (५० मीटर धावणे द्वितीय व उभे राहून लांब उडी द्वितीय, मतिमंद मुलाची शाळा खांडवी), सृष्टी जावळे (गोळा फेक तृतीय व १०० मीटर धावणे तृतीय, मतिमंद मुलाची शाळा खांडवी).

### दुधनी जि.प. कन्नड मुलींच्या शाळा व्यवस्थापन समितीच्या अध्यक्षपदी पोतदार

**अक्कलकोट, दि. १३ जानेवारी-**

तालुक्यातील दुधनी येथील जि.प. प्राथमिक कन्नड मुलींच्या शाळा व्यवस्थापन समितीच्या अध्यक्षपदी जयश्री विलास पोतदार यांची करण्यात आली. यावेळी खेळी मेळीच्या वातावरणात शाळा व्यवस्थापन समितीचे पुनर्गठन कार्यक्रम संपन्न झाला. मुख्याध्यापक महादेव बासरगाव यांचे अध्यक्षतेखाली जि.प. प्राथमिक कन्नड मुलींची शाळा दुधनी शाळेत यावेळी नूतन अध्यक्ष म्हणून जयश्री विलास पोतदार तर उपाध्यक्ष म्हणून लक्ष्मीपुत्र शांतलिंग बोळकोटगी यांचे सर्वानुमते निवड करण्यात आली. अश्विनी रोडगे, रूपा जाधव, शिवराज मंदोलीकर, संजय चंडके, गीता हौदे या सर्वांचे नवनियुक्त सभासद म्हणून निवड करण्यात आली. आनंद शांतय्या बाहेरमठ यांचे शिक्षण तज्ञ म्हणून निवड करण्यात आले. यावेळी सर्व माता पालक व शाळेतील शिक्षक संतोष जोगदे, सिद्धरामेश्वर गोरे, परमेश्वर वागोली, गणपती पवार, मंदाकिनी सोनकांबळे उपस्थित होते. यावेळी मुख्याध्यापक महादेव बासरगाव यांनी आपले मनोगत व्यक्त केले. गणपती पवार यांनी केली तर प्रस्तावना व आभार संतोष जोगदे यांनी मानले.





### आर्या कृषी महाविद्यालयात राजमाता जिजाऊ, स्वामी विवेकानंद जयंती साजरी

**माढा, दि. १३ जानेवारी-**

आर्या कृषी महाविद्यालय मानेगाव येथे राजमाता जिजाऊसाहेब व स्वामी विवेकानंद जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. नितीन उबाळे होते प्रमुख पाहुण्या म्हणून डॉ. कविता देशमुख, सहाय्यक प्राध्यापक, विस्तार शिक्षण विभाग, श्रीराम कृषी महाविद्यालय, पानीव उपस्थित होत्या. प्रमुख पाहुण्या डॉ. देशमुख यांनी यावेळी भाषण केले. अध्यक्षीय भाषण प्राचार्य डॉ. नितीन उबाळे यांनी केले. कार्यक्रमाचे समन्वयक प्रा. धनंजय कुलकर्णी व प्रा. खंडेराव वाघे होते. प्रा. संदीप मुरुमकर, प्रा. तुषार नामदे, डॉ. संदीप मखमले, प्रा. स्नेहल साठे, प्रा. ज्ञानेश्वरी झोळ, डॉ. तृप्ती राठोड, प्रा. अक्षय शेळके, प्रा. हनुमंत निगुडे तसेच कुमार शिंदे व रोहित घळके यांच्या सहकार्याने कार्यक्रम यशस्वीरीत्या पार पडला.

## निधन वृत्त...

### ॲड. पृथ्वीराज चव्हाण



**सांगोला,दि.१३ जानेवारी -**

सांगोला शहरातील माजी नगराध्यक्ष ॲड. पृथ्वीराज भीमराव चव्हाण (वय-९३) यांचे वृद्धपकाळाने मंगळवार दि.१३ जानेवारी रोजी दुपारी निधन झाले. सांगोला नगरपरिषदेचे ते पहिले लोकनियुक्त नगराध्यक्ष झाले होते. त्यांच्या पश्चात पत्नी, एक मुलगा, चार मुली, भाऊ, बहीण, पुतणे, नातू असा मोठा परिवार आहे.

### बाबूराव लेंगरे



**पिलीव, दि. १३ जानेवारी-**

माळशिरस तालुक्यातील कुसमोड येथील बाबुराव ज्ञानु लेंगरे यांचे निधन झाले. मृत्यूसमयी ते ७८ वर्षांचे होते. त्यांच्या पश्चात पत्नी, दोन मुले, दोन मुली, सुना, नातवंडे असा परिवार आहे.

### चिंतामणी अन्नलदास



**सोलापूर, दि. १३ जानेवारी -**

पूर्वभागातील पद्मनगर येथील रहिवासी व कुचन हायस्कूलचे निवृत्त कार्यालयीन अधिक्षक चिंतामणी रामय्या अन्नलदास (वय-८६) यांचे मंगळवार दि.१३ जानेवारी रोजी निधन झाले. त्यांच्या पश्चात मुलगा, मुलगी व नातू असा परिवार आहे. बुधवार, दि.१४ जानेवारी रोजी सायंकाळी ४ वाजता त्यांच्या राहत्या घरापासून अंत्ययात्रा निघणार आहे.

# सोलापूर जिल्हा परिषदेच्या ६८ गटात रंगणार सामना



**आचारसंहिता लागू; जिल्ह्याचे राजकारण पुन्हा तापणार**

**५ फेब्रुवारीला मतदान अन् ७ फेब्रुवारीला निकाल**

**भाजपा, राष्ट्रवादी अन् शिंदे सेनेत होणार प्रतिष्ठेची लढाई**

**तभा वृत्तसेवा । अविनाश गायकवाड**
**सोलापूर, दि. १३ जानेवारी-**

राज्य निवडणूक आयोगाने जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकांच्या पहिल्या टप्प्याची घोषणा केली असून, पुणे जिल्ह्यासह १२ जिल्ह्यांतील जिल्हा परिषदा आणि १२५ पंचायत समित्यांसाठी आजपासून आचारसंहिता लागू करण्यात आली आहे. न्यायालयाच्या आदेशानंतर ५० टक्क्यांपेक्षा कमी आरक्षण असलेल्या जिल्ह्यांमध्ये या निवडणुका होत आहेत. त्यामुळे नगरपालिका निवडणुकीनंतर आता सोलापूर जिल्हा परिषदेचीही निवडणूक लागली असून, यामध्ये ६८ जागांसाठी (गटासाठी) चुरसीचे मतदान होणार असून, आता ग्रामीण भागाचे राजकारण चांगलेच तापणार असल्याची चर्चा आताच सुरू झाली आहे. दरम्यान, सोलापूर जिल्हा परिषदेचे अध्यक्षपद ओबीसीसाठी राखीव आहे. या निवडणुकीसाठी गेल्या २ महिन्यापासून काही राजकीय मल्ल लंगोट लावून बसले असून, त्यांच्या गटातील मतदारसंघात त्यांच्या २-२ राऊंडही झाल्या आहेत. दरम्यान, ही निवडणूक भाजपा, राष्ट्रवादी अन् शिंदे सेनेतच रंगणार असल्याचे दिसून येत आहे.

जिल्ह्यात १२ नगरपालिकांची नुकतीच निवडणूक पार पडली आहे. महापालिकेतील १०२ जागांचे मतदान येत्या १५ तारखेला आहे. त्यातच अवघ्या राज्याचं लक्ष लागलेल्या जिल्हा परिषदा आणि पंचायत समितीच्या निवडणुकांची घोषणा करण्यात आली. त्यानुसार, राज्यातील १२ जिल्ह्यात निवडणुकांचा धुरळा उडणार असून, १२ जिल्हा परिषद आणि १२५ पंचायत समितींसाठी मतदान प्रक्रियेचा कार्यक्रम जाहीर करण्यात आला. त्यानुसार, राज्यात ५ फेब्रुवारी रोजी मतदान होणार असून, रोजी ७ फेब्रुवारीला सकाळी १० वाजता निकाल जाहीर होणार आहे. आयोगाकडून निवडणुकांची घोषणा होताच निवडणूक क्षेत्रात आदर्श आचारसंहिता लागू करण्यात आली आहे.

**ग्रामीण महाराष्ट्रात निवडणुकांची रणधुमाळी**

स्थानिक स्वराज्य संस्थांमधील आरक्षण मर्यादा ५० टक्क्यांच्या वर गेलेल्या जिल्हा परिषदांची निवडणूक दुसऱ्या टप्प्यांमध्ये घेतली जाणार आहे. सर्वोच्च न्यायालयाने निवडणूक आयोगाला १५ दिवसांची मुदतवाढ दिल्याने आता १५ फेब्रुवारीपर्यंत जिल्हा परिषदा आणि पंचायत समितींच्या निवडणुकांचा कार्यक्रम पूर्ण करणे निवडणूक आयोगाला बंधनकारक असणार आहे. एकीकडे राज्यात ५ फेब्रुवारी रोजी महापालिका निवडणुकांसाठी मतदान होत असून, ७ फेब्रुवारीला सकाळी १० वाजता निकाल जाहीर होणार आहे. त्यामुळे, महानगरांमध्ये निवडणुका संपताच, ग्रामीण महाराष्ट्रात निवडणुकांची रणधुमाळी पाहायला मिळणार आहे.

**२०१७ साली भाजपाची जोरदार इंट्री**

पूर्वी सोलापूर जिल्हा परिषदेत एकही जागा नसलेल्या भाजपने सोलापूर जिल्हा परिषदेत २०१७ च्या निवडणुकीत जोरदार मुसंडी मारीत आपल्या मित्र पक्षांसह १९ जागा मिळविल्या होत्या. शिवसेनेनेही आपल्या मित्रांसह दहा जागांचा टप्पा गाठला होता. दरम्यान, यंदाच्या निवडणुकीत भारतीय जनता पार्टीत जिल्ह्यातील विविध पक्षाच्या अनेक बड्या नेत्यांचे प्रवेश झाल्याचा फायदा भाजपाला होण्याची शक्यता आहे. सध्या भाजपा बेरजेचे राजकारण करीत असला तरी नव्या सवंगड्यांची साथ त्यांना किती मिळणार? यावरच भाजपाचे भवितव्य अवलंबून आहे. तसेतर भाजपाला नगरपालिका निवडणुकीतही अपेक्षित यश मिळाले नव्हते; आता जिल्हा परिषदेत किती यश मिळेल? हे येणारा काळच सांगणार आहे.

**गतवेळी माळशिरस, माढा तालुक्यात राष्ट्रवादीला भरघोस यश**

२०१७ साली राष्ट्रवादीचा बालेकिल्ला असलेल्या माळशिरस आणि माढा तालुक्यात पक्षाने भरघोस यश मिळविले होते. मोहिते-पाटील यांनी ११ पैकी ८ तर आमदार बबनदादा शिंदे यांनी सर्व सात जागांवर आपलीताकद दाखवून दिली होती. माळशिरस तालुक्यातील मोहिते-पाटील आणि माढ्याचे आमदार बबनदादा शिंदे यांच्या घराणेशाहीबाबत आरोप होऊनही मोहिते पाटील यांच्या घरातील सर्व चार आणि शिंदे यांच्या घरातील देखील सर्व चारही उमेदवारांना जनतेने भरघोस मताने विजयी केले होते. माळशिरस पंचायत समितीवर मोहिते पाटील यांनी राष्ट्रवादीची सत्ता आणली तर माढा पंचायत समितीमधील सर्व १४ जागा राष्ट्रवादी जिंकून एकहाती सत्ता मिळविली होती. जिल्ह्यातील ज्या-त्या तालुक्यात स्थानिक नेत्यांचे वर्चस्व असल्याने भाजपासाठी आगामी जिल्हा परिषद निवडणूक कठीणच राहणार आहे.

### जिल्ह्यात राष्ट्रवादी, भाजप अन् शिंदे सेनेच्याच तगड्या लढती

राष्ट्रवादीच्या स्थापनेपासून एकट्याच्या जीवावर सोलापूर जिल्हा परिषदेत सत्ता आणणाऱ्या राष्ट्रवादी काँग्रेसला आता भाजपाचीच मोठी भीती राहणार आहे. पूर्वी दोन्ही राष्ट्रवादी एकत्र असल्याने आणि केंद्रात अन् राज्यात काँग्रेस-राष्ट्रवादीची सत्ता असल्याने जिल्हा परिषदेत गेल्या अनेक वर्षांपासून राष्ट्रवादीचे वर्चस्व होते. यंदा मात्र भाजपाने नगरपालिका, महापालिकेच्या धर्तीवर फिल्डिंग लावली तर मात्र राष्ट्रवादीचे किती सदस्य येतील? हे सध्यातरी सांगणे कठीण आहे. यासाठी भाजप विरोधी सर्व पक्ष एकत्र येवून झेडपी निवडणूक लढण्याची शक्यताही नाकारता येत नाही. गेल्या निवडणुकीत सत्ता राखताना सत्ताधारी राष्ट्रवादी काँग्रेसची दमछाक झाली. मागील निवडणुकीत राष्ट्रवादी- २५, भाजप+आघाड्या-१९, शिवसेना +आघाड्या-१०, शेकाप-३, भीमा परिवार-३, काँग्रेस-७ आणि अपक्ष १ असे बलाबल होते. यामुळे इतर पक्षाच्या टेकूने राष्ट्रवादीने सत्ता मिळविली होती. यंदाही भाजप, राष्ट्रवादी अन् शिंदेंच्या शिवसेनेच्या उमेदवारांतच तगडी फाईट दिसून येणार आहे. तसेतर युती, आघाडीनंतरच खरे चित्र स्पष्ट होणार आहे.

### ३ वर्षात झेडपीत काही अधिकाऱ्यांची मनमानी

कोरोना काळापासून जिल्हा परिषदेच्या निवडणुका थांबल्या होत्या. या ३ वर्षाच्या काळात जिल्हा परिषदेच्या कामकाजाची सुत्रे काही अधिकाऱ्यांच्या (प्रशासक) हातात गेली. यामुळे अशा अधिकाऱ्यांनी जिल्हा परिषदेत आजवर बऱ्याच गोष्टीत मनमानी कारभार केल्याची चर्चा जिल्हा परिषदेच्या माजी पदाधिकाऱ्यांत सध्या रंगत आहे. कारण या अधिकाऱ्यांना गेल्या ३ वर्षात जिल्हा परिषदेतील कारभाराविषयी कोणीही विचारणारा पुढारी नव्हता. यामुळे आता जिल्हा परिषदेचे अध्यक्ष, सदस्य, विविध समित्यांचे सभापती पदावर बसल्यावर अशा अधिकाऱ्यांवर नक्कीच अंकुश राहणार असल्याचीही चर्चा जोरात सुरू झाली आहे.

### गड राखण्यासाठी स्थानिक नेत्यांची तयारी

२०१७ मध्ये शेकाप आणि राष्ट्रवादीचे जिल्हाध्यक्ष दीपक साळुंखे यांनी ७ पैकी ५ जागा जिंकत शिवसेनेला रोखले होते. सांगोला पंचायत समितीमध्ये राष्ट्रवादी काँग्रेस आणि शेकाप यांनी १४ पैकी १२ जागा जिंकत आपली सत्ता अबाधित ठेवली होती. करमाळ्यात शिवसेनेचे आमदार नारायण पाटील यांनी आपल्या झंझावातात राष्ट्रवादीचे पानिपत करून ५ पैकी ४ जागी जिंकल्या होत्या. करमाळा पंचायत समितीवर देखील आमदार नारायण पाटील यांच्या नेतृत्वाखाली १० पैकी ८ जागा जिंकत भगवा फडकला आहे. पंढरपूरमध्ये झेडपीच्या ८ पैकी ७ जागा जिंकत कार्यकर्त्यांनी पुन्हा परिचारकांवर आपला विश्वास व्यक्त केला होता. पंचायत समितीवर देखील भाजपाची सत्ता आली होती; यावेळी १६ पैकी १२ जागांवर भाजपाला भरघोस यश मिळाले होते. बार्शी तालुक्यातील सेनेच्या राजा राऊत यांनी बार्शीतून भाजपच्या तीन जागा जिंकत पंचायत समितीवर भाजपची सत्ता आणली होती. अक्कलकोटमध्ये लढतीत काँग्रेसने सहापैकी तीन जागा पटकाविल्या. मंगळवेढ्यात शिवसेना पुरस्कृत समाधान आवताडे गटाला चार पैकी तीन जागी विजयी केले होते. पंचायत समितीवर आवताडे यांच्या आघाडीला आठपैकी पाच जागी विजय मिळाला होता. आता काहीजणांचे पक्ष बदलले आहेत. एकूणच, स्थानिक नेत्यांच्या जीवावरच जिल्हा परिषदेचे राजकीय समीकरण बदलत आल्याचे आजवर दिसून आले आहे. शहर थंडावले आता ग्रामीणचे राजकीय वातावरण तापणार आहे

# झेडपीच्या सीईओंकडून मंद्रूपच्या ग्रामसेवकाची खरडपट्टी

**करसंकलनात पिछाडी; सीईओ आक्रमक**

**दक्षिण सोलापूर, दि.१३ जानेवारी-**

सोमवारी १२ जानेवारी रोजी जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी कुलदीप जंगम यांनी अचानक मंद्रूप ग्राम पंचायतीला भेट देऊन ग्रामपंचायतच्या कामकाजाची पाहणी केली. यावेळी सीईओंनी विचारलेल्या प्रश्नांना ग्रामसेवकांकडून अपेक्षित उत्तर न मिळाल्यामुळे सीईओ जंगम यांनी ग्रामसेवकांना फैलावर घेतले. तसेच ग्रामपंचायत कामकाजावर नाराजी व्यक्त करीत ग्रामपंचायतचा सन्मानही न स्वीकारता कार्यालयाबाहेर निघून गेल्याची चर्चा सुरू आहे. त्यामुळे सीईओ जंगम मंद्रूपचे प्रभारी ग्रामसेवक नागेश जोडमोटे यांच्या कामकाजावर नाराजी व्यक्त करीत १५ दिवसात कामकाजात सुधारणा करण्याच्या सूचना देऊन पुन्हा तपासणीसाठी येणार असल्याचे सांगितल्याने ग्रामसेवक जोडमोटे यांचे धाबे दणाणल्याचे दिसून येते.

मुख्यमंत्री समृध्दी पंचायत राज अभियानांतर्गत सीईओ जंगम मंद्रूप व भंडारकवठे ग्रामपंचायतीला भेट देऊन अभियानातील घटकांनुसार कामकाजाची पाहणी केली. यावेळी मंद्रूप ग्रामपंचायतकडून घरकुल, करवसूलीसह इतर घटकामध्ये अपेक्षित काम न झाल्याने सिईओ आक्रमक होऊन पदाधिकार्यांच्या उपस्थितीत ग्रामसेवकांना धारेवर धरले. यावेळी सिईओंनी विचारलेल्या प्रश्नांना ग्रामसेवकांनी ढोबळमनाने उत्तरे दिल्याने सीईओ आक्रमक होऊन निश्चित आकडेवारी विचारले. यावेळी ग्रामसेवकांनी मौन धारण केल्यामुळे सीईओ कामकाजात सुधारणा करण्यासाठी पंधरा दिवसांची मुदत दिल्याचे सांगण्यात येत आहे.

### सीईओंनी ग्रामसेवकांना झापले

सोमवारी सिईओ कुलदीप जंगम यांनी मंद्रूप ग्रामपंचायतीला भेट दिल्यानंतर घरकुल उद्दीष्ट व करवसूली याबाबत विचारलेल्या प्रश्नांना ग्रामसेवकांकडून अपेक्षित उत्तर न मिळाल्याने सीईओंनी ग्रामसेवकांना झापले. तसेच कामात सुधारणा करून घरकुल उद्दीष्ट व करवसूली वाढविण्यासाठी प्रयत्न करण्याचे आदेश दिले. ग्रामपंचायत कामावर नाराज झाल्याने सिईओंनी सन्मानही स्वीकारला नाही.

**- यासीन मकानदार, ग्रामपंचायत सदस्य, मंद्रूप**

### सीईओंची अचानक भेट

सीईओ कुलदीप जंगम यांनी यापूर्वी दोनवेळा मंद्रूप ग्रामपंचायतीला भेट देणार असल्याचे सांगितल्यानंतर मुख्य रस्त्यावरील स्वच्छता करून दप्तर पूर्ण करून ठेवण्यात आले. मात्र त्यावेळी सीईओंनी भेट न देता सोमवारी अचानक भेट दिल्याने ग्रामसेवक व पदाधिकाऱ्यांची धावपळ सुरू झाली. त्यामुळे सीईओंच्या प्रश्नांना उत्तरे देताना ग्रामसेवकांकडून तु तु मैं मैं झाल्याचे सांगण्यात येते.

### कामात सुधारणा करण्याच्या सूचना

मुख्यमंत्री समृध्द पंचायत राज अभियानांतर्गत असणार्या कामांची पाहणी करण्यासाठी सिईओ मंद्रूपला भेट दिले. यावेळी करवसूली व घरकुल बांधकाम अपूर्ण असल्याने त्याबाबत प्रयत्न करून उद्दीष्ट वाढविण्याच्या सूचना केल्या. १५ दिवसांत सुधारणा केल्यावर पुन्हा सीईओ मंद्रूपला भेट देणार आहेत.

**- नागेश जोडमोटे, प्रभारी ग्रामसेवक, मंद्रूप**



# बी टू मधील कामगारांच्या जागा शासनाकडून विनामूल्य नावावर करुन देणार

**महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांची ग्वाही**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १३ जानेवारी-**

महानगरपालिकेवर भारतीय जनता पार्टीची सत्ता आल्यानंतर बी टू मधील कामगारांच्या जागा शासनाकडून विनामूल्य कामगारांच्या नावावर करून देणार असल्याचे महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी ग्वाही दिल्याची माहिती आमदार देवेंद्र कोठे यांनी आज (दि. १३) दिली.

प्रभाग क्रमांक १५ मधील भारतीय जनता पार्टीचे उमेदवार अंबादास करगुळे, विजया खरात, विनोद भोसले, श्रीदेवी फुलारे यांच्या प्रचारार्थ आयोजित पदयात्रा आणि कॉर्नर सभेप्रसंगी आमदार देवेंद्र कोठे बोलत होते. याप्रसंगी व्यासपीठावर उमेदवार अंबादास करगुळे, विजया खरात, विनोद भोसले, श्रीदेवी फुलारे उपस्थित होते. पुढे आमदार देवेंद्र कोठे म्हणाले, प्रभाग क्रमांक १५ येथील उमेदवारांच्या प्रचारार्थ जुनी मिल आयोजित केलेल्या सभतून आमदार देवेंद्र कोठे यांनी थेट राज्याचे महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांना फोन करून प्रभागात असलेल्या जुनी मिल चाळ, लक्ष्मी चाळ, पाटील चाळ, लक्ष्मी विष्णू चाळ, वारद चाळ, एनजी मिल चाळ,जुनी पोलीस लाईन, धरमशी लाईन यासह मुरारजी पेठ येथील अन्य कामगारांच्या चाळी व मिळकतींवरती चुकीच्या प्रकारे बी टू (सत्ता प्रकार ब) लागल्यामुळे कामगारांच्या चाळींचा पुनर्विकास रखडल्याची बाब निदर्शनास आणून दिली. यावेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या निर्देशानुसार आचारसंहितेनंतर बैठक लावून हा विषय एकही रुपये शासकीय कर न घेता पूर्णपणे निकाली काढून देण्याचा शब्द महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी सभेमध्ये दिला.

# फिरते गर्भलिंग निदानप्रकरण; आणखी तिघांना अटक

**पाच दिवसांची पोलिस कोठडी, प्रकरणाची पाळेमुळे बीडपर्यंत**

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. १३ जानेवारी-**




गर्भलिंग निदान व गर्भपात प्रकरणाची चक्रे बीड जिल्ह्यापर्यंत पोहोचली आहेत. बार्शी पोलिसांनी याप्रकरणी परिचारिका कल्पना मुंडे (वय ४०, रा. कॅन्सर हॉस्पिटलजवळ कथले प्लॉट, बार्शी), छगन मोहोळकर (वय ३०, रा. उंदरगाव, ता. करमाळा), प्रवीण मासाळ (वय ३३, रा. मानेगाव) यांना सोमवारी अटक केली. पोलीस कोठडीतील आरोपींकडून मिळालेल्या माहितीच्या आधारे तपास करुन तिघे गळाला लागले. प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी यांच्या न्यायालयात हजर केले असता तिघांना शुक्रवारपर्यंत (दि.१६) पाच दिवसांची पोलीस कोठडी देण्यात आली आहे. बार्शी तालुक्यात फिरते गर्भलिंग निदान व बेकायदेशीर गर्भपातप्रकरणी पोलिसांनी जिल्ह्यातील बार्शी, माढा, माळशिरस, करमाळा तालुक्यातील तसेच बीड जिल्ह्यातील केज येथून परिचारिकेसह एकूण ६ जणांना अटक केली आहे. गर्भधारणा पूर्व व प्रसवपूर्व निदानोपयोगी तंत्र (गर्भलिंग निवडीस प्रतिबंध) अधिनियम १९९४ अंतर्गत गुन्हा बार्शी पोलिसांत दाखल केला आहे. याप्रकरणी बार्शी ग्रामीण रुग्णालयाचे वैद्यकीय अधिकारी डॉ. श्रीकांत शिंदे यांनी फिर्याद दाखल केली आहे.

### गर्भलिंग चाचणीसाठी मस्तूदकडे पेशंट

आरोपी महिला मस्तूद यांच्याबरोबर गर्भलिंग निदान करण्यासाठी एजंट म्हणून पेशंट पुरवण्याचे काम मुंडे करत होत्या. छगन मोहोळकर हा मस्तूद बरोबर गर्भलिंग निदानसाठी एजंट म्हणून काम करत होता. मानेगाव येथील रहिवासी मासाळ हा वैराग व मानेगाव येथील मासाळ हॉस्पिटल येथे गर्भपात करत होता. गर्भलिंग चाचणीसाठी मस्तूदकडे पेशंट पाठवत होता, अशी माहिती पोलिसांच्या तपासात पुढे आली. फिरत्या वाहनाद्वारे गर्भलिंग निदान करणारा तोतया डॉ. अजित सुरेश मस्तूद (वय ३६, रा. रोपळे, ता. माढा) यास गर्भपाताच्या गोळ्या पुरवणारा नरेंद्र भगत (वय ४० रा. आनंदनगर अकलूज, ता. माळशिरस), अकबर मुलाणी (वय ४५, रा. शिक्षक कॉलनी, केज, जि. बीड) या तिघांना यापूर्वीच अटक केली आहे.

### वैरागच्या रुग्णालयात गर्भपात

अजित मस्तूद याच्या फिरत्या गर्भलिंग निदान केंद्रामध्ये महिलांची सोनोग्राफी करुन गर्भनिदान करत. सर्व गर्भपात हे तालुक्यातील वैरागच्या मॅक्स केअर हॉस्पिटल येथे केल्याची कबुली डॉ. प्रवीण मासाळने दिल्याचे उपविभागीय पोलीस अधिकारी अशोक सायकर यांनी सांगितले.

### आठ दिवसात पोलिसांचा तपास गतिमान

गेल्या मंगळवारी दुपारी ४.४० वाजण्याच्या सुमारास जामगाव हद्दीतील वाणेवाडीकडे जाणाऱ्या रस्त्यालगत समाधान शंकर बाबर यांच्या पडीक शेतातील कच्च्या रस्त्यावर अजित मस्तूद हा बेकायदेशीरपणे गर्भलिंग निदान व गर्भपात करत असल्याची माहिती मिळाल्यानंतर पोलिसांनी छापा टाकला होता.

# मालट्रक-चारचाकीच्या धडकेत एक जखमी

**सोलापूर, दि. १३ जानेवारी-**

एमआयडीसी पोलीस ठाण्याच्या हद्दीत मालट्रकच्या निष्काळजी वाहनचाकामुळे अपघात होऊन एक जण जखमी झाल्याची घटना घडली आहे. याप्रकरणी एमआयडीसी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. दि. ११ जानेवारी रोजी सायंकाळी ६.४५ वाजण्याच्या सुमारास जुना हैद्राबाद नाका, सोलापूर येथील एसएसटी पॉईंट येथे हा अपघात झाला. फिर्यादी सौरभ सुखदेव भिंगे (रा. दामाणी नगर) सोलापूर हे चारचाकी वाहन क्रमांक एमएच १३ ईके ४१०९ थांबवून उभे असताना, मागून येणाऱ्या मालट्रक क्रमांक केए ५६ ३५९४ चालक रविचंद्रन मल्लप्पा रा. हुलगुट्टी, ता. बसवकल्याण, जि. बिदर, कर्नाटक याने वाहन हयगयीने व निष्काळजीपणाने चालवत जोराची धडक दिली. या धडकेत चारचाकीमध्ये बसलेले फिर्यादीचे मोठे भाऊ शिवराज यांना उजव्या डोळ्याच्या भुवईजवळ जखम झाली. तसेच धडकेमुळे चारचाकी वाहन पुढे थांबलेल्या वाहनावर आदळून त्याच्या पुढील व मागील बाजूचे नुकसान झाले आहे. या प्रकरणी एमआयडीसी पोलीस ठाण्यात मालट्रक चालकाविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास पोलीस हवालदार नवले करीत आहेत.

# खडकावर बीजारोपण करणारे सहकार महर्षी शंकरराव मोहिते-पाटील



महाराष्ट्राला खऱ्या अर्थाने सहकाराची ओळख करून देणारे व महाराष्ट्राच्या जडणघडणीत मोलाचा वाटा असणारे सहकार महर्षी शंकरराव मोहिते–पाटील यांच्या जयंतीनिमित्त विनम्र अभिवादन..... माळशिरस तालुका तसा बघितला तर ओसाड व माळरान आणि ग्रामीण भाग. तेथील लोकांच्या समस्या लोखंडी सागरासारख्या होत्या. गोरगरीब समाजासाठी काहीतरी करायचे, नांगरलेल्या शेतातून सोनं उगवावं, हिरव्या गालिच्याने सगळीकडे आच्छादित व्हावं. रात्रीच्या तारांगणात सगळीकडे उजेड पसरावा, ध्येयनिष्ठेने वेडे झालेले सहकार महर्षी प्रचंड महत्वकांक्षा बाळगून काम करीत होते खडतर परिश्रम आणि आत्मविश्वासाच्या जोरावर अनेक अडचणींवर मात केली आणि एक आदर्श निर्माण केला. माळशिरस तालुक्याचे नंदनवन केले. सहकार महर्षींच्या कार्यातून सर्वसामान्य जनतेला प्रेरणा मिळते कठीण परिस्थितीतही हार न मानता साहेब पुढे गेले. खडतर परिश्रम आणि आत्म विश्वासाच्या जोरावर अशक्य ते शक्य करून दाखवले आणि नवीन दृष्टीकोन स.म.शंकरराव मोहिते पाटील यांनी दिला

सहकाराचे जाळे निर्माण करून गोरगरीब जनतेवर प्रचंड दयाळूपणा दाखवून सर्वांना मदत करायचीच, तंत्रज्ञानामुळे शेतकऱ्यांपर्यंत पोहोचायचेच हीच खरी प्रगती होईल हा मनाशी केलेला ठामनिश्चय ! धोरणे आणि मार्ग जरी वेगळे असले तरी जनतेचे हित जोपासत काम करायचे, जनतेची भूक दूर करीत हरितक्रांतीचा पाया रचला. गरीबांचा उत्कर्ष करायचा असेल, त्यांनी गरीबी दूर करायची असेल तर हाताला काम मिळाले पाहिजे. म्हणून सहकाराच्या माध्यमातून साखर कारखाने, कुक्कुटपालन, सुतगीरण, शेतकऱ्यांच्या मालासाठी खरेदी विक्री संघ, सहकारी बॅंक अशा अनेक गोष्टी चालू केल्या. त्यामुळे आजची पिढी माळशिरस तालुक्यातील चांगले जीवन जगत आहे. शेतकऱ्यांनी आपल्या शेतीबरोबर पूरक व्यवसाय करावा दुष्काळी छायेतला प्रदेश पावसाची श्वाश्वती नसलेला परिसर पाण्याखाली भिजवणार, हजारो वर्षांचे दारिद्र्य संपवणार कर्तृत्वाचा डोंगर उभा करायचा हाच गुण या मातीनं शिकवला, प्रश्नाचे उत्तर मिळो अथवा न मिळो उत्तराची दिशा शोधायचीच, ग्रामीण भागातील तरूणांना घडवायचच, तरूण पिढी जर आपण घडवू शकलो नाही तर सर्व काही व्यर्थ आहे. त्यांच्या चेहऱ्यांवरील दारिद्र्याच्या, कंगालपणाच्या रेषा पुसून आत्म निर्भर बनवायचं, शिकलेली व्यक्ती आजन्म फुलत राहीली पाहीजे. ती कधीच उपाशी किंवा अधाशी नसली पाहिजे. त्याच्या अंगी नवनिर्मितीचे सामर्थ्य असले पाहिजे. शिक्षणामुळे आत्मबोध घडावा. उपजीविकेबाबतीत व्यक्तीची स्वाधीनता वाढावी म्हणून शिक्षण प्रसारक मंडळ व सहकाराच्या माध्यमातून अनेक व्यवसाय सुरू केले. महाराष्ट्राला खऱ्या अर्थाने सहकाराची ओळख करून देऊन महाराष्ट्राच्या जडणघडणीत मोलाचा वाटा उचलला. सिंचन सुविधांचा विकास करून शेतकऱ्यांना वर्षभर पाणी मिळवून देण्याची व्यवस्था केली. दुष्काळी भागात रोजगाराच्या संधी निर्माण केल्या आणि स्थानिक लोकांना स्वावलंबी बनवले. आर्थिक विकास झाला आणि लोकांच्या जीवनमानात सुधारणा झाली. साहेबांच्या कार्यामुळे सामाजिक बदल घडून आला आणि लोकांमध्ये एकता आणि सहकार्याची भावना निर्माण झाली. पर्यावरण संवर्धनाच्या कार्यातही महत्त्वपूर्ण योगदान दिले आणि दुष्काळी भाग, खडकाळ भाग हिरवळ केला. सामान्य माणसाच्या हिताची काळजी वाहणारी तरूण पिढी जर आपण घडवू शकलो नाही तर सर्व काही व्यर्थ आहे. तसेच अद्ययावत ज्ञान मिळविण्या शिवाय पिढी पुढे जाणार कशी सामाजिक वैचारिक परिवर्तन घडवायचे असेल तर शिक्षण हाच पर्याय आहे. म्हणून शिक्षण प्रसारक मंडळ अकलूजची स्थापना केली. आज हजारो विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. कामाचा डोंगर उभा करायचा हे करीत असताना श्रेयासाठी मागे वळून पाहायला सुद्धा सवड उरली नाही गावोगावी माळामाळावर नवे जग उभे केले. गोरगरीबांना आधार दिला. आपल्या जिवनात जगण्यासाठी नुसत सुखच पाहील नाही. तर दुष्काळी भागाला सिंचन योजना सुरू करुन खडतर परिस्थितीत ही खडकावर बीजारोपण केले आणि माळशिरस तालुका हिरवागार केला. कोणाबद्दलही किल्मिष न बाळगता आयुष्यभर झुंजले. आणि आपल्या यशाचे नवे सोनेरी पान लिहिले. त्यांच्या जीवनातील आदर्श, त्यांचे कार्य आणि त्यांनी समाजासाठी केलेले योगदान कायमस्वरूपी लोकांच्या स्मरणात राहील. महाराष्ट्राला खऱ्या अर्थाने सहकाराची ओळख करून देणारे व महाराष्ट्राच्या जडणघडणीत मोलाचा वाटा असणारे सहकार महर्षी शंकरराव मोहिते–पाटील यांचा जन्म माळशिरस तालुक्यात झाला याचा सार्थ अभिमान आम्हाला आहे.

**- प्रा. काटकर तात्यासाहेब शिवाजी,**
अकलूज, मो.नं. : ९२२६१४४८३६




काकासाहेब,
विकास, गती आणि चालना आपणामुळेच मिळाली...
वसा, वारसा आणि प्रेरणा आपणामुळेच मिळाली...
शेतकऱ्यांच्या उद्धाराचा आपण दिला मंत्र ...
आपल्यामुळेच साध्य झाले इथल्या विकासाचे तंत्र

सहकार महर्षि शंकरराव नारायणराव मोहिते-पाटील
यांच्या १०८ व्या जयंतीनिमित्त
त्यांच्या पवित्र स्मृतिस
विनम्र अभिवादन!

शंकरराव मोहिते-पाटील सर्व सेवा संघ,शंकरनगर
शंकरनगर (अकलूज), ता. माळशिरस, जि. सोलापूर
अध्यक्ष, उपाध्यक्ष व सर्व सदस्य








थेंबा थेंबात अमृत...
शिवामृत

रविराज शंकरराव इनामदार-देशमुख
कार्यकारी संचालक

दत्तात्रय रामचंद्र भिलारे
व्हा.चेअरमन

खा.धैर्यशील राजसिंह मोहिते-पाटील
चेअरमन

सर्व संचालक मंडळ, सभासद, अधिकारी व कर्मचारी वर्ग

शिवामृत दूध उत्पादक सहकारी संघ मर्या,
विजयनगर-अकलूज ता.माळशिरस जि.सोलापूर
Phone : 02185 - 222126/222566 ● Email: shivamrutakluj@gmail.com
सोलापूर, सातारा, पुणे, मुंबई, नवी मुंबई, नांदेड, लातूर येथे सुपर स्टॉकिस्ट नेमणे आहेत. इच्छुकांनी त्वरीत संपर्क साधावा.

स्वामीराज ॲडस् 95037 73073





सोलापूर जिल्ह्याचे भाग्यविधाते
सहकार महर्षि कै.शंकरराव नारायणराव मोहिते-पाटील
यांच्या जयंतीनिमित्त विनम्र अभिवादन!

Shivratna Shikshan Sanstha

ADMISSION OPEN

SHANKARRAO MOHITE - PATIL ENGLISH SCHOOL & JR. COLLEGE, AKLUJ
(Std.1-12 classes - CBSE & Maharashtra state board syllabus)
Ph. 9172196213
Email - smpesakluj@gmail.com

SHIVRATNA C.B.S.E. SCHOOL, AKLUJ
1-10 classes (Affiliated to CBSE )
Ph. 9172196213
Email - shivratnaschool79@gmail.com

FREE WINGS PRE-PRIMARY SCHOOL, AKLUJ
Ph. 9172196213
Email - smpesakluj@gmail.com

SHIVRATNA MILLENNIUM SCHOOL, AKLUJ
Ph. 8793411005

SHIVRATNA SEMI ENGLISH SCHOOL, AKLUJ
(Pre-Primary & Std. 1 to 6, S.S.C. Board)
Ph. (02185) - 227552 / 222552
Email - smpsemienglishakluj@gmail.com

SHIVRATNA PATTERN, AKLUJ
NEET / JEE / MH- CET Coaching Center
Mob.8956993001 / 7517827801
Email - shivratnapatternakluj@gmail.com

VIJAYSINH MOHITE - PATIL COLLEGE OF NURSING & MEDICAL RESEARCH INSTITUTE, AKLUJ
(M.Sc. Nursing, Basic B.Sc. Nursing, R.G.N.M. & R.A.N.M., - Affiliated to I.N.C. New Delhi, M.N.C. Mumbai & M.U.H.S., Nashik)
Ph. (02185) - 226752 * Email - akluj_nursing@rediffmail.com

SHIVRATNA INSTITUTE OF MANAGEMENT STUDIES, AKLUJ
(B.B.A. - Affiliated to Solapur University, M.B.A., M.Com. - YCMOU, Nashik Study Center , Naac Grade : B++ )
Ph. (02185) - 222509 * Email - rmpakluj@gmail.com

SHIVRATNA GIRL'S HOSTEL, SHANKARNAGAR-AKLUJ
Ph. 9604695339 * Email - shivratnagirlhostel@gmail.com

TARARANI WOMEN'S WRESTLING ACADEMY, AKLUJ
SHIVRATNA BOY'S WRESTLING ACADEMY, AKLUJ
Mob.7387311005 * Email - twwa.akluj@gmail.com

SHIVRATNA BOYS HOSTEL, AKLUJ
Ph. (02185) 224952
Email - shivratnashikshansanstha@gmail.com

SHIVRATNA SPORTS ACADEMY, SHANKARNAGAR-AKLUJ * Ph. 80875 41009

Trustee, Teaching, Non-Teaching Staff & Students

SHIVRATNA SHIKSHAN SANSTHA
SHIVRATNA KNOWLEDGE CITY, SHIVAMRUT ROAD, SHANKARNAGAR-AKLUJ TAL.MALSHIRAS DIST.SOLAPUR (MS)
Phone : (02185) 224952 / 227552 ■ Email - shivratnashikshansanstha@gmail.com ■ Web : www.sssakluj.org
■ ADMISSIONS ARE OPEN FOR THE ACADEMIC YEAR 2025-2026
■ KINDLY CONTACT TO THE RESPECTIVE BRANCHES IMMEDIATELY & CONFIRM YOUR ADMISSION

स्वामीराज ॲडस् 95037 73073

धाराशिव
# दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.


## तुळजापूर नगर परिषदेच्या गटनेतेपदी औदुंबर कदम यांची निवड

**तभा वृत्तसेवा**
**तुळजापूर, दि.१३ जानेवारी -**

तुळजापूर नगर परिषदेच्या गटनेतेपदी औदुंबर कदम यांची निवड करण्यात आली आहे. याबाबतचे अधिकृत पत्र जिल्हाधिकारी यांना सादर करण्यात आले असून, त्यामध्ये संबंधित माहिती नमूद करण्यात आली आहे.

पत्रात नमूद केल्यानुसार, तुळजापूर नगर परिषदेची सार्वत्रिक निवडणूक माननीय राज्य निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार २०२५ मध्ये घेण्यात आली होती. या निवडणुकीचा निकाल दि. २१ डिसेंबर २०२५ रोजी जाहीर झाला. या निवडणुकीत तुळजापूर नगरपरिषदेमध्ये भारतीय जनता पार्टीच्या चिन्हावर व अधिकृत तिकिटावर जनतेतून निवडून आलेले लोकनियुक्त नगराध्यक्ष व १८ नगरसेवक मिळून एकूण सदस्य संख्या १९ इतकी आहे. महाराष्ट्र स्थानिक प्राधिकरण सदस्य अनर्हता नियम, १९८७ मधील कलम ३ अन्वये गटनेत्यांनी सादर करावयाची आवश्यक माहिती जिल्हाधिकाऱ्यांना पत्रासोबत देण्यात आली आहे.



सदर माहिती जिल्हाधिकारी कार्यालयात महाराष्ट्र स्थानिक प्राधिकरण सदस्य अनर्हता नियम ांनुसार ठेवण्यात येणाऱ्या नोंदवहीत नोंद करून ती राजपत्रात प्रसिद्ध करण्याची मागणी औदुंबर कदम यांनी या पत्राद्वारे केली आहे.



## संक्षिप्त वृत्त...



### बावची विद्यालयात संविधान अमृत महोत्सव उत्साहात

**परंडा, दि.१३ जानेवारी -**

शासनाच्या आदेशानुसार मंगळवार, दि.१३ जानेवारी रोजी बावची विद्यालय, परंडा तसेच वसंतराव शंकरराव काळे कनिष्ठ महाविद्यालय, परंडा येथे संविधान अमृत महोत्सव उत्साहात साजरा करण्यात आला. या निमित्ताने विद्यार्थ्यांमध्ये भारतीय संविधानाविषयी जनजागृती करण्यासाठी देशभक्तीपर गीतांवर आधारित नृत्य सादरीकरण करण्यात आले. या सादरीकरणाच्या माध्यमातून भारतीय संविधानाचे महत्त्व तसेच नागरिकांचे मूलभूत हक्क व कर्तव्ये याबाबत प्रभावी संदेश देण्यात आला. स्वातंत्र्य, समता आणि बंधुता या संविधानिक मूल्यांचे महत्त्व विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचविण्यात आले. कार्यक्रमास विद्यालयाचे मुख्याध्यापक नारायण खैरे यांच्यासह शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते. हा उपक्रम यशस्वी होण्यासाठी वैशाली सोनवणे व प्रियंका सोनकांबळे यांनी विशेष परिश्रम घेतले.




### नूतन विद्यामंदिर येथे राजमाता जिजाऊ व स्वामी विवेकानंद जयंती साजरी

**धाराशिव, दि.१३ जानेवारी -**

नूतन प्राथमिक विद्यामंदिर, धाराशिव येथे राजमाता जिजाऊ माँसाहेब व स्वामी विवेकानंद यांची जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. कार्यक्रमाच्या सुरुवातीस राजमाता जिजाऊ माँसाहेब व स्वामी विवेकानंद यांच्या प्रतिमांचे पूजन करण्यात आले. तसेच विद्यार्थिनींनी राजमाता जिजाऊ माँसाहेब व स्वामी विवेकानंद यांची वेशभूषा साकारून कार्यक्रमात रंगत आणली. कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी संतोष माळी, चेतन माशाळकर, पौळ, चित्रा सोनटक्के, दिपाली सुरवसे, सारिका उमरकर व दिपाली राऊत यांनी विशेष परिश्रम घेतले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन यमुना जाधवर यांनी केले तर आभार प्रदर्शन तृप्ती तिकोने यांनी केले.



### 'पोदार'मध्ये राजमाता जिजाऊ व स्वामी विवेकानंद जयंती उत्साहात

**धाराशिव, दि.१३ जानेवारी -**

पोदार इंटरनॅशनल स्कूल, धाराशिव येथे शाळेचे प्राचार्य डॉ. वाल्मिक सोमासे यांच्या मार्गदर्शनाखाली राजमाता जिजाऊ माँसाहेब व युवकांचे प्रेरणास्थान स्वामी विवेकानंद यांची जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. कार्यक्रमाची सुरुवात राजमाता जिजाऊ माँसाहेब व स्वामी विवेकानंद यांच्या प्रतिमांचे पूजन करून करण्यात आली. कार्यक्रमास प्राचार्य डॉ. वाल्मिक सोमासे, उपप्राचार्य निलेश जाधव, व्यवस्थापकीय जीवन कुलकर्णी, प्रदीप शिंदे, प्रभाकर चौधरी तसेच कार्यक्रमाधिकारी दीपक अंकुश उपस्थित होते.

### तुळजापूरात राजमाता जिजाऊ व स्वामी विवेकानंद जयंती साजरी

**तुळजापूर, दि.१३ जानेवारी -**

राजमाता जिजाऊ जयंती व स्वामी विवेकानंद जयंतीनिमित्त येथील जिजामाता नगरीत दि.१२ जानेवारी सोमवारी सुसंस्कृत व प्रेरणादायी वातावरणात संयुक्त जयंती सोहळा संपन्न झाला. या कार्यक्रमास नगरसेविका प्रियांका विजय गंगणे, माऊली भोसले, लखन पेंदे, किशोर गंगणे, अजित परमेश्वर तसेच मधुकर शेळके यांची प्रमुख उपस्थिती होती.

# लागा तयारीला : धाराशिव जि.प. व पं.स. निवडणुकीचा बिगुल वाजला

**५५ गट व ११० गणांसाठी ११ लाखांहून अधिक मतदार करणार मतदान...**
**जिल्ह्यातील सर्वच राजकीय पक्ष व नेत्यांची प्रतिष्ठा पणाला!...**

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.१३ जानेवारी -**

मिनी मंत्रालय म्हणून ओळखली जाणारी जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकांचा कार्यक्रम जाहीर होताच जिल्ह्यात राजकीय घडामोडींना वेग आला आहे. ग्रामीण भागातील सत्तासमीकरणे ठरविणाऱ्या या निवडणुका अत्यंत महत्त्वाच्या मानल्या जात असून, जिल्ह्यातील सर्वच प्रमुख राजकीय पक्ष व नेत्यांची प्रतिष्ठा या निवडणुकीत पणाला लागणार आहे.




या निवडणुकीत धाराशिव जिल्हा परिषदेच्या ५५ गटांसाठी तसेच जिल्ह्यातील धाराशिव,तुळजापूर, भूम, परंडा, वाशी, कळंब, लोहारा, उमरगा या आठ पंचायत समितींच्या ११० गणांसाठी मतदान होणार आहे. एकूण ११ लाख ४५ हजार ८८८ मतदार या निवडणुकीत आपला मतदानाचा हक्क बजावणार असून, त्यामुळे ही निवडणूक जिल्ह्याच्या राजकीय भविष्याचा आरसा ठरणार आहे. निवडणूक आयोगाने जाहीर केलेल्या कार्यक्रमानुसार १६ ते २१ जानेवारीदरम्यान उमेदवारी अर्ज भरणे, २२ जानेवारी रोजी अर्जांची छाननी, २७ जानेवारी रोजी दुपारी ३ वाजेपर्यंत उमेदवारी माघार, तर दुपारी ३.३० वाजता चिन्ह वाटप करण्यात येणार आहे. ५ फेब्रुवारी रोजी मतदान होऊन ७ फेब्रुवारीला निकाल जाहीर केला जाणार आहे.

निवडणूक कार्यक्रम जाहीर होताच आदर्श आचारसंहिता लागू झाली असून प्रशासनाकडून निवडणूक प्रक्रिया पारदर्शक व शांततेत पार पडावी यासाठी तयारी सुरू आहे. पोलीस बंदोबस्त, मतदान केंद्रांची सज्जता, तसेच संवेदनशील गावांवर विशेष लक्ष दिले जात आहे.

दरम्यान, सर्वच राजकीय पक्षांकडून उमेदवार निवड, आघाड्या, मित्रपक्ष, तसेच बंडखोरी रोखण्याचे प्रयत्न सुरू झाले आहेत. अनेक मतदारसंघांत थेट लढती होण्याची शक्यता असून काही ठिकाणी अपक्ष उमेदवारही निकालावर प्रभाव टाकू शकतात. स्थानिक प्रश्न, विकासकामे, पाणीटंचाई, रस्ते, आरोग्य व शिक्षण हे प्रचाराचे प्रमुख मुद्दे ठरणार आहेत.

जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणूक ही केवळ स्थानिक स्वराज्य संस्थांची निवडणूक न राहता, आगामी राजकीय समीकरणे ठरविणारी प्रतिष्ठेची लढत ठरणार असल्याचे चित्र आहे.

### उमेदवार स्थानिक असावा; अशी जोरदार मागणी...

धाराशिव जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर अनेक मतदार संघांमध्ये उमेदवार हा त्या-त्या मतदारसंघातीलच स्थानिक रहिवासी असावा, अशी जोरदार मागणी पुढे येत आहे. बाहेरून लादलेले उमेदवार नकोत, तर गावाच्या प्रश्नांची जाण असणारा, जनतेत वावरणारा आणि सतत उपलब्ध असणारा प्रतिनिधी द्यावा, अशी अपेक्षा मतदार व्यक्त करीत आहेत. स्थानिक प्रश्न, विकासकामे, पाणीपुरवठा, रस्ते, आरोग्य व शिक्षण याबाबत थेट अनुभव असलेला उमेदवारच प्रभावीपणे काम करू शकतो, अशी भूमिका ग्रामस्थांकडून मांडली जात आहे. त्यामुळे उमेदवार निवडताना राजकीय पक्षांनी स्थानिक नेतृत्वालाच संधी द्यावी, अन्यथा नाराजीचा फटका बसू शकतो, असा इशाराही मतदारांकडून दिला जात आहे.

## बलसुर शिवारातून मोटरसायकल चोरी

**धाराशिव, दि.१३ जानेवारी -**

उमरगा पोलीस ठाण्याच्या हद्दीत मोटरसायकल चोरीची घटना घडली आहे. याप्रकरणी फिर्यादी ज्ञानेश्वर निलंगे (वय ३५, रा. बलसुर, ता. उमरगा,) यांची अंदाजे ३० हजार रुपये किंमतीची हिरो स्प्लेंडर कंपनीची काळ्या रंगाची मोटरसायकल (क्र. एमएच २५ एएन २६७७) अज्ञात व्यक्तीने चोरून नेल्याची घटना समोर आली आहे. सदर मोटरसायकल दि.६ जानेवारी रोजी दुपारी १ ते सायंकाळी ६ वाजेदरम्यान बलसुर ते सास्तुर रोडलगत बलसुर शिवारातील पुलाजवळ उभी असताना चोरीस गेली. याप्रकरणी फिर्यादी ज्ञानेश्वर निलंगे यांनी दिलेल्या तक्रारीवरून गुन्हा नोंदवण्यात आला आहे.

## मकर संक्रांतीच्या पार्श्वभूमीवर बाजारपेठेत महिलांची गर्दी

**तभा वृत्तसेवा**
**उमरगा, दि.१३ जानेवारी -**

तिळगूळ घ्या, गोड गोड बोला असा स्नेह आणि आपुलकीचा संदेश देणारा मकर संक्रांतीचा सण बुधवार (दि.१४) रोजी मोठ्या उत्साहात साजरा होणार आहे. या पार्श्वभूमीवर उमरगा शहरातील बाजारपेठेत गेल्या दोन ते तीन दिवसांपासून महिलांची मोठ्या प्रमाणात गर्दी पाहायला मिळत आहे. सणाची तयारी अंतिम टप्प्यात आली असून, वाण खरेदीला विशेष महत्त्व दिले जात असल्याने बाजारपेठ सध्या गजबजलेली दिसून येत आहे.



संक्रांतीनिमित्त महिलांकडून वाणासाठी लागणाऱ्या वस्तूंसह बांगड्या, चुडा, कुंभाराकडील गाडगे, सुगड, साड्या तसेच हळदी-कुंकवाच्या कार्यक्रमासाठी लागणाऱ्या साहित्याची मोठ्या प्रमाणात खरेदी सुरू आहे.

संक्रांतीच्या पूजेसाठी गाजर, बोरे, उसाची पेरे, शेंगा, कापूस, हरभरे, पाच फळे, तीळगूळ तसेच पूजेचे साहित्य आणि फुलांची खरेदी महिलांकडून ऐनवेळी केली जात आहे. मकर संक्रांतीच्या पार्श्वभूमीवर शहरातील बाजारपेठेत महिलांची लगबग अनुभवायला मिळत असून, संक्रांतीचा उत्सव बाजारातूनच साजरा होत असल्याचे चित्र दिसून येत आहे.

**किमतींमध्ये वाढ, तरीही खरेदीला उत्साह...**

व्यापाऱ्यांच्या माहितीनुसार, यंदा वाणाच्या वस्तूंच्या किमतींमध्ये मागील वर्षाच्या तुलनेत सुमारे १० ते २० टक्क्यांनी वाढ झाली आहे. मात्र, सणाची परंपरा जपत महिलांकडून आपल्या बजेटनुसार उत्साहात खरेदी केली जात असल्याचे चित्र आहे.

**रांगोळी व खाद्यपदार्थांची रेलचेल...**

बाजारात तिळाची वडी, तिळाचे लाडू, साखर, गुळाच्या वड्या, तिळाचा हलवा यांची मोठ्या प्रमाणात विक्री सुरू आहे. हलव्याच्या दागिन्यांसह विविध रंगांची रांगोळीही बाजारात दाखल झाली असून, संक्रांतीसाठी आवश्यक सर्व साहित्य एकाच ठिकाणी उपलब्ध झाल्याने खरेदीदारांची गर्दी वाढली आहे.

# भूम-परंडा पॅटर्नची ग्रामीण राजकारणात थेट एण्ट्री!

**अखेर जिल्हा परिषद निवडणुकांचे बिगुल वाजले; शिंदे गट घेराबंदीच्या विळख्यात...**
**५ फेब्रुवारीला मतदान, ७ फेब्रुवारीला निकाल - तिकीट वाटपावरून राजकीय रणकंदन...**

**तभा वृत्तसेवा / सुधीर घोलप**
**वाशी, दि.१३ जानेवारी -**

'मिनी मंत्रालय' म्हणून ओळखल्या जाणाऱ्या जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकांचे अखेर बिगुल वाजले असून धाराशिव जिल्ह्यातील राजकारण चांगलेच तापले आहे. निवडणूक कार्यक्रम जाहीर झाल्याने आता राजकीय हालचालींना वेग आला आहे. (दि.५) फेब्रुवारी रोजी मतदान, तर ७ फेब्रुवारी रोजी निकाल जाहीर होणार असल्याने सर्वच पक्ष थेट मैदानात उतरले आहेत.

निवडणूक कार्यक्रम जाहीर होण्याआधीच सुरू झालेली मोर्चेबांधणी आता उघड रणधुमाळीत बदलली आहे. गट-गणांमध्ये कुठे टॉप घेर तर कुठे डबल टॉप घेर टाकत राजकीय ताकद आजमावली जात आहे.

तिकीट मिळेल की नाही, या भीतीने संभाव्य उमेदवारांची धाकधूक वाढली असून, पक्षांतर्गत नाराजी उफाळून येत आहे. भूम, परंडा आणि वाशी मतदारसंघांमध्ये यंदाची जिल्हा परिषद निवडणूक केवळ सत्तेसाठी नव्हे, तर राजकीय अस्तित्व टिकवण्याची निर्णायक लढाई ठरणार असल्याचे स्पष्ट होत आहे. काही दिवसांपूर्वी झालेल्या भूम व परंडा नगरपरिषद निवडणुकांनी याचे स्पष्ट संकेत दिले आहेत.

या नगरपरिषद निवडणुकांमध्ये सर्वपक्षीय आघाडीने थेट शिंदे गटाविरोधात रणशिंग फुंकले होते. निकालात सर्वपक्षीय आघाडीला सर्वाधिक नगरसेवक निवडून आले. मात्र राजकीय खेळी, अंकगणित आणि अंतर्गत फोडाफोडीच्या राजकारणात शिंदे गटाचे नगराध्यक्ष अल्प मतांनी विजयी झाले, तर सर्वपक्षीय आघाडीचा नगराध्यक्ष उमेदवार थोडक्यात पराभूत झाला. हा निकाल केवळ नगरपरिषद निवडणुकीपुरता मर्यादित न राहता, ग्रामीण राजकारणाला दिशा देणारा धक्का मानला जात आहे.

याच पार्श्वभूमीवर भूम-परंडा नगरपरिषदेचा 'घेराबंदी पॅटर्न' आता थेट जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकांमध्ये राबवण्याची जोरदार तयारी सुरू असल्याची चर्चा आहे. हा पॅटर्न प्रत्यक्षात उतरल्यास शिंदे गटासाठी जिल्हा परिषद निवडणूक अधिक अडचणीची ठरण्याची शक्यता असून, कोणत्या पक्षाला फायदा होईल आणि कोणाचे राजकीय गणित कोसळेल, याकडे संपूर्ण जिल्ह्याचे लक्ष लागले आहे.

ऐनवेळी होणाऱ्या युती, तिकीट वाटपातील नाराजी, अंतर्गत बंडखोरी आणि गुप्त राजकीय खेळी यामुळे जिल्ह्यातील राजकीय वातावरण चांगलेच ढवळून निघाले आहे. सध्या मतदारसंघांमध्ये सुरू असलेल्या चर्चांनुसार शिंदे गटाला चहूबाजूंनी घेरण्याची रणनीती आखली जात असल्याचे स्पष्ट चित्र दिसत असून, ५ फेब्रुवारीचे मतदान आणि ७ फेब्रुवारीचा निकाल हा केवळ सत्तेचा नाही, तर अनेक नेत्यांच्या राजकीय भवितव्याचा फैसला ठरणार असल्याची जोरदार चर्चा आहे.




## धाराशिव शहरात घरफोडी; चांदीचे दागिने लंपास

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.१३ जानेवारी -**

धाराशिव शहर पोलीस ठाण्याच्या हद्दीत घरफोडीची घटना घडली आहे. याप्रकरणी फिर्यादी जयंत बाळकृष्ण महाजन (वय ६७ वर्षे, रा. महाजन गल्ली, धाराशिव ता. जि. धाराशिव, ह.मु. थेरगाव फाटा, पुणे) यांच्या राहत्या घराचे कुलूप अज्ञात व्यक्तीने तोडून घरात प्रवेश करून चोरी केल्याची घटना उघडकीस आली आहे. दि.१० जानेवारी २०२६ रोजी ही घटना घडली. अज्ञात चोरट्याने घरातील कपाट फोडून त्यामधील अंदाजे ११ हजार रुपये किंमतीचे चांदीचे दागिने चोरून नेले.

याप्रकरणी फिर्यादी जयंत महाजन यांनी दि.१२ जानेवारी रोजी दिलेल्या प्रथम खबरेवरून धाराशिव शहर पोलीस ठाण्यात गुन्हा नोंदवण्यात आला असून, पुढील तपास पोलीस करीत आहेत.

## जेवळी गटातून सुषमा तोळनुरे जिल्हा परिषद निवडणुकीच्या रिंगणात

**तभा वृत्तसेवा**
**लोहारा, दि.१३ जानेवारी -**

सध्या सर्वत्र जिल्हा परिषद निवडणुकांची चाहूल लागली असून, त्या पार्श्वभूमीवर लोहारा तालुक्यातील दक्षिण जेवळी येथून सुषमा प्रकाश तोळनुरे या जेवळी गटातून जिल्हा परिषद निवडणूक लढविण्याच्या तयारीत असल्याची माहिती समोर आली आहे. त्या भाजपचे माजी तालुका सरचिटणीस प्रकाश तोळनुरे यांच्या सौभाग्यवती आहेत.

सुषमा तोळनुरे या सामाजिक, शैक्षणिक व महिला सक्षमीकरणाच्या क्षेत्रात सक्रिय असलेल्या कर्तृत्ववान व्यक्तिमत्त्व म्हणून ओळखल्या जातात. त्या शिवपार्वती महिला बहुउद्देशीय संस्थेच्या अध्यक्ष असून यापूर्वी माजी ग्रामपंचायत सदस्य म्हणून त्यांनी लोकहिताची अनेक कामे प्रभावीपणे राबविली आहेत. तसेच त्या माजी मंत्री बसवराज पाटील यांच्या समर्थक म्हणूनही परिचित आहेत.



सध्या त्या बसवेश्वर हायस्कूल, जेवळी येथे शिक्षिका म्हणून कार्यरत असून, सर्वसामान्य व गरजू विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीसाठी सातत्याने योगदान देत आहेत.

शिक्षणासोबतच समाजातील गोरगरीब व वंचित घटक तसेच महिलांच्या प्रश्नांबाबत त्या कायम सक्रिय राहून कार्य करीत असतात. महिलांचे प्रश्न, हक्क आणि त्यांचा आवाज लोकप्रतिनिधींपर्यंत प्रभावीपणे पोहोचवण्याची भूमिका त्यांनी सातत्याने घेतली आहे.

सर्वसामान्य जनतेचा सर्वांगीण विकास, महिलांचे प्रतिनिधित्व अधिक सक्षम करणे आणि लोकहिताची कामे प्रभावीपणे मार्गी लावण्याच्या उद्देशाने सुषमा प्रकाश तोळनुरे या जेवळी गटातून जिल्हा परिषदेसाठी इच्छुक उमेदवार म्हणून पुढे आल्या आहेत.

त्यांच्या सामाजिक, शैक्षणिक व संघटनात्मक कार्याची दखल घेऊन, महिलांचे सक्षम नेतृत्व म्हणून भारतीय जनता पक्षाने जेवळी गटातून सुषमा प्रकाश तोळनुरे यांना जिल्हा परिषद निवडणुकीसाठी अधिकृत उमेदवारी द्यावी, अशी जोरदार मागणी महिलावर्गासह कार्यकर्त्यांकडून करण्यात येत आहे.


### जाहीर नोटीस

तमाम लोकांना कळवण्यात येते की तुकडी जिल्हा धाराशिव (उस्मानाबाद) पोट तुकडी तालुका कळंब, गाव मौजे **वडगाव येथील गट नंबर ९५ यांसी एकूण क्षेत्र ०६ हेक्टर ७४ आर पैकी क्षेत्र ०० हेक्टर २० आर,** (येथून पुढे सदर मिळकत असे संबोधलेले आहे.) सदर मिळकत ही **श्री. चंद्रसेन भीमराव नवले आणि सौ. केशर चंद्रसेन नवले** यांचे मालकीची असून, त्यांनी ती **श्री. देवेंद्र मोघा कोकणे यांना दिनांक १६/१०/२०२३** रोजीच्या भाडेपट्ट्याने वीस वर्षे या कालावधीकरिता भाड्याने दिलेली आहे.

सदर मिळकतीवर बांधण्यात येणाऱ्या आमचे अशील कंपनीच्या म्हणजेच इंडियन ऑइल कॉर्पोरेशन लिमिटेडच्या पेट्रोल पंपासंदर्भात ही नोटीस देण्यात येत आहे. सदर मिळकत ही संपूर्णपणे निर्दोष, निःजोखमी व बोजारहित असल्याची, तसेच सदर मिळकतीबाबत कोणत्याही कोर्टात वादाचा विषय नसून त्यावर जप्ती अथवा मनाईचा हुकूम नाही अशी खात्री व भरवसा आमचे अशिलांना म्हणजेच इंडियन ऑइल कॉर्पोरेशन लिमिटेड यांना दिला आहे, तरी सदर मिळकतीवर कोणाचाही गहाण, दान, लीज, लोन, बक्षीस, ताबा, पोटगी, दावा, कुळ, खंड, साठेखत, खरेदीखत इत्यादी कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध अधिकार असल्यास, त्यांनी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून सात दिवसांच्या आत, आमच्याकडे समक्ष येऊन, मूळ कागदपत्रांनिशी त्याबाबत आमची खात्री पटवून द्यावी.

येणेप्रमाणे मुदतीत कागदपत्रांनिशी आक्षेप न आल्यास सदर मिळकतीवर अन्य कोणाचाही, कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध अधिकार नाही व असल्यास त्यांनी जाणीवपूर्वक सोडून दिला आहे असे समजण्यात येईल व व्यवहार पूर्ण करण्यात येईल. त्यानंतर कोणाचीही कसलीही तक्रार चालणार नाही.

सबब जाहीर नोटीस दिली असे.

**सोलापूर, दिनांक १२/०१/२०२६**

तर्फे
**ॲड. आनंद रामचंद्र देशपांडे,**
बी.ए., एल.एल.बी., एम.ए. (इतिहास)
पत्ता : ९१/अ, मुरारजी पेठ, सोलापूर. ४१३००१
मोबाईल : ९८२३२९१६३४
(शिक्का)

### SJSB सोलापूर जनता सहकारी बँक लि.

मल्टी-स्टेट शेड्युल्ड को ऑप. बँक

गगनभरारी, शिवस्मारक संकुल, गोल्डफिंच पेठ, सोलापूर ४१३००७
फोन क्र.: ०२१७-२७४ ११०१ ते ०५
ई-मेल: info@sjsbbank.com. वेबसाईट: www.sjsbbank.com

**जाहीर ताबा नोटीस**
नियम ८(१)
(दि सेक्युरिटायझेशन & रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शियल ॲसेटस & इन्फोर्समेंट ऑफ सेक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट २००२ अन्वये)

तमाम लोकांस, कर्जदार, गहाणकार व जामीनदार यांना सदर जाहीर ताबा नोटीसीने कळविण्यात येते की, ज्या अर्थी **सोलापूर जनता सहकारी बँक लि.** मुख्य कार्यालय, सोलापूर या संस्थेचे अधिकारी यांना उक्त अध्यादेशाच्या कलम १३(१२) अन्वये प्राप्त झालेल्या प्राधिकृत अधिकारी या अधिकारानुसार मी उपरोक्त कायद्याचे कलम १३(२) अन्वये **दि.२१/०८/२०२५** रोजी **कर्जदार- सौ.ललिता राजाराम पोतदार व श्री.राजाराम किसनराव पोतदार पत्ता-** १३१८/१, **तुळजापूर-मार्डी रोड ता.लोहारा. जि.धाराशीव**-४१३६०८ जामीनदार- **१) श्री.दगडू सोपानराव जाधव २) श्री.सुधाकर नागोराव पांचाळ** यांना मागणी नोटीस पाठवून **रक्कम रु.११,८४,६४६=४८ (अक्षरी रुपये अकरा लाख चौऱ्याऐंशी हजार सहाशे शेहेचाळीस रुपये आणि अठ्ठेचाळीस पैसे मात्र) येणेबाकी दि.३१/०७/२०२५ अखेर आणि दि.०१/०८/२०२५ पासूनचे** देय असलेले पुढील व्याज व इतर खर्च अशी संपूर्ण रक्कम नोटीस मिळाल्या पासून ६० (साठ) दिवसाच्या आत भरणा करण्याचे कळविले होते. परंतु नोटीस मिळूनही सदर उपरोक्त कर्जदार / गहाणकार व जामीनदार यांनी उपरोक्त रक्कम आमच्याकडे भरण्यास कसूर केलेली आहे. त्या अर्थी सदर कर्जदार, गहाणकार व जामीनदार यांना कळविण्यात येते की, खालील सही करणार यांनी खालील परिशिष्ठात नमूद केलेल्या स्थावर मिळकतीचा **दिनांक-१२/०१/२०२६** रोजी दि सेक्युरिटायझेशन & रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शियल ॲसेटस & इन्फोर्समेंट ऑफ सेक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट २००२ चे कलम १३(४) नियम ९ अन्वये प्रतिकात्मक **ताबा घेतलेला आहे.**

सबब उपरोक्त कर्जदार / गहाणकार / जामीनदार आणि तमाम लोकांना कळविण्यात येते की, खालील परिशिष्ठात नमूद केलेल्या मिळकती बाबत कोणीही कोणाशीही कोणत्याही प्रकारे हस्तांतर, विल्हेवाट, गहाण, विक्री, बोजा, तारण वाटणी, वहिवाट, बक्षिस अथवा अन्य कोणत्याही प्रकारे हस्तांतर करार करू नये. या उपरही तसा व्यवहार अथवा करार केल्यास तो बेकायदेशीर आहे, असे ठरवून आमच्या बँकेवर अथवा सदर मिळकतीवर सदर व्यवहार अथवा करार कायद्याने बंधनकारक राहणार नाही. याची नोंद उपरोक्त कर्जदार / गहाणकार / जामीनदार व तमाम लोकांनी घ्यावी.

**✲ परिशिष्ट ✲**

**तारण स्थावर मालमत्ता वर्णन**

कर्जदार सौ.ललिता राजाराम पोतदार यांचे मालकीचे जिल्हा धाराशीव (सर्व्हे नं.१७६/४/१,) पैकी मौजे व ता.लोहारा येथील ग्रामपंचायत घर क्र.१३१८/१ प्लॉट नं.८, क्षेत्रफळ - प्र.वा.क्र.-१- लांबी दक्षिण-उत्तर ५० फुट व रुंदी पूर्व-पश्चिम १६ फुट, प्र.वा.क्र.-२- लांबी दक्षिण-उत्तर ३० फुट व रुंदी पूर्व-पश्चिम १३ फुट एकूण क्षेत्रफळ १२३० चौ.फुट ही स्थावर व त्यावरील सध्या असलेल्या व भविष्यात होणाऱ्या बांधकामासह, यांसी चतुःसीमा पुढीलप्रमाणे- पूर्वेस - हणमंताचार्य जेवळीकर व शिवाजी कदम यांची मिळकत पश्चिमेस - रोड, दक्षिणेस - प्लॉट क्र.९ गणपत जगताप यांची मिळकत , उत्तरेस - मार्डी-तुळजापूर रोड

दिनांक : १४/०१/२०२६
ठिकाण : ता.लोहारा
(शिक्का)

सही/-
प्राधिकृत अधिकारी
सोलापूर जनता सहकारी बँक लि.
(मल्टी स्टेट शेड्युल्ड को.ऑप.बँक)




# जिल्हास्तरीय वक्तृत्व स्पर्धेत किलबिलची शुभ्रा मोरे प्रथम

**त.भा. वृत्तसेवा,**

**अहमदपूर, १३ जानेवारी :** राष्ट्रमाता राजमाता जिजाऊ व स्वामी विवेकानंद यांच्या जयंतीच्या निमित्ताने उदगीर येथील टाइम्स पब्लिक स्कूल येथे दरवर्षीप्रमाणे याही वर्षी जिल्हास्तरीय वक्तृत्व स्पर्धेचे आयोजन करण्यात आलेले होते. सदरील स्पर्धा प्राथमिक गट व माध्यमिक गट अशा दोन गटात विभागून घेतली होती. संपूर्ण जिल्हाभरातून एकूण ३६ स्पर्धकांनी या स्पर्धेत सहभाग नोंदविला होता. याच स्पर्धेत किलबिल नॅशनल स्कूल शाळेची विद्यार्थिनी शुभ्रा महेश मोरे प्राथमिक गटामध्ये तर श्रेया महेश देवणे हिने माध्यमिक गटात सहभाग नोंदविला होता.

शुभ्राने अतिशय परखड व अस्खलित भाषण देत प्राथमिक गटातून प्रथम क्रमांक पटकावला. त्यात रोख तीन हजार एक रुपये प्रमाणपत्र व सन्मान चिन्ह देऊन तिला सन्मानित करण्यात आले.

या स्पर्धेसाठी तिला तिची आई उज्वला मोरे (परचंडे) यांचे व शाळेतील विशाल लामतुरे यांचे अनमोल मार्गदर्शन लाभले. तिच्या या यशाबद्दल शाळेच्या वतीने संस्थेचे सचिव ज्ञानोबा भोसले, प्राचार्य संतोष पाटील, उपप्राचार्य धरमसिंग शिराळे यांच्या वतीने यथोचित सन्मान करून तिचे अभिनंदन करून पुढील स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या.

# सावित्रीबाई फुले जिव्हाळा पुरस्काराने चार राज्यस्तरीय बॅडमिंटनपटूंचा गौरव

**त.भा. वृत्तसेवा,**

**उदगीर, १३ जानेवारी :** येथील जिव्हाळा ग्रुपच्या वतीने सावित्रीबाई फुले जयंतीनिमित्त सावित्रीबाई फुले जिव्हाळा पुरस्कार सोहळा उत्साहात पार पडला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी राष्ट्रपती पुरस्कारप्राप्त आदर्श शिक्षक विश्वनाथ मुडपे हे होते. व्यासपीठावर हावगीस्वामी महाविद्यालयाच्या माजी प्राचार्या प्रा. डॉ. सुनीता लोहारे, सामाजिक कार्यकर्त्या सौ. अरुणा भिकाने, जिव्हाळा ग्रुपचे अध्यक्ष दशरथ शिंदे, सोपानराव माने व पांडूरंग बोडके उपस्थित होते.

कार्यक्रमाची सुरुवात सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेच्या पूजनाने व विठ्ठलराव फुलसे यांच्या सावित्रीबाईंवरील स्त्रीयांच्या शिक्षणाचा तु पाया घातला. या सुमधुर गीताने झाली.

राज्यस्तरीय शालेय बॅडमिंटन स्पर्धेत प्रथम क्रमांक पटकावून नेत्रदीपक यश संपादन करणाऱ्या संघातील कु. नुपूर रामदास मलवाडे, कु. राजनंदिनी मनोज लोया, कु. समीक्षा उमाकांत मटके व कु. प्रगती विनायक इंगळे या चारही खेळाडूंना मान्यवरांच्या हस्ते सावित्रीबाई फुले जिव्हाळा पुरस्कार देऊन गौरविण्यात आले. यावेळी वाढदिवसानिमित्त सोपानराव माने व पांडूरंग बोडके यांचा यथोचित सत्कार करण्यात आला.



प्रास्ताविकात दशरथ शिंदे यांनी महिलांनी अंधश्रद्धा व अनिष्ट रूढींच्या बेड्या तोडून पुढे जावे, असे विचार मांडले. सौ. अरुणा भिकाने यांनी सावित्रीबाई फुले यांनी तत्कालीन विरोधाला न जुमानता पहिली मुलींची शाळा सुरू करून महिला शिक्षणाचा पाया रचला, याचा गौरवपूर्ण उल्लेख केला.

प्रा. डॉ. सुनीता लोहारे म्हणाल्या की, स्त्री शिक्षणामुळे समाजात वैचारिक क्रांती झाली असून आज महिला विविध क्षेत्रांत पुरुषांच्या खांद्याला खांदा लावून देश, समाज व कुटुंबासाठी मोलाचे योगदान देत आहेत; याचे श्रेय सावित्रीबाईंनाच जाते.

अध्यक्षीय भाषणात विश्वनाथ मुडपे म्हणाले की, महिलांच्या प्रगतीसाठी संघर्ष करणाऱ्यांना पाठबळ देणे हीच सावित्रीबाई फुले यांना खरी श्रद्धांजली आहे. ग्रामीण भागातील मुलींनी सर्व अडचणींवर मात करून राज्यस्तरावर मिळवलेले यश निश्चितच प्रेरणादायी असल्याचे त्यांनी सांगितले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन लक्ष्मीकांत बिडवई यांनी केले, तर आभार प्रदर्शन सच्चिदानंद पुट्ठेवाड यांनी मानले.

कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी जिव्हाळा ग्रुपचे समन्वयक डॉ. अनिल भिकाने, उपाध्यक्ष अशोक बिरादार, सचिव अशोक दारनुळे, सहसचिव नवनाथ पाटील, विश्वनाथराव बिरादार, देविदासराव नादरगे, रमाकांत बनशेळकीकर, बाबुराव वाघमारे, चंद्रकांत पांचाळ, चंद्रकांत रोडगे आदींनी परिश्रम घेतले.

कार्यक्रमास दिलीप कंधारे, शरणप्पा खेळगे, मोहनराव खिंडीवाले, रामराव मोमले, वैजनाथराव पंचगल्ले, मारोती रोडगे, हरिश्चंद्र वट्टमवार, लहुदास याचावाड, अमृतराव देशपांडे यांच्यासह खेळाडूंचे पालक सौ जयश्री मलवाडे, ॲड. सीमा लोया, सौ. शिल्पा इंगळे, उमाकांत मटके उपस्थित होते.

# अहमदपूर न.प. उपाध्यक्षपदी शेख आयाज अहमद जहूर बिनविरोध

**त.भा. वृत्तसेवा,**

**अहमदपूर, १३ जानेवारी :** नुकत्याच झालेल्या नगर परिषद निवडणूक नंतर अहमदपूर नगर परिषदेची पहिली नवनियुक्त सर्वसाधारण सभा १२ जानेवारी ला संपन्न झाली. या पहिल्याच सभेमध्ये शेख आयाज अहमद जहुर यांची नगर परिषदेच्या उपाध्यक्षपदी बिनविरोध निवड करण्यात आली, तर तीन स्वीकृत सदस्यांच्या नियुक्तीची प्रक्रियाही पूर्ण झाली.



नगराध्यक्ष ॲड. स्वप्नील महारुद्र व्हत्ते यांच्या अध्यक्षतेखाली ही प्रथम सभा संपन्न झाली.महाराष्ट्र नगर परिषद नियम २००५ नुसार उपाध्यक्ष पदासाठी निवडणूक प्रक्रिया पार पडली.

**सौ.भालेराव, सय्यद युसुफ, लक्षण अलगुले हे स्वीकृत सदस्य**

या पदासाठी शेख आयाज अहमद जहुर यांचा एकमेव अर्ज मुदतीत प्राप्त झाला होता. अर्जाच्या छाननीनंतर तो वैध ठरवण्यात आला. इतर कोणताही अर्ज न आल्याने पीठासीन अधिकारी ॲड. स्वप्नील व्हत्ते यांनी शेख आयाज अहमद जहुर यांची उपाध्यक्ष म्हणून बिनविरोध निवड झाल्याचे घोषित केले. या बैठकीत सर्व नवनिर्वाचित नगरसेवक उपस्थीत होते.

उपनगराध्यक्ष निवडीनंतर नामनिर्देशित (स्वीकृत) सदस्यांची निवड करण्यात आली. जिल्हाधिकारी कार्यालयामार्फत प्राप्त झालेल्या अर्जांची उपजिल्हाधिकारी (सा.प्र.) यांनी छाननी केली या वेळी अलगुले लक्ष्मण नागनाथ , सय्यद युसुफ शफियोद्दिन आणि भालेराव सुप्रिया चंद्रशेखर . या उमेदवारांची नावे स्वीकृत सदस्य म्हणून जाहीर करण्यात आली या तीनही उमेदवारांचे अर्ज वैध ठरल्याने त्यांची नामनिर्देशित सदस्य म्हणून अधिकृत घोषित करण्यात आले. बऱ्याच वर्षानंतर नगराध्यक्ष, उपनगराध्यक्ष , नगरसेवका सह स्वीकृत सदस्यांनी आपला कोरम पूर्ण केल्याने अहमदपूर शहरात नागरिकांना आपले प्रश्न व विकास मार्गी लागतील या अपेक्षा. नवनियुक्त उपाध्यक्ष आणि स्वीकृत सदस्यांचे नगराध्यक्षांसह उपस्थित सदस्यांनी केले अभिनंदन

# निलंगा नवीन बसस्थानक दुरुस्तीचे काम सुरू



मनसेच्या आंदोलनाला यश

**त.भा. वृत्तसेवा,**

**निलंगा, १३ जानेवारी :** मोठा गाजावाजा करत सुरू केलेले सात आठ कोटींचे निलंगा बसस्थानक गुत्तेदाराच्या निकृष्ट कामामुळे केवळ दहा महिन्यातच बंद करण्याची नामुष्की परिवाहन महामंडळावर आली होती. त्यामुळे प्रवासी ज्यात विद्यार्थी, महिला,आबालवृद्ध यांना मोठ्या त्रासाला तोंड द्यावे लागत होते. याची नोंद घेत मनसे जिल्हाध्यक्ष डॉ नरसिंह भिकाने यांनी आपल्या कार्यकर्त्यांसह निलंगा बसस्थानकाचा स्पॉट पंचनामा करत तेथे झालेल्या निकृष्ट कामाला एक्सपोज केले. तात्काळ काम सुरू नाही केले तर बसस्थानकातच उपोषण सुरू करणार असा इशाराही शासन प्रशासनाला दिला.याची गंभीरपणे नोंद घेत मनसेच्या आंदोलनाच्या दुसऱ्याच दिवशी बसस्थानक दुरुस्तीचे काम सुरू करण्यात आले.

या वेळेस तरी लोकहिताच्या कामात यंत्रणेतील कोणीही शेण न खाता जनतेसाठी दूरदृष्टीने येत्या पन्नास वर्षे बसस्थानक कसे उत्कृष्ट स्थितीत राहील यासाठी उच्चप्रतीचे बांधकाम करावे व लोकप्रतिनिधी तसेच सर्व पक्षीय पुढारी, पत्रकार यांनीही हे काम चांगले करून घेण्यासाठी यावरती नजर ठेवत योगदान द्यावे अशी प्रतिक्रिया डॉ. भिकाने यांनी दिली आहे.

आतातरी ही दुरुस्ती करताना बसस्थानक प्लॅटफॉर्म मजबूत बांधून तो वर्षानुवर्षे उखडू नये असा बनवावा, हिरकणी कक्ष असावा, शंभर लोकांचे थिएटर असावे, विद्युत रोषणाई व फिल्टरड पाण्याची व्यवस्था असावी कारण या सर्व बाबींसाठीच शासनाने सात आठ कोटी गुत्तेदाराला दिले आहेत अशी सूचना मनसेने केली आहे.

या आंदोलनावेळी मनसे जिल्हाउपाध्यक्ष सूरज पटेल, जिल्हासचिव प्रदीप शेळके, तालुका उपाध्यक्ष बालाजी पवार, विकास सूर्यवंशी, तालुका सचिव गणेश उसनाळे,प्रदीप माने आदींसह अनेक कार्यकर्ते उपस्थित होते.

# जि.प.सर्कलसाठी विनायकराव पाटील यांची संवाद बैठक

**त.भा. वृत्तसेवा,**

**अहमदपूर, १३ जानेवारी :** अहमदपूर तालुक्यातील मौजे राळगा पाटी जवळ खंडाळी जिल्हा परिषद सर्कलची संवाद बैठक राष्ट्रवादी कॉंग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे जिल्हाध्यक्ष तथा माजी मंत्री विनायकराव पाटील यांच्या नेतृत्वात संपन्न झाली.

खंडाळी सर्कल व उजना पंचक्रोशीतील कार्यकर्त्यांची संवाद बैठक साठी मोठया संख्येने आलेल्या कार्यकर्ते व नागरिक यांच्या उपस्थितीत पार पडली यावेळी सर्वांच्या मताने जिल्हा परिषद खंडाळी सर्कलची उमेदवारी सौ शीतल प्रदीप खोमणे यांना जाहीर करण्यात आली आणि पंचायत समिती उजना गणा मधून देविदास सुरनर यांच्या पत्नी सौ. पार्वतीताई देविदास सुरनर यांची उमेदवारी जाहीर करण्यात आली राष्ट्रवादी शरदचंद्र पक्ष सोमेश्र्वर कदम, माजी जिल्हा




गटाचे जिल्हाध्यक्ष माजी मंत्री विनायकराव पाटील यांच्या मार्गदर्शनात झालेल्या बैठकीत परिषद सदस्य माधवराव जाधव, तालुकाध्यक्ष रामभाऊ बेल्लाळे,प्रदीप खोमणे, सुधीर गोरटे, माजी उपसभापती देविदास सुरनर, राम पाटील, राजेश नरवटे, सरपंच धनराज पाटील, प्रल्हादराव ईपर, व्यंकट पाटील, सुखदेव कदम, प्रकाश देवकते, चंद्रकांत लांडगे, पांडुरंग पोले, भास्कर केंद्रे, तुकाराम देवकते, नारायण कदम, शंकर पाटील, नंदकुमार कांबळे, वाजेद शेख, अर्जुन राठोड, अरविंद राठोड,

भगवान जाधव, पोले मंगेश, अर्जुन सुरनर, देवकते, राम संदीप, कांबळे नितीन सूर्यवंशी, मारुती ढवळे, ज्ञानेश्वर शिंगाडे, परमेश्वर पोले, सर्व कार्यकर्त्यांनी प्रदीप खोमणेच्या पाठीमागे राहवून एकजुटीने व ताकतीने निवडून आणण्याचा निर्धार केला.

# लॉर्ड श्रीकृष्ण इंग्लिश स्कुलमध्ये जिजाऊ व विवेकानंद जयंती



**त.भा. वृत्तसेवा,**

**लातूर, १३ जानेवारी :** लातूर, परिसरातील मातोश्री कलावती प्रतिष्ठान संचलित लॉर्ड श्रीकृष्णइंग्लिश स्कूलमध्ये राजमाता जिजाऊ व स्वामी विवेकानंद यांची जयंती विद्यार्थ्यानीउत्साहात साजरी केली.

सर्व प्रथम प्रमुख पाहुणे प्राचार्या रुपाली कुलकर्णी, रौफ शेख, रुपाली कोकाटे, नम्रता झांबरे, प्रियांका नागलबोने, विद्या पाटील यांच्या हस्ते राजमाता जिजाऊ व स्वामी विवेकानंद यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले.

शाळेच्या शिक्षिका सोनाली राउत यांनी राजमाता जिजाऊ यांच्याबद्दल माहिती देवून माँसाहेबांनी छत्रपती शिवाजी महाराज यांना कशा प्रकारे घडवले याची जाणीव करून दिली. माँसाहेब जिजाऊ यांच्यामुळे हिंदवी स्वराज्याची महुर्तमेढ रोवली गेली हे सांगितले वछत्रपती शिवाजी महाराजांनी निर्माण केलेल्या स्वराज्याबद्दल विद्यार्थ्यांना आठवण करुन दिली. या निमित्ताने शाळेच्या स्नेहल बारगजे, आरुषी खरोसे, आनंदी खोसे, माधवी माने, रिया कांबळे, प्रांजली अलापुरे, समीक्षा बिराजदार, आरोही कावळे, अक्षरा शिंदे या विद्यार्थिनी राजमाता जिजाबाई यांची वेशभूषा साकारून आपले मनोगत व्यक्त केले.

स्वामी विवेकानंद यांची जयंती युवा दिन म्हणून साजरी केली जाते हे आवर्जून सांगितले. या निमित्ताने शाळेचे विद्यार्थी सुजय मोहिते, प्रथमेश राउतराव, वेदांत दुरे, आयुष गायकवाड, मंगेश कदम, पृथ्वीराज दरेकर, वीरेंद्र सुकणे यांनी स्वामी विवेकानंद यांची वेशभूषा साकारून आपले मनोगत व्यक्त केले. शाळेतील सर्व शिक्षक व शिक्षिकांनी राजमाता जिजाऊ व स्वामी विवेकानंद यांच्या प्रतिमेसपुष्प अर्पण करून अभिवादन केले. तसेच सर्व विद्यार्थ्यांनी राजमाता जिजाऊ व स्वामी विवेकानंद जिजाबाई यांच्या प्रतिमेस अभिवादन केले. सुत्रसंचलन शाळेच्या शिक्षिका साक्षी मुंडे यांनी केले.

# अजय भोळे यांचा वाढदिवस साजरा

**त.भा. वृत्तसेवा,**

**देवणी, १३ जानेवारी :** देवणी तालुका राष्ट्रवादी युवक कॉंग्रेसचे कार्याध्यक्ष तथा कोनाळी ग्रामपंचायत सदस्य अजय भोळे यांचा वाढदिवस देवणी येथे साजरा करण्यात आला. यावेळी राष्ट्रवादी कॉंग्रेसचे प्रदेश सरचिटणीस मनोज कन्नाडे असे म्हणाले की राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्ष हा नुसता पक्ष नसून एक कुटुंब आहे. समाजातील प्रत्येक व्यक्तीच्या सुखदुःखात खंबीरपणे राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्ष नेहमीच उभा राहत आलेला आहे.

# भाजपा गटनेतेपदी मनोज पुदाले यांची निवड

**त.भा. वृत्तसेवा,**

**उदगीर, १३ जानेवारी :** भारतीय जनता पक्षाचे उदगीर नगर परिषदेत नगराध्यक्षासह तेरा सदस्य निवडून आले असून भाजपाच्या वतीने नगरपरिषदेत आपल्या भूमिका मांडण्यासाठी भाजपच्या गटनेतेपदी भाजपचे माजी शहराध्यक्ष मनोज पुदाले यांची निवड केल्याचे पत्र भाजपा जिल्हाध्यक्ष माजी मंत्री बसवराज पाटील मुरूमकर यांनी जिल्हाधिकाऱ्यांना दिले.

भारतीय जनता पक्षाच्या एकूण १४ सदस्यामधून उदगीर नगरपरिषदेच्या उपाध्यक्ष, स्थायी व विषय समिती निवडणूका, नामनिर्देशित सदस्यांच्या नियूक्त्या करणे, न.प. सभागृहात सर्वसाधारण सभेमध्ये भारतीय जनता पक्षाची भूमिका मांडून कामकाज पाहणे व महाराष्ट्र स्थानीक प्रधिकरण सदस्य अनर्हता अधीनियम १९८६ व महाराष्ट्र स्थानीक प्राधीकरण सदस्य अनर्हता नियम १९८७ मधील तरतुधी नुसार काम करणे, अंमलबजावणी करण्यासाठी व पक्षनिर्देश जारी करण्यासाठी पुदाले मनोज रामदास यांची उदगीर नगरपरिषदेत भारतीय जनता पक्षाचा गटनेता म्हणून निवड केल्याचे जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर यांना दिलेल्या पत्रात भाजपचे जिल्हाध्यक्ष माजी मंत्री बस्वराज पाटील मुरूमकर यांनी म्हटले आहे.



# श्रम संस्काराची शाळा म्हणजे ‘रासेयो’: डॉ. होकर्णे

**त.भा. वृत्तसेवा,**

**निलंगा, १३ जानेवारी :** पुस्तकी ज्ञानाबरोबरच विद्यार्थ्यांना सामाजिक ज्ञान सुद्धा मिळाले पाहिजे जे राष्ट्रीय सेवा योजनेच्या सात दिवशीय शिबिरातून प्राप्त होते. महात्मा गांधींच्या स्वप्नातील भारत पूर्ण करण्यासाठी खेडी समृद्ध झाली पाहिजेत यासाठी राष्ट्रीय सेवा योजनेचे शिबिर हे खेड्यात होतात अशा शिबिरामधूनच विद्यार्थ्यांना श्रम संस्काराची खरी किंमत कळते. म्हणून राष्ट्रीय सेवा योजना म्हणजे 'श्रम संस्काराची शाळा' आहे असे मत रा.से.यो.चे जिल्हा समन्वयक डॉ. बालाजी होकर्णे यांनी व्यक्त केले.

निलंगा येथील महाराष्ट्र महाविद्यालयाचे सात दिवशीय श्रमसंस्कार शिबिर मौ.लिंबाळा ता. निलंगा येथे संपन्न झाले. या कार्यक्रमात प्रमुख पाहुणे म्हणून डॉ. होकर्णे बोलत होते.

या समारोप कार्यक्रम प्रसंगी जिल्हा समन्वयक प्रा. विजय गवळी यांनी राष्ट्रीय सेवा योजना म्हणजे एक प्रकारचे ‘संस्कारपीठ’ आहे. यातून विद्यार्थ्यांमध्ये नेतृत्व विकास, व्यक्तिमत्व विकास, सामाजिक जाणीव निर्माण होते असे मत मांडले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. भास्कर गायकवाड यांची उपस्थिती होती. अध्यक्षीय समारोपत त्यांनी या.से.यो. हे स्वतःसाठी नाही तर समाजासाठी जगण्याचे ज्ञान देते. विद्यार्थ्यांना श्रमाची प्रतिष्ठा, जबाबदारीची जाणीव, कष्ट करण्याची वृत्ती, शिस्त आणि नियोजन,

**महाराष्ट्र महाविद्यालयाच्या वार्षिक शिबिराचा समारोप**




सामूहिक कार्य, एकात्मता भाव शिकवते असा विचार मांडला. तर डॉ. ज्ञानेश्वर चौधरी यांनी विकासासाठीचे लक्ष फक्त शहरांकडे आहे, गावाकडे नाही यासाठी विद्यार्थ्यांवर चांगले संस्कार आणि त्यांना श्रमाची प्रतिष्ठा कळावी यासाठी असे संस्कार शिबिर महत्त्वाचे आहेत असे मत मांडले.

याप्रसंगी विचार मंचावर उपप्राचार्य प्रा. प्रशांत गायकवाड, सरपंच सखाराम कलबोने, ग्रामविकास अधिकारी एस.व्ही. हसनाळे, मुख्याध्यापक श्रीमती बेबीनंदा भोसले, उपसरपंचबालाजी माने, तंटामुक्ती अध्यक्ष रमेश माने यांची उपस्थिती होती.

या सात दिवशीय निवासी शिबिरात पर्यावरण, व्यसनमुक्ती, आरोग्य तपासणी शिबिर, पशुधन आरोग्य तपासणी शिबिर, वृक्ष संवर्धन,अंधश्रद्धा निर्मूलन, नशामुक्ती, सायबर सुरक्षा असे विविध कार्यक्रम घेण्यात आले. प्रास्ताविक कार्यक्रमाधिकारी शिवरुद्र बदनाळे यांनी केले. सूत्रसंचालन मोनिका सोमवंशी, सानिया शेख यांनी तर आभार प्रा. श्रीकृष्ण दिवे यांनी मानले. शिबिर यशस्वीतेसाठी कार्यक्रमाधिकारी डॉ. विठ्ठल सांडूर, प्रा. शिवरुद्र बदनाळे, प्रा. श्रीकृष्ण दिवे, ज्ञानेश्वर खांडेकर, आजम शेख, तसेच शिबिरार्थी विद्यार्थी स्वयंसेवक, ग्रामस्थ यांचे सहकार्य लाभले.

## परंड्यात मोटरसायकलच्या अपघातात एकजण मृत्युमुखी

**तभा वृत्तसेवा**
**तुळजापूर, दि.१३ जानेवारी -**

बशीर पैगंबर शेख, रा. परंडा यांनी दि. ०९ जानेवारी २०२६ रोजी रात्री ८.०० वाजता मोटरसायकल क्र. एमएच २५ बीबी ३११८ वरून परंडा ते सोनारी रोडवर जात असताना भोंजा पाटी येथे समोरून येणाऱ्या वाहनाच्या लाईटच्या उजेडामुळे रोडजवळ उभ्या ट्रॅक्टरला धक्का दिला. यामुळे ट्रॅक्टरवरून पडून पैगंबर फकीर शेख, वय ५७ वर्षे, रा. वाल्हा गंभीर जखमी झाले आणि ते घटनास्थळी मृत्यूमुखी पडले.




फिर्यादी बिसमिल्ला पैगंबर शेख, वय २९ वर्षे, रा. देवगाव रोड परंडा यांनी दि. ११ जानेवारी रोजी प्रथम तक्रार दिल्यानंतर परंडा पोलीस ठाण्यात भा.न्या.सं. कलम १०६(१), २८१, १२५(अ), १२५(ब), १८४, १३४(अ) मोवाका अन्वये गुन्हा नोंदवला आहे.

## संक्षिप्त वृत्त...



### खामसवाडी येथे राष्ट्रमाता जिजाऊ व स्वामी विवेकानंद जयंती साजरी

**खामसवाडी, दि.१३ जानेवारी -**

राष्ट्रमाता जिजाऊ माँ साहेब तसेच युवकांचे प्रेरणास्थान असलेले महान तपस्वी युगपुरुष स्वामी विवेकानंद यांच्या जयंतीनिमित्त खामसवाडी गावात विविध ठिकाणी अभिवादन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. सिद्धिविनायक बँकेत पोस्टमास्तर आकाश भेटे, शिक्षक प्रशांत सुरवसे, बँकेचे पालक संचालक बलराम कुलकर्णी, शाखा व्यवस्थापक अभिजित सुरवसे, शेतकरी निशिकांत महाजन, बँक कर्मचारी श्याम कोळपे, अजय पांचाळ, स्वप्नील शिवशीवे तसेच सुशीलकुमार पाटील यांनी प्रतिमांचे पूजन करून अभिवादन केले. अभिनव बाल संस्कार विद्या मंदिर शाळेत मुख्याध्यापिका व शिक्षिका काजल यादव, शिक्षिका गीतांजली गर्जे, पुनम चांदणे यांच्या हस्ते प्रतिमांचे पूजन करण्यात आले. जगदंबा कन्या प्रशालेत मुख्याध्यापिका सावंत व पाटोळे यांच्या हस्ते प्रतिमेचे पूजन करण्यात आले. यावेळी शिक्षक गर्जे, जालिंदर केंद्रेसर, सतीश डिकले, बिबीशन शिंदे, आबाराव पाटोळे, मेटे तसेच विद्यार्थी उपस्थित होते.



### माळी यांना युवा उद्योजक पुरस्कार

**मंगरूळ, दि.१३ जानेवारी -**

मंगरुळ येथील युवा उद्योजक सचिन माळी यांना इटकळ ग्रामीण पत्रकार संघाच्या वतीने युवा उद्योजक पुरस्कार देऊन गौरविण्यात आले. इटकळ ग्रामीण पत्रकार संघाच्या वतीने आयोजित दिनदर्शिका प्रकाशन व विविध क्षेत्रांत उल्लेखनीय कार्य करणाऱ्या मान्यवरांच्या पुरस्कार वितरण समारंभाचे आयोजन रविवार, दि.११ जानेवारी रोजी करण्यात आले होते. पुरस्कार स्वरूपात त्यांना सन्मानचिन्ह, शाल, श्रीफळ, पुष्पगुच्छ व पेन देऊन यथोचित सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी माजी मंत्री मधुकरराव चव्हाण हे होते. प्रमुख उपस्थितीत जिल्हा परिषदेचे माजी सभापती मुकुंद डोंगरे, वसंत वडगावे, हभप. दिंडेगावकर महाराज आदी मान्यवर उपस्थित होते.



### लोहारा शहरातील जिल्हा परिषद शाळेची शैक्षणिक सहल संपन्न

**लोहारा, दि.१३ जानेवारी -**

लोहारा शहरातील जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळेची शैक्षणिक सहल दि.५ ते ९ डिसेंबर दरम्यान दोन एस.टी. महामंडळाच्या बसद्वारे यशस्वीपणे पार पडली. या सहलीदरम्यान विद्यार्थ्यांनी शनिशिंगणापूर, ओझर, लेण्याद्री, घृष्णेश्वर आदी धार्मिक स्थळांना भेटी दिल्या. त्याचबरोबर शिवनेरी किल्ला व देवगिरी किल्ला (दौलताबाद) या ऐतिहासिक किल्ल्यांचे दर्शन घेण्यात आले. छत्रपती संभाजीनगर येथील प्राणी संग्रहालय, बीबी का मकबरा तसेच जगप्रसिद्ध अजिंठा व वेरूळ येथील लेण्यांनाही विद्यार्थ्यांनी भेट दिली. या सहलीत ४५ मुले व ३८ मुली असे एकूण ८३ विद्यार्थी सहभागी झाले होते. सहलीचे नियोजन मुख्याध्यापक दत्तात्रय फावडे यांच्या मार्गदर्शनाखाली सहल प्रमुख सूर्यकांत पांढरे व रमेशकुमार बनसोडे यांनी केले. सहलीच्या यशस्वी आयोजनासाठी शिक्षक दत्तात्रय क्षीरसागर, शफिक गवंडी, संजय बोरसुने, सुरेश अंबुरे, उषा बर्डे, रेखा नारायणकर व पठान परवीन यांनी विद्यार्थ्यांची उत्तम सोय करून सहल यशस्वी केली.



### स्वातंत्र्यसेनानी आप्पाराव डोंगरे यांची जयंती विविध उपक्रमांनी साजरी

**मंगरूळ, दि.१३ जानेवारी -**

तुळजापूर तालुक्यातील मंगरूळ येथे स्वातंत्र्यसेनानी कै. आप्पाराव उर्फ महादू सदू डोंगरे यांची जयंती शैक्षणिक उपक्रमांसह उत्साहात साजरी करण्यात आली. यानिमित्त जिल्हा परिषद प्रशाला मंगरूळ येथे वक्तृत्व स्पर्धांचे आयोजन करण्यात आले. तसेच जिल्हा परिषद प्राथमिक शाळेला ७ हजार रुपये किमतीचा साऊंड सिस्टीम व जि. प. प्रशालेला १२ खुर्च्यांची भेट देण्यात आली. वक्तृत्व स्पर्धेत मोठ्या गटात प्राची प्रवीण मुळे प्रथम, श्रावणी बाळासाहेब शित्रे द्वितीय तर प्राजक्ता धनाजी डोंगरे तृतीय क्रमांकावर राहिली. लहान गटात आहील बशीर शेख, श्रेयश अरविंद मुळे व स्नेहल सत्यवान लबडे यांनी पारितोषिके पटकावली. कार्यक्रमास ग्रामस्थ, शिक्षक व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## ग्रामीण पत्रकार विकासातील महत्वाचा घटक : माजी मंत्री मधुकरराव चव्हाण

**तभा वृत्तसेवा**
**इटकळ, दि.१३ जानेवारी -**

गेल्या पंधरा वर्षांपासून सक्रिय असलेल्या इटकळ ग्रामीण पत्रकार संघाच्या कार्याचा ग्रामीण विकासात महत्त्वाचा वाटा असून, त्यांच्या सकारात्मक आणि जबाबदारीपूर्ण लिखाणामुळे ग्रामीण भागातील प्रगती घडत असल्याचे माजी मंत्री मधुकरराव चव्हाण यांनी दिनदर्शिकेच्या प्रकाशन व पुरस्कार वितरण सोहळ्यात बोलताना व्यक्त केले.

रविवार, ११ जानेवारी २०२६ रोजी सायंकाळी ५ वाजता विवांता रिसॉर्ट, इटकळ येथे दिनदर्शिका प्रकाशन व पुरस्कार वितरण सोहळा मोठ्या थाटामाटात पार पडला.




या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी माजी मंत्री मधुकरराव चव्हाण, तर उद्घाटक म्हणून हभप. विठ्ठल महाराज दिंडेगावकर उपस्थित होते.

प्रमुख पाहुण्यांमध्ये माजी जिल्हा परिषद सभापती मुकुंद दादा डोंगरे, भारतीय जनता पक्षाचे प्रदेश कार्यकारिणी सदस्य वसंतराव वडगावे, संजीवनी सामाजिक संस्थेचे डॉ. नागनाथ कुंभार व डॉ. जितेंद्र कानडे, माजी जि.प. सदस्य अझर मुजावर, पोलिस उपनिरीक्षक महेश घोडके, सरपंच साहेबा क्षिरसागर, पोलीस पाटील विनोद सलगरे, समर्थ हॉटेलचे सर्वेसर्वा अब्दुल शेख, उपसरपंच लक्ष्मण क्षिरसागर, बाळासाहेब वाघमारे, उपसरपंच फिरोज मुजावर, शिवा ऍग्रोचे मल्लिनाथ जेवळे यांची उपस्थिती होती.

कार्यक्रमाची सुरुवात पत्रकार संघाच्या वतीने उपस्थित मान्यवरांचा सन्मान करून करण्यात आली. प्रास्ताविक दयानंद काळुंके यांनी केले, ज्यामध्ये ग्रामीण पत्रकार संघाचे कार्य व त्यांच्या समस्यांबाबत सविस्तर माहिती दिली. त्यानंतर मान्यवरांच्या हस्ते इटकळ ग्रामीण पत्रकार संघ २०२६ च्या दिनदर्शिकेचे प्रकाशन करण्यात आले.

सोहळ्यात इटकळ व परिसरातील धार्मिक, वारकरी संप्रदायातील उत्तुंग व्यक्तिमत्व, आदर्श शिक्षक, कृषिभूषण, युवा उद्योजक अशा २५ जणांना माजी मंत्री मधुकरराव चव्हाण यांच्या हस्ते सन्मानपत्र, शाल, पेन व पुष्पगुच्छ देऊन गौरविण्यात आले.

या कार्यक्रमासाठी परिसरातील सरपंच, उपसरपंच, सामाजिक, शैक्षणिक, राजकीय, वारकरी, शेतकरी, व्यापारी व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचलन दिनेश सलगरे यांनी केले, सन्मानपत्राचे वाचन चांदसाहेब शेख यांनी केले तर आभार बालाजी गायकवाड यांनी मानले.

हा सोहळा यशस्वी होण्यासाठी इटकळ ग्रामीण पत्रकार संघाचे अध्यक्ष दिनेश सलगरे, उपाध्यक्ष लियाकत खुदादे, सचिव केशव गायकवाड, सदस्य चांदसाहेब शेख, बालाजी गायकवाड व नामदेव गायकवाड यांनी विशेष मेहनत घेतली.

## आळणी येथे राजमाता जिजाऊ व स्वामी विवेकानंद जयंती साजरी

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.१३ जानेवारी -**

आळणी येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत राजमाता जिजाऊ व स्वामी विवेकानंद यांची जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. या कार्यक्रमाच्या सुरुवातीला शाळेमध्ये राजमाता जिजाऊ व स्वामी विवेकानंद यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.



कार्यक्रमात इयत्ता पहिली ते सातवीमधील विद्यार्थ्यांनी राजमाता जिजाऊ यांच्या जीवनावर प्रभावी भाषणे सादर केली.

छावा प्रतिष्ठान यांच्या वतीने शाळेतील सर्व विद्यार्थ्यांना केळीचे वाटप करण्यात आले.

यावेळी छावा प्रतिष्ठानचे अध्यक्ष ज्ञानेश्वर माऊली वीर, अजय देशमुख, अजित वीर, शुभम गाडे, संकेत वीर, विष्णू लावंड, अजय निंबाळकर, बालाजी वीर, अविनाश कदम, निलेश कदम, निखिल वीर, निलेश वीर, निलेश नांदे, निलेश वीर, प्रतीक कदम, स्वप्नील वीर, रोहित तौर, शाळेचे मुख्याध्यापक बशीर तांबोळी संस्थेचे सर्व पदाधिकारी व शिक्षक उपस्थित होते.

## ट्रॅक्टर अपघातात एकजण ठार; गुन्हा दाखल

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.१३ जानेवारी -**

संतोष मनोहर बरडे, वय ३५ वर्षे, रा. पाणेवाडी, ता. आंबड, जि. जालना हे दि. २५ डिसेंबर २०२५ रोजी रात्री ११.३० वाजता पाहुणे परमेश्वर माळी यांना भेटण्यासाठी देवळाली परिसरात जात असताना देवळाली येथील नदीच्या पुलावरून पायी चालत होते.

दरम्यान, माणिक तुकाराम गडदे, रा. मंगाईचीवाडी, चिचखंडी, ता. अंबाजोगाई, जि. बीड यांचे ताब्यातील ट्रॅक्टर (क्र. एमएच ४४ झेड ०४२८) हायगयी व निष्काळजीपणे चालवताना संतोष बरडे यांना धडक दिली. या अपघातात ते गंभीर जखमी होऊन घटनास्थळी मयत झाले.

फिर्यादी अनिता संतोष बरडे, वय ३० वर्षे, रा. पाणेवाडी यांनी दि. ११ जानेवारी २०२६ रोजी प्रथम तक्रार दिल्यानंतर धाराशिव




ग्रामीण पोलीस ठाण्यातगुन्हा नोंदवण्यात आला असून, पोलीस तपास करत आहेत.

## नवजीवन गोशाळेत चाऱ्याची तीव्र टंचाई; गोमातेच्या सेवेसाठी दानशूरांना आवाहन



**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.१३ जानेवारी -**

जय श्रीराम, जय गोमाता या भावनेतून गोसेवा करणाऱ्या नवजीवन गोशाळा सध्या गंभीर अडचणीत सापडली आहे. गोशाळेत पशुधनाची संख्या मोठ्या प्रमाणात असून, सततच्या पावसामुळे चारा भिजून पशुधनासाठी खाण्यायोग्य राहिला नाही. त्यामुळे मागील काही दिवसांत चारा साठवणूक करता आली नाही. परिणामी सध्या गोशाळेत चाऱ्याची पूर्णतः टंचाई निर्माण झाली आहे.

सध्या ऊसाच्या वाड्याचा हंगाम सुरू असून, एक टन चाऱ्यासाठी सुमारे २५०० रुपये खर्च येत आहे. मात्र आर्थिक अडचणींमुळे गोशाळेला आवश्यक तेवढा चारा खरेदी करणे शक्य होत नसल्याने गोमातेच्या भोजनाचा गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे. नवजीवन गोशाळेतील गायींना तातडीने चाऱ्याची आवश्यकता असून, यासाठी गोसेवक आणि दानशूर व्यक्तींनी पुढे येण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

गोसेवक वैशाली बारकुल यांनी हात जोडून नम्र विनंती करत सांगितले की, गोमातेच्या सेवेसाठी समाजातील दानशूरांनी चारा किंवा आर्थिक स्वरूपात मदत करावी. काल काही प्रसारमाध्यमांमार्फतही आम्ही चाऱ्यासाठी आवाहन केले असून, सकारात्मक प्रतिसादाची अपेक्षा आहे. गोसेवेसाठी मदत करू इच्छिणाऱ्या नागरिकांनी फोनपे-गुगल पे क्रमांक : ८८०५६९६२२१ वर संपर्क साधावा किंवा थेट मदत करावी, असे आवाहन करण्यात आले आहे.

गोमातेच्या रक्षणासाठी आणि सेवेसाठी समाजातील प्रत्येक घटकाने पुढे येणे ही काळाची गरज असल्याचेही गोशाळा व्यवस्थापनाकडून स्पष्ट करण्यात आले आहे.

## जिजाऊ जन्मोत्सवासाठी रवाना झालेल्या भगिनींना ॲड. शीतल चव्हाण फाऊंडेशनकडून मायेची शिदोरी




**तभा वृत्तसेवा**
**उमरगा, दि.१३ जानेवारी -**

राष्ट्रमाता राजमाता जिजाऊ म्हणजे त्याग, धैर्य, स्वाभिमान आणि संस्कारांचे मूर्तिमंत प्रतीक. त्यांच्या विचारांचा व कार्याचा वारसा जपण्यासाठी दरवर्षी सिंदखेडराजा येथे जिजाऊ जन्मोत्सव मोठ्या उत्साहात साजरा केला जातो. याच पार्श्वभूमीवर दि.११ जानेवारी २०२६ (रविवार) रोजी उमरगा-लोहारा परिसरातील जिजाऊ ब्रिगेडच्या महिला भगिनी जिजाऊ जन्मोत्सवात सहभागी होण्यासाठी सिंदखेडराजा येथे रवाना झाल्या.

या पवित्र व प्रेरणादायी प्रवासासाठी निघालेल्या जिजाऊंच्या लेकींना ॲड. शीतल चव्हाण फाऊंडेशनच्या वतीने मायेची व आपुलकीची शिदोरी देण्यात आली. या शिदोरीमध्ये प्रवासादरम्यान उपयोगी पडणारा अल्पोपहार, पिण्याच्या पाण्याच्या बाटल्या तसेच प्रेरणादायी पुस्तके देऊन महिलांचा सन्मान करण्यात आला. हा उपक्रम केवळ मदतीपुरता मर्यादित न राहता, जिजाऊंच्या लेकींप्रती असलेली सामाजिक बांधिलकी व संवेदनशीलतेचे प्रतीक ठरला.

दि.११ जानेवारी २०२६ रोजी सकाळी उमरगा बसस्थानक येथे ॲड. शीतल चव्हाण फाऊंडेशनचे पदाधिकारी सत्यनारायण जाधव, ॲड. अर्चना जाधव, शबाना उडचणे, धानय्या स्वामी व किशोर बसगुंडे यांच्या हस्ते ही शिदोरी जिजाऊ ब्रिगेडच्या भगिनींना प्रदान करण्यात आली. यावेळी महिलांना बसमध्ये व्यवस्थित बसवून त्यांच्या सुखरूप, सुरक्षित व आनंददायी प्रवासासाठी शुभेच्छा देण्यात आल्या.

या ऐतिहासिक व प्रेरणादायी सिंदखेडराजा प्रवासासाठी जिजाऊ ब्रिगेडच्या शिवमती रेखा पवार यांनी विशेष पुढाकार घेतला. त्यांच्या उत्तम नियोजनामुळे व मार्गदर्शनामुळे हा प्रवास शिस्तबद्ध व यशस्वीरीत्या पार पडला.

एकूणच, ॲड. शीतल चव्हाण फाऊंडेशनचा हा उपक्रम स्त्रीशक्तीला बळ देणारा, जिजाऊंच्या विचारांना वाहिलेला आणि सामाजिक सलोख्याचे दर्शन घडवणारा ठरला.

जिजाऊंच्या लेकींप्रती दाखवलेली ही माया व आपुलकी भविष्यातही समाजासाठी प्रेरणादायी ठरेल, असा विश्वास उपस्थितांनी व्यक्त केला.

## न्यू व्हिजन इंग्लिश स्कूलमध्ये राजमाता जिजाऊ व स्वामी विवेकानंद जयंती उत्साहात साजरी



**तभा वृत्तसेवा**
**लोहारा, दि.१३ जानेवारी -**

दि.१२ जानेवारी रोजी लोहारा शहरातील न्यू व्हिजन इंग्लिश स्कूल येथे स्वराज्य जननी राजमाता जिजाऊ माँसाहेब व महान राष्ट्रसंत स्वामी विवेकानंद यांची जयंती उत्साहात साजरी करण्यात आली.

या कार्यक्रमाची सुरुवात स्कूलचे प्राचार्य शहाजी जाधव, पालक प्रतिनिधी रमेश वाघुले व संचालिका सविता जाधव यांच्या हस्ते राजमाता जिजाऊ व स्वामी विवेकानंद यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून पूजनाने करण्यात आली.

यावेळी काही विद्यार्थ्यांनी राजमाता जिजाऊ व स्वामी विवेकानंद यांची वेशभूषा परिधान करून कार्यक्रमात रंगत आणली, तर काही विद्यार्थ्यांनी या थोर व्यक्तिमत्त्वांवरील भाषणांद्वारे आपले मनोगत व्यक्त केले.

सहशिक्षिका सोनाली काटे यांनी आपल्या भाषणातून दोन्ही महान व्यक्तिमत्त्वांच्या जीवनकार्यावर प्रकाश टाकला.

कार्यक्रमास शाळेतील अनिता मनशेट्टी, वैशाली गोरे, दिपिका देशमुख, वैशाली जाधव, सुलोचना वकील, रेश्मा शेख, सिद्धेश्वर सुरवसे, रमेश गिराम यांच्यासह शिक्षक, कर्मचारी, पालक व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रमाचे सूत्रसंचलन सविता जाधव यांनी केले, तर आभार प्रदर्शन मीरा माने यांनी मानले.

## राजमाता जिजाऊंच्या विचारांना कृतीची जोड : येडाई व्यसनमुक्ती केंद्रात व्यसनमुक्तीची शपथ



**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.१३ जानेवारी -**

राजमाता राष्ट्रमाता जिजाऊ मासाहेब यांची जयंती येडाई व्यसनमुक्ती केंद्रात अत्यंत उत्साहपूर्ण वातावरणात साजरी करण्यात आली. या प्रसंगी राजमाता जिजाऊंच्या संस्कारशील विचारांना कृतीची जोड देत व्यसनमुक्त समाजनिर्मितीचा संकल्प करण्यात आला.

या जयंती कार्यक्रमात येडाई व्यसनमुक्ती केंद्राचे प्रकल्प समन्वयक गणेश परदेशी, प्रियंका शिंदे, बापूराव हुलूळे, कविता तांबारे, कल्पना कोठावळे, संजय कांबळे, ऋषिकेश लोभे, राजकुमार मुंडे, सोमनाथ कोकाटे आदी मान्यवरांनी सहभाग घेतला. परिवर्तनवादी रुग्णमित्रांच्या समवेत जिजाऊ जयंती उत्साहात साजरी करण्यात आली.

कार्यक्रमादरम्यान उपस्थित मान्यवरांनी राजमाता जिजाऊ मासाहेब यांच्या जीवनकार्याचा आढावा घेत, त्यांचे संस्कार, शिस्त, स्वाभिमान आणि राष्ट्रप्रेम या मूल्यांवर आपले मनोगत व्यक्त केले. या विचारांमधूनच छत्रपती शिवाजी महाराजांसारखा महान नेतृत्वकर्ता घडल्याचे प्रतिपादन करण्यात आले. कार्यक्रमास येडाई व्यसनमुक्ती केंद्राचे संचालक डॉ. संदीप तांबारे व डॉ. पल्लवी तांबारे हे प्रमुख उपस्थित होते. डॉ. संदीप तांबारे यांनी आपल्या प्रभावी शैलीत राजमाता जिजाऊंच्या विचारांचे महत्त्व अधोरेखित करत, आजच्या तरुण पिढीने व्यसनमुक्त जीवन स्वीकारण्याची नितांत गरज असल्याचे सांगितले. व्यसनमुक्त जीवनशैलीतूनच सशक्त व्यक्ती आणि सुदृढ समाज घडू शकतो, असे त्यांनी नमूद केले. शेवटी राजमाता जिजाऊ मासाहेब यांच्या जयंतीनिमित्त सर्व उपस्थित परिवर्तनवादी रुग्णमित्रांनी व्यसनमुक्तीचा संकल्प केला व व्यसनमुक्तीची शपथ घेतली.

कार्यक्रमातून जिजाऊंच्या संस्कारांचा वारसा जपत, व्यसनमुक्त व सशक्त समाजनिर्मितीचा प्रभावी संदेश देण्यात आला.

लातूर
# दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## बिडवे अभियांत्रिकी महाविद्यालयात स्वामी विवेकानंद जयंती

**त.भा. वृत्तसेवा,**

**लातूर, १३ जानेवारी :** नुकतीच महाविद्यालयांमध्ये स्वामी विवेकानंद यांची जयंती साजरी करण्यात आली.

व्यासपीठावर महाविद्यालयाचे उपप्राचार्य प्रा. विरभद्र बाळे, निबंधक डॉ. सौ. ज्योती पाटील, इलेक्ट्रॉनिक्स विभागाच्या विभाग प्रमुख डॉ. सौ. शारदा मुद्दा, संगणक विभाग प्रमुख डॉ. एन. एम. हलगरे तसेच कार्यक्रमाचे संयोजक प्रा. ऋषिकेश दुधनी उपस्थित होते. सुरुवातीला प्रतिमा पुजन झाल्यानंतर प्रा. ऋषिकेश दुधनी यांनी प्रास्ताविक सादर करत आत्मषटकाचे पठन केले. त्यानंतर इतर मान्यवराची समयोच्चित भाषणे झाली. प्रा. श्रीकांत तांदळे यांनी सर्व उपस्थितांना योगा बद्दल माहिती दिली व प्रात्यक्षिक ही करून घेतले.






# मतदान प्रक्रियेसाठी प्रशासकीय यंत्रणा सज्ज : मानसी मीना

**त.भा. वृत्तसेवा,**

**लातूर, १३ जानेवारी :** गुरुवार, दि. १५ जानेवारी २०२६ रोजी होणाऱ्या लातूर शहर महानगरपालिकेच्या तिसऱ्या सार्वत्रिक निवडणुकीच्या मतदानासाठी प्रशासकीय यंत्रणा सज्ज झाली आहे. मतदानादरम्यान कोणताही अनुचित प्रकार घडू नये आणि पारदर्शक प्रक्रिया पार पाडावी, यासाठी शहरातील एकूण ३७५ मतदान केंद्रांपैकी १५० केंद्रांवर सीसीटीव्ही कॅमेरे बसवण्यात आले असून, संपूर्ण प्रक्रियेवर डिजिटल वॉच ठेवला जाणार आहे, अशी माहिती महापालिका आयुक्त मानसी मीना यांनी पत्रकार परिषदेत बोलताना दिली.

महापालिका निवडणुकीच्या अनुषंगाने महापालिकेच्या स्थायी समिती सभागृहात आयोजित पत्रकार परिषदेत त्या बोलत होत्या. यावेळी अतिरिक्त आयुक्त देविदास जाधव, उपायुक्त डॉ. पंजाबराव खानसोळे, आचारसंहिता कक्षाच्या प्रमुख उपजिल्हाधिकारी श्रीमती कासोदेकर यांची प्रमुख उपस्थिती होती.



यावेळी आयुक्त मानसी मीना म्हणाल्या, शहरात एकूण मतदार ३ लाख २१ हजार ३५४ मतदार आहेत. यात पुरुष मतदार १ लाख ६४ हजार १५२, तर महिला मतदार १ लाख ५७ हजार १७१ आहेत. पोलीस प्रशासनाने दिलेल्या अहवालानुसार, लातूर शहरात एकूण ९९ केंद्रे संवेदनशील म्हणून घोषित करण्यात आली आहेत. सुरक्षेच्या दृष्टीने या सर्व ९९ संवेदनशील केंद्रांवर सीसीटीव्ही कॅमेर्यांची नजर असणार आहे. याशिवाय, ज्या इमारतींमध्ये मतदारांची मोठी गर्दी होते किंवा जिथे एकाच ठिकाणी जास्त मतदान केंद्रे आहेत, त्या ठिकाणीही सुरक्षेच्या दृष्टीने काळजी घेण्यात येणार आहे. मतदानाची टक्केवारी वाढवण्यासाठी आणि शांततेत प्रक्रिया पार पाडण्यासाठी स्विप कक्षाच्या माध्यमातून मतदार जनजागृती करण्यात आली आहे, असे त्यांनी सांगितले.

निवडणूक कालावधीत कोणताही अनुचित प्रकार घडू नये यासाठी प्रशासनाने सर्वतोपरी प्रयत्न केल्याचे सांगून आचारसंहितेचे पालन करण्याचाही यशस्वी प्रयत्न केला गेला. निवडणूक आयोगाच्या निर्देशाप्रमाणे मतदारांसाठी आवश्यक त्या सुविधाही मतदान केंद्रावर उपलब्ध करून देण्यात आल्याचे आयुक्त मीना यांनी सांगितले.

महापालिका निवडणुकीच्या अत्यंत महत्त्वाच्या टप्प्यात म्हणजेच मतदान प्रक्रिया आणि मतमोजणी. त्या पार्श्वभूमीवर लातूर शहरातील वाहतूक व्यवस्थेत मोठे बदल करण्यात आले आहेत. बुधवार, दि. १४ जानेवारी ते दि. १६ जानेवारी २०२६ या कालावधीत बार्शी रोडवरील पीव्हीआर चौक ते बिडवे इंजिनिअरिंग कॉलेज हा मार्ग सर्व प्रकारच्या वाहनांसाठी बंद राहणार आहे.

महिला तंत्रनिकेतन, बार्शी रोड येथे निवडणूक साहित्याचे वाटप, संकलन आणि मतमोजणी होणार असल्याने सुरक्षेच्या कारणास्तव प्रशासनाने हा निर्णय घेतला आहे. नागरिकांनी याकामी प्रशासनास सर्वतोपरी सहकार्य करण्याचे आवाहनही करण्यात आले आहे.

## निवृत्त अधिकाऱ्याची ऑनलाइन फसवणूक

**त.भा. वृत्तसेवा,**

**लातूर, १३ जानेवारी :** लातूर शहरातील एका निवृत्त सरकारी अधिकाऱ्याला 'डिजिटल अरेस्ट'चा बनाव रचून सायबर भामट्यांनी तब्बल ७१ लाख रुपयांची ऑनलाइन फसवणूक केल्याची खळबळजनक घटना उघडकीस आली आहे. आरोपींनी स्वतःला तपास यंत्रणांचे अधिकारी असल्याचे भासवून पीडितावर मानसिक दबाव टाकत विविध बँक खात्यांत रक्कम वर्ग करण्यास भाग पाडले.

या गंभीर प्रकाराची माहिती मिळताच ॲड.राहुल शेळ्ळाळे यांनी तात्काळ हस्तक्षेप करत पीडितास सायबर हेल्पलाईन वर त्वरित तक्रार दाखल करण्याचा सल्ला दिला व त्यांनी आवश्यक ती सर्व कायदेशीर प्रक्रिया पूर्ण करून, फिर्यादी-पीडिताची बाजू न्यायालयासमोर प्रभावीपणे मांडली. न्यायालयाच्या आदेशानुसार ४० लाख ६३ हजार ८७० रुपयांची रक्कम फिर्यादीस परत मिळण्यात यश आले. सायबर गुन्हेगार नागरिकांना भीती दाखवून 'डिजिटल अरेस्ट'सारख्या बनावट प्रकारांद्वारे फसवत आहेत. अशा वेळी घाबरून न जाता तात्काळ सायबर पोलिसांशी संपर्क साधणे अत्यंत महत्त्वाचे आहे. योग्य वेळी तक्रार आणि कायदेशीर प्रक्रिया केल्यास फसवलेली रक्कम परत मिळण्याची शक्यता नक्कीच असते. नागरिकांनी कोणत्याही धमकीला बळी न पडता कायद्यावर विश्वास ठेवावा, असे आवाहन ॲड. राहुल शेळ्ळाळे यांनी केले आहे.

## कुख्यात टोळीवर हद्दपारीची कडक कारवाई

**त.भा. वृत्तसेवा,**

**लातूर, १३ जानेवारी :** लातूर जिल्ह्यातील एका कुख्यात गुन्हेगारांच्या टोळीवर हद्दपारीची कार्यवाही करण्यात आली आहे. हद्दपारीचा आदेश पोलीस अधीक्षक अमोल तांबे यांनी निर्गमित केला आहे. कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी सदरचा निर्णय घेण्यात आल्याचे त्यांनी सांगितले.

लातूर जिल्ह्यातील नागरिकांचे जीवन, मालमत्ता व सार्वजनिक सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी पोलीस प्रशासन सदैव कटिबद्ध असून, समाजात दहशत निर्माण करणाऱ्या व सतत गंभीर स्वरूपाचे गुन्हे करणाऱ्या गुन्हेगारी टोळ्यांविरुद्ध कठोर कारवाई करण्यात येत आहे. त्या अनुषंगाने ईश्र्वर गजेंद्र कांबळे, वय २३ वर्षे, रा. जय नगर, लातूर, विकास उर्फ विक्की गजेंद्र कांबळे, वय २५ वर्षे, रा. जय नगर, लातूर व प्रफुल श्रीमंत गायकवाड, वय २९ वर्षे, रा. सिद्धार्थ सोसायटी, लातूर या तिघांवर ही कार्यवाही केली आहे.

या तिन्ही व्यक्ती विरुद्ध पोलीस स्टेशन विवेकानंद चौक, लातूर येथे जबरी चोरी, दरोडा, शस्त्राचा धाक दाखवून लूटमार, धमकी देणे, टोळी बनवून गंभीर स्वरूपाचे गुन्हे करणे अशा स्वरूपाचे अनेक गुन्हे दाखल आहेत. त्यांचा गुन्हेगारी अभिलेख पाहता ते सातत्याने संघटित पद्धतीने गुन्हे करीत असून, त्यांच्या कृत्यांमुळे परिसरातील नागरिकांमध्ये भीती, दहशत व असुरक्षिततेचे वातावरण निर्माण झालेले आहे.

या टोळीविरुद्ध यापूर्वी वेळोवेळी प्रतिबंधक कारवाई (कलम १०७ सीआरपीसी, १२९ बीएनएसएस इ.) करण्यात आली होती. मात्र, या सर्व कारवायांनंतरही त्यांच्या वर्तनात कोणतीही सुधारणा झालेली दिसून आली नाही. त्यामुळे नागरिक दहशतीखाली जीवन जगत असून, सार्वजनिक शांतता व सुव्यवस्था धोक्यात आलेली होती.

त्या अनुषंगाने पोलीस अधीक्षक अमोल तांबे यांचे आदेशान्वये विवेकानंद पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक संतोष पाटील व त्यांच्या टीम मधील पोलीस अंमलदार खुर्रम काझी, गणेश यादव, रवी गोंदकर, रणवीर देशमुख, सचिन राठोड, यशपाल कांबळे, धैर्यशील मुळे यांनी नमूद आरोपी विरुद्ध हद्दपारचा सविस्तर प्रस्ताव तयार करून तो पोलीस अधीक्षकांकडे पाठवण्यात आला होता. त्याअन्वये सदर तिन्ही इसमांना लातूर जिल्हा,नांदेड जिल्ह्यातील लोहा, मुखेड, देगलूर तालुके, धाराशिव जिल्ह्यातील तुळजापूर, धाराशिव, उमरगा, कळंब तालुके, परभणी जिल्ह्यातील गंगाखेड तालुका या सर्व हद्दीतून दोन वर्षांच्या कालावधीसाठी हद्दपार करण्यात आले आहे.

## शासकीय रुग्णालयाचा बाह्यरुग्ण विभाग उद्या बंद राहणार

**त.भा. वृत्तसेवा,**

**लातूर, १३ जानेवारी :** महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक मतदानादिवशी सार्वजनिक सुट्टी जाहीर करण्यात आल्याने विलासराव देशमुख शासकीय वैद्यकीय रुग्णालयातील बाह्यरुग्ण विभाग गुरुवार, १५ जानेवारी २०२६ रोजी बंद राहील. तसेच शुक्रवार, १६ जानेवारी २०२६ पासून बाह्यरुग्ण विभाग (ओ.पी.डी.) नियमित वेळेप्रमाणे सुरु राहील, असे विलासराव देशमुख शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयाचे वैद्यकीय अधीक्षक डॉ. सचिन जाधव यांनी कळविले आहे.

# जनगणनेचे काम गांभीर्याने करा : जिल्हाधिकारी

**घर यादी, गटांची रचनाबाबत अधिकाऱ्यांना प्रशिक्षण**

**त.भा. वृत्तसेवा,**

**लातूर, १३ जानेवारी :** केंद्र शासनाने २०२७ मध्ये जनगणना करण्याचा निर्णय घेतला आहे. त्या अनुषंगाने जनगणना संचालनालयामार्फत प्रशिक्षण व पूर्वतयारी सुरु करण्यात आली आहे. या प्रशिक्षणामध्ये देण्यात येणाऱ्या माहितीनुसार सर्व संबंधित अधिकारी, कर्मचारी यांनी कार्यवाही करावी. जनगणनेची कार्यवाही अचूक होण्यासाठी सर्वांनी गांभीर्याने काम करावे, अशा सूचना जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे यांनी आज येथे दिल्या.

जिल्हाधिकारी कार्यालयातील नियोजन समिती सभागृहात आयोजित भारतीय जनगणना २०२७ विषयक प्रशिक्षण सत्राच्या उद्घाटनप्रसंगी जिल्हाधिकारी बोलत होत्या. मुंबई येथील जनगणना संचालनालायचे सहाय्यक संचालक प्रवीण भगत, जनगणना संचालनालायचे अरुण साळगावकर, उपजिल्हाधिकारी अहिल्या गाठाळ, सायली ठाकूर, तहसीलदार वर्षा मनाळे यांच्यासह सर्व संबंधित अधिकारी, कर्मचारी यावेळी उपस्थित होते.




समाजातील घटकांच्या सर्वांगीण विकासाचे नियोजन करताना जनगणनेचा अहवाल उपयुक्त ठरतो. या माहितीच्या आधारे विविध योजना, विकासाची दिशा निश्र्चित केली जाते. त्यामुळे आगामी जनगणना अचूक होण्यासाठी सर्वांनी आपल्यावर सोपविलेली जबाबदारी काटेकोरपणे पार पाडावी.

प्रथमच जनगणना डिजिटल स्वरुपात होत असून त्यादृष्टीने देण्यात येणाऱ्या प्रशिक्षणाला सर्वांची उपस्थिती बंधनकारक असून या प्रशिक्षणात देण्यात येणाऱ्या सूचनांची अंमलबजावणी करावी, असे जिल्हाधिकारी श्रीमती ठाकूर-घुगे यांनी सांगितले. जनगणनेतून एकही घर सुटणार नाही, याची काळजी घ्यावी, असेही त्या म्हणाल्या.

यावेळी सर्व तहसीलदार, सर्व नगरपरिषद व नगरपंचायतींचे मुख्याधिकारी यांच्यासह जनगणनेसाठी नियुक्त क्षेत्रीय अधिकारी यांची उपस्थिती होती. घर यादी, गटांची रचना याबाबत यावेळी मार्गदर्शन करण्यात आले.

## समाज कल्याण विभागातर्फे विद्यार्थिनीच्या कुटुंबाला ४ लाखांचे सहाय्य मंजूर

**जवाहर नवोदय विद्यालयातील अल्पवयीन विद्यार्थिनीच्या मृत्यू प्रकरणाचा तपास गतीने सुरु**

**त.भा. वृत्तसेवा,**

**लातूर, १३ जानेवारी :** येथील जवाहर नवोदय विद्यालयातील अल्पवयीन विद्यार्थिनीच्या मृत्यू प्रकरणामध्ये पोलीस प्रशासन आणि जिल्हा प्रशासनामार्फत आवश्यक कार्यवाही गतीने केली. या प्रकरणात प्राप्त तक्रारीनंतर पोलिसांकडून पारदर्शक तपास सुरु करण्यात आला. या तपासाच्या आधारे विद्यालयातील दोन कर्मचाऱ्यांवर भारतीय न्याय संहितेच्या विविध कलमांसह अनुसूचित जाती व जमाती (अत्याचार प्रतिबंध) अधिनियम, १९८९ अंतर्गत गुन्हा नोंदविण्यात आला आहे. हे दोन्ही कर्मचारी ते सध्या कोठडीत आहेत. तसेच विद्यार्थिनीच्या कुटुंबियांना समाज कल्याण विभागामार्फत ४ लाख रुपयांचे सहाय्य मंजूर करण्यात आले असल्याची माहिती जिल्हा प्रशासनाने दिली आहे. तसेच विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेसाठी उपाययोजना हाती घेण्यात आल्या असून विद्यालयामध्ये समुपदेशक नियुक्त करण्याच्या सूचना दिल्या आहेत.

जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे व पोलीस अधीक्षक अमोल तांबे यांच्या मार्गदर्शनाखाली हे प्रकरण गांभीर्याने हाताळले जात आहे. या दुःखद घटनेत मुलीच्या कुटुंबियांना तात्काळ मदत म्हणून समाज कल्याण विभागामार्फत ४ लाख रुपयांचे अर्थसहाय्य मंजूर करण्यात आले आहे. जिल्हाधिकारी श्रीमती ठाकूर-घुगे, पोलीस प्रशासनातील वरिष्ठ अधिकारी यांनीही जवाहर नवोदय विद्यालयाला भेट देवून विद्यार्थी, पालकांशी संवाद साधला असून विद्यार्थ्यांच्या सुरक्षेसाठी आवश्यक उपाययोजना तातडीने अमलात आणण्याचे निर्देश जवाहर नवोदय प्रशासनाला दिले आहेत.

## महानगरपालिका निवडणूक व्यापक बंदोबस्तासाठी पोलीस प्रशासन सज्ज



**त.भा. वृत्तसेवा,**

**लातूर, १३ जानेवारी :** लातूर शहर महानगरपालिकेच्या तिसऱ्या सार्वत्रिक निवडणुकीसाठी पोलीस प्रशासन सज्ज झाले असून त्याकरिता लातूर पोलीस प्रशासनाने अत्यंत काटेकोर, शिस्तबद्ध व व्यापक बंदोबस्ताची रचना केली असून संपूर्ण यंत्रणा पूर्ण क्षमतेने सज्ज झाली आहे.

लोकशाही व्यवस्थेचा कणा असलेल्या निवडणुका या केवळ मतदानापुरत्या मर्यादित नसून त्या जनतेच्या विश्वासाचे, स्वातंत्र्याचे, पारदर्शकतेचे आणि न्याय्यतेचे प्रतीक असतात. प्रत्येक नागरिकाने कोणत्याही भीतीशिवाय, दबावाशिवाय शांत आणि भयमुक्त वातावरणात आपला मतदानाचा हक्क बजावावा, हीच खरी लोकशाहीची ओळख आहे.

निवडणूक काळात कायदा व सुव्यवस्था अबाधित राखणे, शांतता व सामाजिक सलोखा प्रस्थापित करणे, समाजकंटक, गुन्हेगारी प्रवृत्ती, अफवा पसरवणारे घटक व गैरप्रकार करणाऱ्यांवर कठोर नियंत्रण ठेवणे तसेच प्रत्येक मतदाराच्या मनात सुरक्षिततेची भावना निर्माण करणे हा या बंदोबस्ताचा मुख्य उद्देश आहे. यासाठी लातूर शहर व महानगरपालिका हद्दीत सातत्याने रूट मार्च, विशेष गस्त, नाकाबंदी, प्रतिबंधात्मक कारवाया, संशयित घटकांवर लक्ष ठेवणे व गुप्तचर यंत्रणेमार्फत माहिती संकलनाची प्रभावी यंत्रणा कार्यरत ठेवण्यात आली आहे. पूर्वी ज्या भागात तणावजन्य घटना घडल्या आहेत किंवा जिथे निवडणूक स्पर्धा अधिक तीव्र असण्याची शक्यता आहे, त्या भागांवर विशेष लक्ष केंद्रित करण्यात आले असून प्रत्येक हालचालीवर बारकाईने नजर ठेवली जात आहे.

संपूर्ण लातूर महानगरपालिका क्षेत्रात एकूण १८ प्रभाग असून १४२ इमारतींमध्ये ३७५ मतदान केंद्रे आहेत. सर्व मतदान केंद्रांचे संवेदनशीलतेनुसार वर्गीकरण करण्यात आले आहे. सामान्य, संवेदनशील व अतिसंवेदनशील अशा वर्गवारीनुसार बंदोबस्ताची आखणी करण्यात आली असून, ज्या ठिकाणी धोका अधिक आहे त्या ठिकाणी अतिरिक्त पोलीस बंदोबस्त, डठझ्रक्र तुकड्या, विशेष गस्त पथके व जलद प्रतिसाद पथके तैनात करण्यात आली आहेत. मतदान केंद्रांसोबतच स्ट्राँगरूम, मतमोजणी केंद्र, प्रमुख चौक, मुख्य मार्ग, बाजारपेठा व गर्दीची ठिकाणे या सर्व ठिकाणी कडक सुरक्षा व्यवस्था लागू करण्यात आली आहे.

महानगरपालिका निवडणूक बंदोबस्तासाठी मोठ्या प्रमाणावर मनुष्यबळ तैनात करण्यात आले आहे. यामध्ये सहा पोलीस उपअधीक्षक, ७९ पोलीस निरीक्षक, सहाय्यक पोलीस निरीक्षक व पोलीस उपनिरीक्षक दर्जाचे पोलीस अधिकारी, ७१३ पोलीस अंमलदार, ४५० होमगार्ड जवान, एसआरपीएफचे २ सेक्शन (३ अधिकारी व ६२ जवान), महिलांच्या सुरक्षिततेसाठी स्वतंत्र महिला पोलीस पथक, अशा व्यापक दलाचा समावेश असून, संपूर्ण यंत्रणा २४ तास कार्यरत ठेवण्यात आली आहे.

लातूर महानगरपालिका निवडणूक अनुषंगाने लातूर शहरातील पोलीस स्टेशन गांधी चौक शिवाजीनगर एमआयडीसी व विवेकानंद या पोलीस स्टेशन करिता प्रत्येकी एक उपविभागीय पोलीस अधिकारी नियुक्त केले आहेत. ही संपूर्ण तयारी म्हणजे केवळ बंदोबस्त नसून, लोकशाही मूल्यांचे संरक्षण, नागरिकांच्या अधिकारांचा सन्मान आणि समाजात शांतता, सलोखा व विश्वास टिकवून ठेवण्याचा लातूर पोलिसांचा दृढ संकल्प आहे.

# लातुरात पोवाड्यातून मतदान जनजागृती

**प्रा. डॉ. संदीपान जगदाळेंचा लातूर शहरात लोकशाहीचा जागर । स्वीप व दयानंद कला महाविद्यालयांचा उपक्रम**

**त.भा. वृत्तसेवा,**

**लातूर, १३ जानेवारी :** लातूर महानगरपालिकेच्या सार्वत्रिक निवडणुकीच्या पार्श्र्वभूमीवर १५ जानेवारी रोजी होणाऱ्या मतदानाचा टक्का वाढावा, या उद्देशाने राबविण्यात येणाऱ्या मतदार जनजागृती उपक्रमांना लोकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे. हा उपक्रम महानगरपालिका आयुक्त मानसी मीना, उपायुक्त पंजाबराव खानसळे, स्वीप प्रमुख व मनपा शिक्षणाधिकारी श्र्वेता नागने, शालेय शिक्षण विभागाचे मधुकर ढमाले, सतीश भापकर व सतीश चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली राबविण्यात येत आहे.

याच उपक्रमांतर्गत दयानंद शिक्षण संस्था संचलित दयानंद कला महाविद्यालय, लातूर येथील राष्ट्रीय शिक्षक पुरस्कार प्राप्त शाहीर प्रा. डॉ. संदीपान जगदाळे हे पोवाड्याच्या प्रभावी माध्यमातून नागरिकांमध्ये मतदानाबाबत जागृती निर्माण करीत आहेत.स्वातंत्र्यलढ्याची प्रेरणा, लोकशाही मूल्ये व संविधानाची महती यांचा सुरेख संगम असलेला हा पोवाडा दयानंद कला महाविद्यालयातील विद्यार्थ्यांच्या सक्रिय सहभागातून सादर करीत आहेत.




देशासाठी बलिदान दिलेल्या क्रांतिकारक, देशभक्त व शहीद जवानांना शाही मुजरा अर्पण करत शाहीर प्रा. डॉ. संदीपान जगदाळे आपल्या पोवाड्यातून लोकशाहीचे मोल अधोरेखित करीत आहेत. संविधानाने दिलेला मतदानाचा अधिकार हा केवळ हक्क नसून पवित्र कर्तव्य आहे, हा संदेश ते शाहीरी आवेशात जनतेपर्यंत पोहचवत आहेत.

हा मतदार जनजागृती पोवाडा गंजगोलाई, छत्रपती शिवाजी महाराज चौक, दयानंद गेट, विवेकानंद चौक, मशिद रोड, सुभाष चौक, गरुड चौक, महात्मा बसवेश्र्वर चौक, विअशाली बुद्ध विहार आदी प्रमुख ठिकाणी सादर करीत केले आहे. याचबरोबर मतदान केंद्राध्यक्ष व कर्मचाऱ्यांच्या प्रशिक्षण सत्रांमध्येही पोवाड्याच्या माध्यमातून जनजागृती करीत आहेत. जय जय भारत माता, संविधान देवता अशा घोषणांमधून नागरिकांमध्ये राष्ट्रप्रेम व कर्तव्यभावना जागृत करीत आहेत. या पोवाड्याला दयानंद कला महाविद्यालयातील प्रा. शरद पाडे, प्रा. सूरज साबळे, प्रा. विजय मस्के, प्रा. हरी कुंभार व अनमोल कांबळे यांची प्रभावी साथसंगत लाभत आहे.

पोवाड्यातून स्वातंत्र्यलढ्याचा इतिहास, लोकशाहीची वाटचाल, संविधानातील स्वातंत्र्य, समता, न्याय व बंधुता या मूल्यांचे महत्त्व तसेच मतदानाकडे दुर्लक्ष केल्यास लोकशाहीवर होणारे परिणाम प्रभावीपणे मांडीत आहेत. अधिकाराबरोबर कर्तव्याची जाण आवश्यक आहे व एका मतानेही परिवर्तन शक्य आहे हा संदेश नागरिकांमध्ये ठसठशीतपणे रुजवीत आहेत.

या स्तुत्य उपक्रमाबद्दल दयानंद शिक्षण संस्थेचे अध्यक्ष लक्ष्मीरमणजी लाहोटी, उपाध्यक्ष ललितभाई शाह, सचिव रमेशजी बियाणी, प्राचार्य डॉ. शिवाजी गायकवाड, उपप्राचार्य डॉ. अंजली जोशी, उपप्राचार्य डॉ. दिलीप नागरगोजे, पर्यवेक्षक डॉ. प्रशांत दीक्षित यांनी शाहीर प्रा. डॉ. संदीपान जगदाळे व त्यांच्या सहकाऱ्यांचे अभिनंदन केले आहे.